सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. ८ जुलै २०२६ | वर्ष - ४ थे | अंक ८५ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## बिश्नोई गँगला दणका

पुणे : पुण्यातील व्यावसायिकांकडून खंडणी उकळण्यासाठी धमकीचे कॉल करून गोळीबारातून दहशत निर्माण करणाऱ्या तथाकथित बिश्नोई गँगला पुणे पोलिसांनी मोठा दणका दिला आहे. तब्बल पाच हजार किलोमीटरचा पाठलाग, हजार तासांहून अधिक सीसीटीव्ही फुटेजची पडताळणी आणि पाच राज्यांत राबविलेल्या धडक मोहिमेनंतर या प्रकरणातील चार आरोपींना जेरबंद करण्यात आले. आरोपींकडून तीन पिस्तुले जप्त करण्यात आली असून त्यांच्यावर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. व्यावसायिकांना खंडणीसाठी धमकीचे कॉल आल्यानंतर शहरात गोळीबाराची घटना घडली होती. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन परिमंडळ सहा आणि गुन्हे शाखेची विशेष पथके तपासाला लागली. पुण्यापासून नाशिक, सुरत, अजमेर, भटिंडा, शिरसा आणि राजस्थानातील विविध भागांपर्यंत तपासाचे जाळे पसरवण्यात आले.महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, हरियाणा आणि पंजाब या पाच राज्यांत वरिष्ठ अधिकारी स्वतः तळ ठोकून आरोपींचा माग काढत होते.

## बाईक - टॅक्सीसाठी प्रमाणपत्र ?

मुंबई : महाराष्ट्रातील हजारो बाईक-टॅक्सी चालकांवर परिणाम करणारी मोठी घोषणा आज विधानसभेत झाली. राज्यात बाईक-टॅक्सीचा परवाना मिळवण्यासाठी आता महाराष्ट्राचे डोमिसाईल (अधिवास) प्रमाणपत्र अनिवार्य करण्याचा निर्णय सरकारने जाहीर केला. अनधिकृत वाहतूक, महिला सुरक्षेचे प्रश्न आणि परप्रांतीय चालकांचा वाढता सहभाग या पार्श्वभूमीवर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सभागृहात ही भूमिका स्पष्ट केली. या विषयाची सुरुवात शिवसेना (शिंदे गट)चे आमदार दिलीप लांडे यांनी केली. रस्त्यांवर विनापरवाना बाईक-टॅक्सींची संख्या वाढत असल्याचा दावा करत, अनेक चालकांकडे वैध परवाना, आवश्यक कागदपत्रे किंवा पोलीस पडताळणी नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे महिला आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनत असल्याचे नमूद करत त्यांनी अशा चालकांविरोधात कठोर कारवाईची मागणी केली.

## गोरस भांडार सुरु होणार

नागपूर : वर्ध्यातील प्रसिद्ध गोरस भंडारावर अन्न व औषध प्रशासन (एफडीए) विभागाने केलेली कारवाई बेकायदेशीर ठरवत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली एफडीएने ३१ मे रोजी अस्वच्छतेचे कारण देत गोरस भंडाराचा परवाना निलंबित करून संस्था बंद केली होती. मात्र, ही कारवाई कायदेशीर प्रक्रियेचे पालन न करता करण्यात आल्याचे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने परवाना तातडीने बहाल करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे जवळपास महिनाभराहून अधिक काळ बंद असलेले गोरस भंडार उद्यापासून पुन्हा सुरू होणार आहे.
न्यायालयाने आपल्या आदेशात स्पष्ट केले की, एफडीएने संस्थेविरुद्ध कारवाई करण्यापूर्वी संबंधितांना आक्षेप नोंदविण्यासाठी आवश्यक मुदत दिली नाही. नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे पालन न करता थेट परवाना निलंबित करण्यात आल्याने ही कारवाई कायद्याच्या चौकटीत बसत नसल्याचे खंडपीठाने नमूद केले. त्यामुळे तुकाराम मुंढे यांच्या विभागाच्या कारवाईवर न्यायालयाने ताशेरे ओढले आहेत.

## कर्ज महागले !

मुंबई : देशातील खाजगी क्षेत्रातील सर्वात मोठी बँक, एचडीएफसी बँकेने आपल्या लाखो ग्राहकांना धक्का दिला आहे. बँकेने गृहकर्जाशी संबंधित दरांमध्ये वाढ केली असून तुम्ही बँकेकडून गृहकर्ज घेतले असेल किंवा नवीन कर्ज घेण्याचा विचार करत असाल, तर आता तुम्हाला परतफेड करण्यासाठी मोठी किंमत मोजावी लागेल.

# न्यायाधीशांच्या कमतरतेमुळे केवळ ५८ जलदगती न्यायालये सुरू : मुख्यमंत्री



तभा वृत्तसेवा
मुंबई : राज्यातील महिला आणि बालकांवरील अत्याचाराच्या खटल्यांचा वेगाने निपटारा करण्यासाठी एकूण १३८ विशेष जलदगती (फास्ट ट्रॅक) न्यायालये सुरू करण्याचे नियोजन राज्य सरकारने केले आहे. मात्र, न्यायव्यवस्थेकडून पुरेशा प्रमाणात न्यायाधीशांची उपलब्धता न झाल्यामुळे यातील केवळ ५८ न्यायालयेच प्रत्यक्ष सुरू होऊ शकली आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी विधानसभेत दिली.उर्वरित न्यायालयांसाठी न्यायाधीश उपलब्ध करून देण्याबाबत आपण स्वतः उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांकडे सातत्याने पाठपुरावा करत असल्याचे सांगत, पुढील 'मुख्यमंत्री-मुख्य न्यायाधीश' बैठकीत हा विषय प्राधान्याने मांडून प्रलंबित नियुक्त्या वेगाने पूर्ण करण्यासाठी शासन प्रयत्न करेल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी सभागृहाला दिली.
विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात भाजप आमदार राहुल कुल यांनी पुणे जिल्ह्यातील न्यायालयीन पायाभूत सुविधा आणि अतिरिक्त पोक्सो न्यायालयांच्या मागणीबाबत तारांकित प्रश्न उपस्थित केला होता.बारामती, खेड या ठिकाणी नवीन पोक्सो न्यायालये सुरू करणार का, पुण्याला अतिरिक्त पोक्सो न्यायालय मिळणार का आणि मतदारसंघातील सेशन्स कोर्टच्या इमारतीचे काम पूर्ण झाले असल्याने तिथे तातडीने मान्यता मिळणार का, असे प्रश्न त्यांनी विचारले होते. आमदार राहुल कुल यांच्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मंजुरी असूनही केवळ न्यायाधीशांच्या कमतरतेमुळे सर्व जलदगती न्यायालये पूर्ण क्षमतेने सुरू करता आलेली नाहीत. गेल्या वर्षभरापासून पत्रव्यवहाराद्वारे आणि उच्चस्तरीय बैठकांमध्ये हा मुद्दा आपण उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिला आहे. मुख्य न्यायाधीशांनी गेल्या बैठकीत दिलेल्या माहितीनुसार, उच्च न्यायालयातील न्यायाधीशांची नवीन भरती आणि पदोन्नतीची (बढती) प्रक्रिया सध्या अंतिम टप्प्यात आहे. ही प्रक्रिया पूर्ण होताच नवीन न्यायाधीश उपलब्ध होतील आणि त्यानंतर सर्व १३८ न्यायालयांचे कामकाज पूर्ण क्षमतेने सुरू होईल.न्यायाधीश मिळेपर्यंत उच्च न्यायालयाने काही विद्यमान न्यायालयांनाच 'विशेष न्यायालय' म्हणून डेझिग्नेट (नामित) केले आहे. मात्र, अशा नामित न्यायालयांना त्यांच्या नियमित खटल्यांशिवाय हे अतिरिक्त खटलेही ऐकावे लागतात. परिणामी, खटल्यांच्या निकालाला गती देण्यासाठी आपल्याला 'एक्स्क्लुझिव्ह' (स्वतंत्र) जलदगती न्यायालयांचीच गरज असून, त्यासाठी उच्च न्यायालयाकडून चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.
या चर्चेदरम्यान विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर यांनीही हस्तक्षेप करत, मुख्यमंत्र्यांनी उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांसोबत बैठक घेऊन आणि विधी व न्याय विभागाच्या सचिवांच्या माध्यमातून प्रलंबित नियुक्त्यांची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी उचित कारवाई करण्याचे सूचित केले.त्यावर मुख्यमंत्री म्हणाले, पुढील 'चीफ जस्टिस - चीफ मिनिस्टर' बैठकीत हा मुख्य अजेंडा असेल आणि जिथे कुठे न्यायाधीश कमी आहेत, ती पदे तातडीने भरण्यासाठी शासन आवश्यक तो सर्व प्रयत्न करेल.तसेच, पुणे जिल्हा आणि बारामती, खेड परिसरातील अतिरिक्त न्यायालयांची मागणी केसेसच्या संख्येच्या आधारावर पडताळून पाहून निश्चितपणे सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे आश्वासनही त्यांनी दिले.

## साखळी बॉम्बस्फोट प्रकरणात ; ३८ दोषींची फाशी, उच्च न्यायालयाकडून कायम



वृत्तसंस्था
अहमदाबाद : २००८ मधील अहमदाबाद साखळी बॉम्बस्फोट प्रकरणात गुजरात उच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्णय देत विशेष न्यायालयाने २०२२ मध्ये सुनावलेली शिक्षा कायम ठेवली आहे. न्यायालयाने ३८ दोषींना सुनावलेली फाशीची शिक्षा आणि ११ दोषींची जन्मठेप कायम ठेवत दोषींच्या सर्व अपील याचिका फेटाळून लावल्या.
या प्रकरणाची सुनावणी विशेष खंडपीठासमोर झाली. मार्च २०२५ पासून नियमित सुनावणीनंतर न्यायालयाने निकाल राखून ठेवला होता. अखेर आज निकाल जाहीर करत विशेष न्यायालयाच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात आले. न्यायालयाने पीडित कुटुंबियांनाही दिलासा देत बॉम्बस्फोटात मृत्यू झालेल्या प्रत्येक व्यक्तीच्या वारसांना प्रत्येकी १० लाख रुपयांची भरपाई देण्याचे आदेश दिले आहेत.
यापूर्वी १८ फेब्रुवारी २०२२ रोजी अहमदाबादच्या विशेष न्यायालयाने या प्रकरणात ३८ दोषींना फाशी आणि ११ जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. भारतीय कायद्यानुसार, कनिष्ठ न्यायालयाने सुनावलेली फाशीची शिक्षा उच्च न्यायालयाच्या मंजुरीनंतरच अंमलात येऊ शकते. त्यानुसार हे प्रकरण गुजरात उच्च न्यायालयात प्रलंबित होते. उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे २००८ मधील भीषण साखळी बॉम्बस्फोटात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांच्या कुटुंबियांना तब्बल १८ वर्षांनंतर न्याय मिळाल्याचे मानले जात आहे.

# वारीसाठी पुणे पोलिसांची 'हायटेक' सुरक्षा व्यवस्था

तभा वृत्तसेवा
पुणे : आषाढी वारी म्हटले की लाखो वारकरी, भक्तिभावाचा महासागर आणि त्याचबरोबर सुरक्षेचे मोठे आव्हान. मात्र, यंदा पुणे पोलिसांनी या आव्हानावर अत्याधुनिक तंत्रज्ञानाची भक्कम ढाल उभी केली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), ड्रोन, चेहरा ओळखणारी यंत्रणा, जीपीएस ट्रॅकिंग, अत्याधुनिक सीसीटीव्ही नेटवर्क आणि आठ हजारांहून अधिक पोलिसांच्या तगड्या फौजफाट्याच्या बळावर यंदाची वारी सुरक्षा व्यवस्थेत पार पडणार आहे. संशयित व्यक्ती कॅमेऱ्यात दिसताच नियंत्रण कक्षाला तत्काळ इशारा, गर्दी धोक्याच्या पातळीवर पोहोचताच एआय प्रणालीकडून स्वयंचलित अलर्ट आणि हवेतून ड्रोनची करडी नजर अशी चौफेर सुरक्षा व्यवस्था उभारण्यात आल्याची माहिती पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली.
यावेळी अपर पोलिस आयुक्त संजय पाटील, मनोज पाटील, राजेश बनसोडे, तेजस्वी सातपुते, पोलिस उपायुक्त गोहर हसन, संदीप भाजीभाकरे, मिलिंद मोहिते, जीवन बेनीवाल, अविनाश कुमार, सागर कवडे, प्रशांत अमृतकर, राजलक्ष्मी शिवणकर, कृषीकेश रावले, पी. आर. पाटील, सहायक पोलिस आयुक्त विवेक पवार यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले की, ९ ते १२ जुलैदरम्यान संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालख्या पुणे शहरात मुक्कामी असतील. या कालावधीत लाखो वारकरी पुण्यात दाखल होणार असल्याने सुरक्षा, वाहतूक, गर्दी नियंत्रण आणि आपत्कालीन प्रतिसादासाठी स्वतंत्र नियोजन केले आहे. यंदा प्रथमच पालखी मार्गावर एकूण २४४ कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित कॅमेरे कार्यरत राहणार आहेत. त्यापैकी संत तुकाराम महाराज पालखीमार्गावर १२५, तर संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गावर १०१ कॅमेरे बसविले आहेत. याशिवाय २८ फेशियल रेकग्निशन कॅमेऱ्यांद्वारे पोलिसांच्या अभिलेखातील सराईत गुन्हेगार, फरारी आरोपी किंवा संशयित व्यक्तींची ओळख पटविली जाणार आहे.
गर्दीची घनता, वाहनांची हालचाल, संशयास्पद वस्तू, महिलांची सुरक्षा आणि भांडणांसारख्या घटनांवरही एआय प्रणाली सतत लक्ष ठेवणार आहे. पालखीच्या रथांवर आणि मिरवणुकीच्या पुढे-मागे १२ जीपीएस उपकरणे बसविली आहेत. त्यामुळे पालखीचे थेट स्थान नियंत्रण कक्षासह नागरिकांनाही उपलब्ध होणार आहे.हवेतून निगराणीसाठी ड्रोनचा वापर केला जाणार असून, अनधिकृत ड्रोन रोखण्यासाठी विशेष अँटी-ड्रोन यंत्रणा सज्ज ठेवली आहे. गर्दीच्या ठिकाणी तातडीने निर्णय घेण्यासाठी पाच मोठी आणि एकोणीस मिनी मोबाईल कमांड वाहने तैनात केली आहेत. ही वाहने फिरते नियंत्रण कक्ष म्हणून कार्यरत राहतील. याशिवाय ५०० ठिकाणी ध्वनिक्षेपक व्यवस्था, ३०० वॉकी-टॉकी, वायरलेस संच, डोअर फ्रेम मेटल डिटेक्टर, हँड मेटल डिटेक्टर, स्फोटक शोधक व नाशक पथक आणि श्वान पथकाची विशेष नियुक्ती केली आहे. महिलांच्या सुरक्षेला विशेष प्राधान्य दिले आहे.

## महाराष्ट्रात पाऊस ओसरणार, हवामान विभागाचा नवा अंदाज



तभा वृत्तसेवा
मुंबई : महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाने अक्षरशः पावसाने धुमाकूळ घातलेला बघायला मिळत आहे. मुंबई, ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी, पुणे या जिल्ह्यांमध्ये पावसाचा प्रकोप बघायला मिळाला. हवामान विभागाकडून नाशिक जिल्ह्याला आज पावसाचा रेड अलर्ट जारी करण्यात आला होता. त्यानुसार, नाशिकमध्ये पाऊस पडत आहे. पण वाऱ्याची दिशा बदलल्यामुळे नाशिकवरचं ढगफुटीचं संकट हे अकोले आणि पुढे सुरतच्या दिशेला ढकललं गेलं आहे. पुण्यात घाट परिसरात मुसळधार पावसाचा अंदाज आहे. तसेच हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, आता हळूहळू राज्यातील पाऊस ओसरणार आहे. केवळ विदर्भात पाऊस सक्रीय राहण्याची शक्यता आहे.
हवामान विभागाकडून आज पालघर जिल्ह्याला पावसाचा रेड अलर्ट देण्यात आला आहे. गेल्या पाच दिवसांपासून पालघरमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार स्वरुपाचा पाऊस पडला आहे. त्यामुळे काही ठिकाणी पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झालेली बघायला मिळाली. यानंतर आता पालघरला पाऊस कमी होण्याची शक्यता आहे. पालघर जिल्ह्याला उद्या पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. त्यानंतर पुढचे काही दिवस पावसाचा ग्रीन अलर्ट असणार आहे. त्यामुळे पालघरमध्ये पाऊस ओसरणार असल्याचं चित्र आहे.
ठाणे जिल्ह्यात पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. ठाणे जिल्ह्यातील कल्याण, डोंबिवली, भिवंडी, बदलापूर, टिटवाळा, अंबरनाथ, उल्हासनगर या शहरांमध्ये पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातलेला बघायला मिळाला. सलग पाच दिवस पडलेल्या पावसामुळे उल्हास नदीच्या पाणी पातळीत मोठी वाढ झालेली आहे. तसेच मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी घरांमध्ये पाणी शिरलं. पण आता उद्यापासून ठाणे जिल्ह्यात पाऊस ओसरण्याची शक्यता आहे. ठाणे जिल्ह्याला आज ऑरेंज तर उद्यापासून ग्रीन अलर्ट देण्यात आला आहे. मुंबईत पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला होता. पण आता पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. मुंबईत ठराविक ठिकाणी वाऱ्याचा वेग हा ६० ते ७० किमी प्रतितास असण्याची शक्यता आहे आणि पावसाची शक्यता आहे. पण उद्यापासून मुंबईत पाऊस ओसरणार आहे.

## बोगद्याचं काम सुरू असताना दरड कोसळली



वृत्तसंस्था
तिरुअनंतपुरम : केरळच्या वायनाडमध्ये भूस्खलाची घटना घडली आहे. यामध्ये ३ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण मातीच्या ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे. वायनाडमधील मेपाड्डी परिसरात बोगद्याचं काम सुरू आहे. त्याच परिसरात भूस्खलन झालं. मिनाक्षी पुलाजवळ झालेल्या भूस्खलनाचा व्हिडीओ समोर आला आहे.
हा व्हिडीओ अतिशय भयावह आहे. पुलाजवळ असलेल्या डोंगराचा एक भाग कोसळला आणि चिखल-माती गावात पसरली. सगळा राडारोडा गावात पसरला. भूस्खलनानंतर निर्माण झालेली परिस्थिती, जीव वाचवण्यासाठी लोकांची पळापळ सीसीटीव्हीत कैद झाली आहे.
सीसीटीव्हीत जीपजवळ काही जण उभे असलेले दिसतात. त्यांच्या जवळून एक टँकर जातो. तो पुलावरुन पुढे जातो. तितक्यात समोर भूस्खलन होतं. डोंगराचा मोठा भाग कोसळतो. चिखल-माती रस्त्यावर पसरते. हा सगळा राडारोडा रस्त्यावर येतो. चिखल, मातीखाली आपण गाडले जाऊ नये यासाठी लोकांची एकच पळापळ सुरू झाली होती.

# राष्ट्रवादी ( शप) महायुतीत सहभागी होणार ? राज्यात दुसरा राजकीय भूकंप !



तभा वृत्तसेवा
मुंबई : राज्याच्या राजकारणातील अस्थिरता थांबण्याचं नाव घेत नसून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सहा खासदार फुटून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत गेल्यानंतर आणखी एक राजकीय भूकंप होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष सत्ताधारी महायुतीत सहभागी होणार असल्याच्या चर्चा रंगू लागल्या आहेत. तसंच सत्तेत सहभागी झाल्यानंतर पवारांच्या राष्ट्रवादीच्या वाट्याला काय येणार, याबाबत चर्चा करण्यासाठी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते आणि आमदार जयंत पाटील यांची भाजपचे नेते व खासदार विनोद तावडे यांच्यासोबत मुंबईतील एका हॉटेलमध्ये बैठक झाल्याचं सांगितलं जात आहे. दोन्ही राष्ट्रवादीचं विलीनीकरण होऊन शरद पवारांचा पक्ष महायुतीत सहभागी होईल, अशी चर्चा मागील काही महिन्यांपासून रंगत होती. राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार हे हयात असताना दोन्ही पक्षांच्या विलीनीकरणाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात होती, असा दावा पक्षाच्या नेत्यांनी जाहीरपणे केला आहे. मात्र अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर या प्रक्रियेला खिळ बसली. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीतील काही नेत्यांचा विलीनीकरणाला विरोध असल्याने तूर्तास तरी दोन्ही पक्ष एकत्र येणं शक्य नसल्याचं बोललं जात आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाने थेट घटकपक्ष म्हणून महायुतीत जाण्याच्या हालचाली सुरू केल्याची चर्चाराजकीयवर्तुळात रंगत असून यादृष्टीनेच चर्चा करण्यासाठी जयंत पाटील आणि विनोद तावडे यांच्यात मुंबईत काही दिवसांपूर्वी एक मॅरेथॉन बैठक झाल्याचे समजते.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारला लोकसभेत बहुमत असलं तरी काही महत्त्वाची विधेयके मंजूर करण्यासाठी सरकारला दोन तृतीयांश खासदारांची आवश्यकता आहे. काही दिवसांपूर्वी सरकारने आणलेलं महिला आरक्षण आणि मतदारसंघ पुनर्रचना विधेयक संख्याबळाच्या अभावी मंजूर न झाल्याने भाजपने आता एनडीएतील खासदारांची संख्या वाढवण्यासाठी सर्व शक्ती पणाला लावल्याचं दिसत आहे. आधी पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जींचे खासदार फुटले, त्यानंतर महाराष्ट्रात ठाकरेंच्या शिवसेनेचे खासदारएकनाथ शिंदेंसोबतगेले. आता उत्तर प्रदेशात समाजवादी पक्षात फुटीची चर्चा सुरू असून महाराष्ट्रात शरद पवारांच्या राष्ट्रवादीबाबत उलटसुलट चर्चा रंगत आहेत. जयंत पाटील यांची भाजपच्या राज्य पातळीवरील एखाद्या नेत्याशी चर्चा न होता मागील काही वर्षांत भाजप नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे निकटवर्तीय झालेल्या विनोद तावडे यांच्याशी चर्चा झाल्याने पवारांच्या राष्ट्रवादीला सोबत घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पातळीवर नव्हे तर केंद्रीय स्तरावरून प्रयत्न होत असल्याचं दिसत आहे. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष एनडीएमध्ये सहभागी झाल्यास पक्षाला केंद्रात एक कॅबिनेट मंत्रिपद आणि महाराष्ट्रात तीन मंत्रिपदे मिळण्याची शक्यता आहे. यामध्ये महत्त्वाचे समजले जाणाऱ्या अर्थखात्याचाही समावेश असू शकतो. कारण अजित पवार यांच्या निधनानंतर अर्थखात्याची जबाबदारी तूर्तास मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्वत:कडे ठेवली आहे. जयंत पाटील यांच्यासाठीच हे मंत्रिपद राखून ठेवल्याने या खात्याची जबाबदारी अन्य कोणत्या नेत्यावर सोपवण्यात आली नसल्याचीही कुजबूज आहे. दरम्यान, राजकीय वर्तुळात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या सत्तेतील सहभागाबाबत विविध चर्चा रंगत असल्या तरी पक्षाकडून अद्याप याबाबत अधिकृतपणे कोणत्यानी नेत्याने भूमिका मांडलेली नाही. त्यामुळे पुढील काही दिवसांत नेमक्या काय राजकीय घडामोडी घडतात आणि पवारांचा पक्ष खरंच भाजपसोबत सत्तेत जातो का, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

## आर्य चाणक्य च्या विद्यार्थ्यांनी अनुभवली इस्रो सहल




तभा वृत्तसेवा

**पैठण दि ७ :-**भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई द्वारा संचलित आर्य चाणक्य विद्यामंदिर येथील मुलांनी भारत सरकारच्या इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन (इस्रो) च्या विज्ञान प्रसार व जनजागृती उपक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या "लॅब ऑन व्हील्स / स्पेस ऑन व्हील्स – इस्रो " या विशेष उपक्रम अनुभवला.

या उपक्रमाअंतर्गत इयत्ता ५वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांनी अंतराळ विज्ञान, रॉकेट विज्ञान, उपग्रह तंत्रज्ञान, अवकाश संशोधन आणि आधुनिक वैज्ञानिक संकल्पना यांचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यात आला. अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्ज असलेली "स्पेस ऑन व्हील्स व्हॅन " चे विशेष आकर्षण व कुतूहल मुलांना होते. विद्यार्थ्यांना विविध वैज्ञानिक मॉडेल्स, प्रात्यक्षिके आणि दृकश्राव्य माध्यमातून अवकाश विज्ञानाची माहिती देण्यात आली.या प्रसंगी विविध शास्त्रज्ञांच्या वेशभूषेत चिमुकल्यांनी सहभाग नोंदविला.

या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधनाची आवड, जिज्ञासा आणि नवोन्मेषी विचारसरणी विकसित करण्यासाठी हा सहल नक्कीच फायद्याची ठरणार आहे.

या अनोख्या उपक्रमास डॉ.पद्माकुमार कासलीवाल( अध्यक्ष,आर्य चाणक्य शैक्षणिक संकुल), श्रीपाद कुलकर्णी( विज्ञान भारती देवगिरी विज्ञान प्रतिष्ठान ), मनोज चव्हाण,( गटशिक्षणाधिकारी पं.स पैठण ),प्रा. धारूरकर, अॅड मयुरेश औटी,ज्ञानेश्वर वाडेकर,( केंद्रप्रमुख न. 2),रेणुकादास गर्गे, रविंद्र साळजोशी,भास्कर कुलकर्णी.( केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा मुख्याध्यापक प्रा.वि.), ज्योती जोशी,( मुख्याध्यापक मा. वि. ) आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन विलास खर्डेकर आणि शिखा शाह यांनी केले.

## आयडीएफसी फर्स्ट बँक कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना (ईपीएफओ)च्या प्लॅटफॉर्मवर कार्यान्वित

**मुंबई :** भारत सरकारच्या श्रम आणि रोजगार मंत्रालयांतर्गत कार्यरत कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना (ईपीएफओ)शी इंटिग्रेशन पूर्ण करून आयडीएफसी फर्स्ट बँकेने भविष्य निर्वाह निधी (पीएफ) पेमेंट सेवा सुरू केली आहे.या सेवेच्या शुभारंभप्रसंगी आयडीएफसी फर्स्ट बँकेचे रिटेल लायबिलिटीज विभागाचे प्रमुख श्री. आशिष सिंह म्हणाले, "प्रत्येक उद्योग-आस्थापनेसाठी वैधानिक अनुपालनाची वेळेत पूर्तता करणे ही अत्यंत महत्त्वाची बाब असल्याची आम्हाला जाणीव आहे आणि या देयकांचे व्यवस्थापन सोपे, सुलभ व त्रासमुक्त असावे, असा आमचा विश्वास आहे. ईपीएफओ शी केलेल्या आमच्या इंटिग्रेशनमुळे ग्राहक आता आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे भविष्य निर्वाह निधी (पीएफ) पेमेंट जलद, सुरक्षित आणि सहजपणे भरू शकतात. बँकिंग अधिक सोपे करणे तसेच ग्राहकांचा वेळ आणि श्रम वाचविणारे, उत्कृष्ट अनुभव देणारे उपाय उपलब्ध करून देण्याच्या आमच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा हा एक भाग आहे."*

## सार्थक ट्रस्टचा 18 वर्षांचा प्रवास

मुंबई - उद्योगक्षेत्राचे सहकार्य आणि मजबूत सहाय्य व्यवस्था यांच्या माध्यमातून आम्ही दिव्यांगांना जागतिक स्तरावर स्पर्धेसाठी तयार करत आहोत. सरकार, उद्योग, शैक्षणिक संस्था आणि सामाजिक संस्थांच्या सहकार्यामुळे अधिक समावेशक भारत घडवण्याचा आमचा प्रयत्न आहे." गेल्या १८ वर्षांत सार्थक एज्युकेशनल ट्रस्टने जनजागृती आणि विविध उपक्रमांद्वारे ५३ लाखांहून अधिक दिव्यांगांवर सकारात्मक प्रभाव टाकला आहे. तसेच १ लाखांहून अधिक दिव्यांगांना शिक्षण, पुनर्वसन, कौशल्य विकास आणि रोजगारासाठी थेट मदत केली आहे. संस्थेने २०० हून अधिक जनजागृती उपक्रम, ५,००० हून अधिक कॉर्पोरेट भागीदारांचे नेटवर्क, १,१०० हून अधिक स्वयंसेवी संस्थांसह इंडिया डिसॅबिलिटी एम्पॉवरमेंट अलायन्स (IDEA) आणि १ लाखांहून अधिक लाभार्थ्यांना जोडणारे तीन डिजिटल प्लॅटफॉर्म उभारले आहेत.

## मुकुल माधव फाउंडेशनची सामाजिक बांधिलकी दृढ

**पुणे :** संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू तुकाराम महाराज पालखी सोहळा पंढरीच्या दिशेने रवाना होत असताना राज्यभरातून लाखो वारकरी आळंदी आणि देहूमध्ये दाखल झाले आहेत. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेचे प्रतीक असलेल्या पंढरपूर वारीशी फिनोलेक्स पाईप्सने गेली तीन दशके जपलेले सामाजिक बांधिलकीचे नाते यंदा अधिक दृढ केले आहे. वारकऱ्यांच्या सेवेसाठी फिनोलेक्स पाईप्सतर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांचे उद्घाटन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी फिनोलेक्स पाईप्स आणि मुकुल माधव फाउंडेशनचे पदाधिकारी उपस्थित होते. फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे कार्यकारी अध्यक्ष प्रकाश पी. छाब्रिया, मुकुल माधव फाउंडेशनच्या अध्यक्षा रितू पी. छाब्रिया यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान राबविण्यात येत आहे.

## पाच गावांतील 3,000 हून अधिक समुदाय सदस्यांना लाभ

**07 जुलै 2026:** टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज बिदादी येथील इट्टमाडू सरकारी प्राथमिक शाळेत शैक्षणिक पायाभूत सुविधा विकास प्रकल्पाच्या भूमिपूजन समारंभाचे आयोजन केले. ग्रामीण कर्नाटकमध्ये दर्जेदार पायाभूत सुविधांद्वारे गुणवत्तापूर्ण शिक्षणाला चालना देणे आणि विद्यार्थ्यांसाठी अधिक सक्षम शिक्षणाचे वातावरण निर्माण करणे, या कंपनीच्या वचनबद्धतेचा हा उपक्रम आहे.या समारंभाला बेंगळुरू ग्रामीण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. सी. एन. मंजुनाथ प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच टोयोटा किर्लोस्कर मोटरचे उपाध्यक्ष श्री. रमेश राव आणि कंपनीतील इतर वरिष्ठ अधिकारीही यावेळी उपस्थित होते. इट्टमाडू सरकारी प्राथमिक शाळा परिसरातील पाच शेजारील गावांतील विद्यार्थ्यांना शिक्षण देते आणि या भागातील मुलांच्या शैक्षणिक प्रवासात महत्त्वाची भूमिका बजावते.


यूनियन बैंक ऑफ इंडिया | Union Bank of India

क्षेत्रीय कार्यालय – अहिल्यानगर
प्लॉट नं. ३, ४, ८ व ९, बोल्हेगाव पुलाजवळ, नगर मनमाड रोड, नागापूर, अहिल्यानगर – ४१४१११

**भाडेतत्वावर जागा पाहीजे**

युनियन बँक ऑफ इंडियाला –
१) दर्गा रोड शाखेकरिता – शहानूरवाडी जवळ, (शहानूरवाडी पासून ०१ कि.मी. परिघाच्या आत) गारखेडा, ता. जि. छत्रपती संभाजीनगर १७०० स्क्वे फुट (+-१०%)
२) कोकणगाव शाखेकरिता –मु.पो. कोकणगाव, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर १२०० स्क्वे फुट (+-१०%) सर्व सुविधा असलेली कमर्शिअल जागा भाडेतत्वावर हवी आहे. याबाबतची अधिक माहिती बँकेची वेबसाईट www.unionbankofindia.co.in / गव्हर्नमेंट्स ई प्रोक्युअरमेंट पोर्टल www.eprocure.gov.in वर उपलब्ध आहे.

इच्छुकांनी विहीत नमुन्यातील निवीदा या दि. २८/०७/२०२६ दुपारी ०३.०० वाजेपर्यंत वरील पत्त्यावर सादर कराव्यात. या प्रकल्पाबाबत काही सुधारणा / बदल असल्यास ते बँकेच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येतील. त्याबाबत वर्तमानपत्रांतुन जाहिरात प्रसिद्ध केली जाणार नाही. प्राप्त निवीदा कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार बँकेने राखुन ठेवला आहे.

दि. ०७/०७/२०२६
अहिल्यानगर

क्षेत्रीय प्रमुख
क्षेत्रीय कार्यालय,अहिल्यानगर


# गल्लेबोरगाव येथून पायी दिंडीचे श्री क्षेत्र पंढरपूरकडे भक्तांच्या उपस्थितीत प्रस्थान

तभा वृत्तसेवा

खुलताबाद प्रतिनिधी ह भ प बाळकृष्ण महाराज दारकोंडे यांच्या नेतृत्वाखाली विठ्ठलनामाच्या गजरात वारकऱ्यांचा उत्साहपूर्ण आषाढी वारीचे खुलताबाद तालुक्यातील गल्लेबोरगाव येथील श्री संत गोपाळकृष्ण महाराज प्रसादिक भागवत धर्मप्रसारक मंडळ, संचलित पायी दिंडीचे सलग २१ व्या वर्षी मंगळवारी (दि.७) मोठ्या भक्तिभावाने पंढरपूरकडे प्रस्थान केले. हभप बाळकृष्ण महाराज दारकोंडे यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या दिंडीत मोठ्या संख्येने वारकरी सहभागी झाले होते. 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या जयघोषाने, विठ्ठलनामाच्या गजराने तसेच टाळ-मृदंगाच्या निनादाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला.



दिंडीच्या प्रस्थानापूर्वी श्री विठ्ठल मंदिरात विठ्ठल-रुक्मिणी व श्री हनुमानाची विधिवत पूजा, आरती आणि हरिनाम कीर्तन करण्यात आले. त्यानंतर वारकऱ्यांच्या सुरक्षित व मंगलमय प्रवासासाठी प्रार्थना करण्यात आली. भगव्या पताका फडकवत, अभंग गात आणि विठ्ठलनामाचा गजर करत दिंडी पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ झाली. यंदाही दिंडीचे नेतृत्व हभप बाळकृष्ण महाराज दारकोंडे यांनी केले. गेल्या २१ वर्षांपासून अखंडपणे सुरू असलेली ही पायी दिंडी खुलताबाद तालुक्यातील व परिसरातील धार्मिक परंपरेचे महत्त्वपूर्ण प्रतीक मानली जाते. या दिंडीमुळे समाजात भक्ती, शिस्त, सेवाभाव आणि सामाजिक एकात्मतेची प्रेरणा मिळत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

दिंडीच्या प्रस्थानापूर्वी श्री . विठ्ठल मंदिरात हभप गोपाळ महाराज जैतमहाल यांचं कीर्तन झाले. त्यानंतर सुर्यभान मोटे यांच्या

निवासस्थानी चहा पाणी व रामकृष्ण मोटे यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

"पांडुरंगाच्या भेटीसाठी निघालेली ही पायी वारी ही केवळ यात्रा नसून भक्ती, समर्पण आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देणारी परंपरा आहे," असे प्रतिपादन हभप बाळकृष्ण महाराज दारकोंडे यांनी केले. दिंडीला निरोप देण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. पुष्पवृष्टी करून वारकऱ्यांना शुभेच्छा देत नागरिकांनी उत्स्फूर्त निरोप दिला.

## संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात उत्साहात वन महोत्सव संपन्न

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.७ जुलै - निसर्गाचा समतोल राखण्यासाठी आणि पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी वृक्षारोपण करणे ही काळाची गरज आहे,असे प्रतिपादन संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार यांनी केले.संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने १ जुलै ते ७ जुलै २०२६ दरम्यान महाविद्यालयाच्या परिसरात 'वन महोत्सव' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



या कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य डॉ.शिरीष पवार व उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे यांच्या हस्ते वृक्षारोपणाने झाली. यावेळी महाविद्यालयाच्या प्रांगणात आंबा,वड, पिंपळ,कडुलिंब यासारख्या छायादार विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली.'झाडे लावा,झाडे जगवा' हा संदेश देत विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला.सर्व उपस्थित विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी लावलेली झाडे जगवण्याची आणि पर्यावरणाचे संरक्षण करण्याची सामूहिक शपथ घेतली.

यावेळी बोलताना राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.सुनील चौधरे म्हणाले की,"केवळ झाडे लावणे पुरेसे नाही,तर त्यांचे संगोपन करणे ही आपली जबाबदारी आहे. महाविद्यालयाने यावर्षी दत्तक वृक्ष योजना सुरू केली असून,प्रत्येक विद्यार्थी एका झाडाची निगा राखणार आहे.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दीपक पारधे यांनी केले,तर आभार प्रदर्शन डॉ.शिवाजी शिरसाट यांनी केले.

# संघर्षातून यशाचा प्रेरणादायी प्रवास उलगडणाऱ्या 'पुरुषस्य भाग्यम' कादंबरीचे प्रकाशन

### छत्रपती संभाजीनगरात साहित्यप्रेमींची उत्स्फूर्त उपस्थिती; प्रकाशनानंतर रंगले बहारदार कवी संमेलन

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** संघर्ष, जिद्द आणि कर्तृत्वाच्या बळावर आयुष्याला नवी दिशा देणाऱ्या सत्यकथेवर आधारित साहित्यिक माधव मनोहर जोशी यांच्या 'पुरुषस्य भाग्यम' या कादंबरीचा प्रकाशन सोहळा सिडको येथील गीता भवनमध्ये उत्साहात पार पडला. साहित्यप्रेमींच्या मोठ्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात कादंबरीचे प्रकाशन माजी कुलगुरू डॉ. वि. ल. धारुरकर यांच्या हस्ते, तर ज्येष्ठ कलावंत सुधीर कोर्टीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.



यावेळी ज्योतिर्मय प्रकाशनाचे संजय व्यापारी, ज्येष्ठ हास्यकवी प्रा. विजय पोहनेरकर, ज्येष्ठ कार्यकर्ते रघुवीर ओक यांच्यासह साहित्य, कला आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

लेखक माधव मनोहर जोशी यांनी मनोगतात सांगितले की, 'पुरुषस्य भाग्यम' ही कादंबरी त्यांनी ज्या उद्योगसमूहात काम केले त्या मालकाच्या वास्तविक जीवनावर आधारित आहे. भारत-पाकिस्तान फाळणीनंतर सिंध प्रांतातून निर्वासित म्हणून मुंबईत आलेल्या अनंत वाळिंबे या नायकाचा संघर्ष, मोलमजुरीपासून सुरू झालेला प्रवास आणि स्वतःच्या जिद्द, परिश्रम व बुद्धिमत्तेच्या जोरावर ५०० कोटी रुपयांच्या उद्योगसाम्राज्यापर्यंत पोहोचण्याची प्रेरणादायी कहाणी या कादंबरीत प्रभावीपणे मांडण्यात आली आहे.

प्रमुख पाहुणे सुधीर कोर्टीकर यांनी कादंबरीतील जिवंत प्रसंग, प्रभावी भाषा आणि संघर्षाचे वास्तववादी चित्रण यांचे कौतुक करत ही कलाकृती वाचकांच्या मनाला स्पर्श करणारी असल्याचे सांगितले.

माजी कुलगुरू डॉ. वि. ल. धारुरकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात माधव मनोहर जोशी यांच्या लेखनशैलीचे कौतुक करत, मराठी साहित्याला एक सक्षम कादंबरीकार लाभल्याचे गौरवोद्गार काढले. ज्येष्ठ हास्यकवी प्रा. विजय पोहनेरकर यांनी ही कादंबरी संघर्षातून यशाचा मार्ग दाखवणारी आणि समाजाला प्रेरणा देणारी असल्याचे मत व्यक्त केले.

ज्योतिर्मय प्रकाशनाचे संजय व्यापारी यांनी संस्थेच्या वाटचालीचा आढावा घेताना, गेल्या आठ महिन्यांत १४ पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले असून आणखी १२ पुस्तके प्रकाशनाच्या प्रक्रियेत असल्याची माहिती दिली. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात प्रा. विजय पोहनेरकर यांच्या अध्यक्षतेखाली भव्य कवी संमेलन रंगले. मुकुंद भालेराव, बलराज संघई, मनोरमा बोराडे, अरविंद कुलकर्णी, मनोज अग्रवाल, गिरीश वसेकर, रचना वसेकर, रघुवीर केळकर, रमेश भिसे, डॉ. रावसाहेब कळसे, माधव जोशी, विनया जोशी तसेच विद्यार्थी कवी योगराज यांनी आपल्या कविता सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.

समारोपात प्रा. विजय पोहनेरकर यांनी आपल्या बहारदार हास्यकवितांनी कार्यक्रमात रंगत आणली. सहभागी सर्व कवींना स्मृतिचिन्ह व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.

## संत गुलाबराव महाराज जयंतीनिमित्त मनपात अभिवादन; प्रतिमेस पुष्पहार अर्पण



तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** संत गुलाबराव महाराज यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका येथे अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांच्या हस्ते संत गुलाबराव महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी आयुक्त अमोल येडगे, नगरसेवक सुरेंद्र कुलकर्णी, अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, मुख्य लेखा परीक्षक शिवाजी नाईकवाडे, कार्यकारी अभियंता अनिल तनपुरे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. उज्वला भामरे, माहिती व जनसंपर्क अधिकारी तौसीफ अहमद तसेच रविंद्र खरात, अतुल बनकर, संतोष कोठाळे, करण साळवे, इंझमाम उल हक यांच्यासह महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## प्रभाकर काळे यांचा कृषी भूषण अरुण सोहनी यांच्याकडून सत्कार

तभा.वृत्तसेवा

**सोयगाव,दि.७ जुलै :** छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत सोयगाव येथील शिवसेना उपजिल्हा प्रमुख प्रभाकर आबा काळे यांनी दणदणीत विजय मिळविला त्यानिमित्ताने सोहनी सी.एस.सी.सेंटर येथे कृषिभूषण शेतकरी अरुण सोहनी यांच्या वतीने जाहीर सत्काराचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी शाल व श्रीफळ देऊन विजयी झालेले प्रभाकर आबा काळे यांचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.यावेळी गुरुकृपाचे संचालक दिनेश पंडित,भगवान वाघ,आरोग्य दूध दिगंबर वाघ उपस्थित होते.



## सृजन शैक्षणिक प्रतिष्ठानतर्फे गुणीजन गौरव पुरस्कार सोहळा संपन्न



बिडकीन दि ७ जुलै - सृजन शैक्षणिक प्रतिष्ठान संचलित सृजन प्राथमिक माध्यमिक विद्यालय बिडकीन यांच्याकडून दरवर्षी परिसरातील वेगवेगळ्या क्षेत्रात नावलौकिक मिळवणाऱ्या व सामाजिक व आध्यात्मिक कार्यात कार्य गुणीजनांचा गौरव करण्यात येतो.यंदा विजय शेजूळ (सामाजिक व अद्यात्मिक कार्य ) प्रेमसूख तोतला (सी. ए ), विष्णू भवर (उद्योजक ), संचित पातूनकर (वकील उच्च न्यायालय ) या सर्वं गुणिजनाचा माजी न्यायमूर्ती अंबादासराव जोशी, उमेश दाशरथे यांच्या हस्ते ६ जुलै रोजी शाल श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यावेळी संचालक दत्तात्रय चडचणकर , शालेय समिती अध्यक्ष नरसिंह कुलकर्णी , डॉ. अंतराम धरपळे, बद्रीनाथ नरवडे, सय्यद युनूस, गणेश काळे, मुख्याध्यापक रविंद्र ठाणगे , सर्जेराव जाधव, सचिन हाडे, हसन चाऊस, रविंद्र गायकवाड, मनोज दौंडे , अजय हाडे , किशोर धर्मे आदींसह प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किर्ती लोंढे यांनी तर गणेश देवकते यांनी आभार मानले .

## चाहत्यांकडून 'जगद्धात्री'साठी पारंपरिक केळवण; सोनाक्षी बत्रा भावुक

तभा वृत्तसेवा



**छत्रपती संभाजीनगर :** जगद्धात्री मालिकेतील शिवाय आणि जगद्धात्रीच्या आगामी लग्नसोहळ्यापूर्वी अभिनेत्री सोनाक्षी बत्रा हिला चाहत्यांकडून अनोखे प्रेम मिळाले. चाहत्यांनी तिला घरी आमंत्रित करून पारंपरिक महाराष्ट्रीयन 'केळवण' विधीचे आयोजन केले. औक्षण, टिळा, घरगुती जेवण आणि भेटवस्तूंनी तिचे स्वागत करण्यात आले. या प्रेमळ उपक्रमामुळे आपण भारावून गेल्याची भावना सोनाक्षीने व्यक्त केली. "चाहत्यांनी मला कुटुंबातील सदस्याप्रमाणे मान दिला. हा अनुभव आयुष्यभर स्मरणात राहील," असे ती म्हणाली. या उपक्रमामुळे कलाकार आणि प्रेक्षकांमधील भावनिक नाते अधिक दृढ झाल्याची भावना झी टीव्हीचे वरिष्ठ अधिकारी यांनीही व्यक्त केली. 'जगद्धात्री' मालिका दररोज रात्री १० वाजता प्रसारित होते.

# शासनाच्या जप्त वाळू साठ्यावरच मुजोर वाळू तस्करांचा डल्ला, गंगापूर पोलिसांच्या धडक कारवाईत 22 लाखांचा जेसीबी जप्त, चालकास रंगेहाथ पकडले

तभा वृत्तसेवा

**गंगापूर दि.७ :** तालुक्यात वाळू तस्करांची मुजोरी वाढली असून शासनाने जप्त करून ठेवलेल्या वाळू साठ्यावरच डल्ला मारत चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने जेसीबीच्या सहाय्याने वाळूचा उपसा सुरू असताना गंगापूर पोलिसांनी धाड टाकून आरोपीला रंगेहाथ पकडले. या कारवाईत २२ लाख रुपये किमतीचा विनाक्रमांकाचा जेसीबी जप्त करण्यात आला आहे.



पोलीस शिपाई मनोज नवले यांच्या फिर्यादीनुसार, रविवारी (दि. ६ जुलै) रात्री पोलीस निरीक्षक सलिम चाऊस यांच्या आदेशानुसार पोलीस उपनिरीक्षक अनिल झोरे, पोलीस शिपाई मनोज नवले व संदीप घुसिंगे हे अवैध धंद्यांविरोधात गस्त घालत असताना गुप्त माहिती मिळाली. जामगाव सहकारी साखर कारखान्याच्या पाठीमागे शासनाने जप्त केलेल्या वाळू साठ्यातून जेसीबीच्या सहाय्याने बेकायदेशीरपणे वाळूचा उपसा सुरू असल्याचे समजताच पोलिसांनी तात्काळ सापळा रचला.

दोन पंचांच्या उपस्थितीत रात्री साडेनऊच्या सुमारास छापा टाकण्यात आला. त्यावेळी सागर योगीनाथ मिसाळ (वय ३०, रा. अंमळनेर, ता. गंगापूर) हा विनाक्रमांकाच्या पिवळ्या रंगाच्या जेसीबीद्वारे शासनाच्या मालकीच्या जप्त वाळू साठ्याचा उपसा करताना रंगेहाथ आढळून आला. पोलिसांनी परवान्याची विचारणा केली असता त्याच्याकडे कोणतीही वैध परवानगी नसल्याचे उघड झाले. संबंधित जेसीबीचा मालक व चालक स्वतःच असल्याची कबुलीही त्याने दिली.

त्यानंतर पंचासमक्ष २२ लाख रुपये किमतीचा जेसीबी जप्त करण्यात आला आणि आरोपीला ताब्यात घेण्यात आले. या प्रकरणी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास गंगापूर पोलीस करीत आहेत.

शासनाने जप्त केलेल्या वाळू साठ्यावरच हात साफ करण्याचा प्रयत्न झाल्याने वाळू माफियांची वाढती निर्भयता पुन्हा एकदा समोर आली असून, अशा प्रकारांना नेमके कोणाचे पाठबळ आहे, असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे.


**जाहीर प्रगटन**

सर्वत्र जनतेस कळविण्यात येते की, खाली नमुद परिशिष्टा मध्ये नमुद केलेली प्लॉट माझे पक्षकार नामे जनाबाई संजय देशमुख, रा. संतोषी माता मंदिराजवळ, अहिल्यादेवी नगर, गंगापुर, ता. गंगापुर जि.छ. संभाजीनगर यांनी श्री. मनोज राजेश भाले व श्री. शंकर किसन शिंदे यांचे कडुन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरील मिळकतीचे खरेदीखत दस्ताऐवज नोंदविणे आहे. सदरील मिळकतीचे खरेदीचे व्यवहाराचे अनुषंगाने कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, अधिकार, वाटणी, पोटगी, चोळी बांगडी अथवा अन्य प्रकारचा हक्क असल्यास सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याचे तारखेपासुन आठ दिवसाचे आत लेखी कागदपत्रासह माझे कार्यालयामध्ये सादर करावेत. सदरील मिळकतीचे अनुषंगाने न्यायालयीन वाद प्रलंबित असल्यास त्याप्रमाणे आक्षेप सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याचे तारखेपासुन आठ (8) दिवसांचे आत लेखी पुराव्यासह सादर करावे. सदरची मिळकत मालकी हक्काची व ताब्यातील असल्याची खात्री व विश्वास माझे पक्षकारास वर नमुद खातेदारानी दिलेला आहे आणि म्हणुन माझे पक्षकाराने सदरील मिळकतीचे अनुषंगाने वर नमुद खातेदार यांचे सोबत कायमस्वरूपी खरेदीचा व्यवहार करण्याचे ठरविले आहे. मुदतीमध्ये आक्षेप प्राप्त न झाल्यास सदरची मिळकत निर्विवाद व वैध असल्याचे समजुन माझे पक्षकारातर्फे सदरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल व सदरील मिळकतीचे खरेदीचे व्यवहाराचे अनुषंगाने नोंदणीकृत दस्ताऐवज माझे पक्षकार वर नमुद खातेदार यांचे कडुन नोंदवुन घेतील. मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही याची नोंद घ्यावी. म्हणुन सदरचे जाहीर प्रगटन.

परिशिष्ट :
1) नगर परिषद गंगापुर हददीतील वॉर्ड नं. 15 मधील मिळकत नं. 123/1 क्षेत्र 66 बाय 16.5 ज्याची चर्तुःसिमा खालील प्रमाणे
पुर्वेसः कांताबाई चापे यांची मिळकत
पश्चिमेसः रस्ता
दक्षिणेस : शंकर किसन शिंदे यांची मिळकत
उत्तरेसःअशोक शिरके यांची मिळकत
2) नगर परिषद गंगापुर हददीतील वॉर्ड नं. 15 मधील मिळकत नं. 123/2 क्षेत्र 66 बाय 16.5 ज्याची चर्तुःसिमा खालील प्रमाणे
पुर्वेसः कांताबाई चापे यांची मिळकत
पश्चिमेसः रस्ता
दक्षिणेस : लक्ष्मण टिके यांची मिळकत
उत्तरेसः मनोज राजेश भाले यांची मिळकत
दि.06/07/2026
स्थळ : गंगापुर, ता. गंगापुर जि.छ.संभाजीनगर

पक्षकाराची सही/अंगठा
जनाबाई संजय देशमुख
रा.संतोषी माता मंदिराजवळ, अहिल्यादेवी नगर, गंगापुर, ता. गंगापुर जि.छ.संभाजीनगर
मार्फत
अॅड. एस. पी.लबडे,
सुलतानाबाद, पोस्ट लासुर स्टेशन,
ता. गंगापुर जि.छ. संभाजीनगर मो. नं. 9860345661

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# सैनिक स्कूल विद्यार्थ्यांसाठी शिक्षण आणि शिस्त यांचा दुहेरी संगम -पोलीस अधीक्षक - नवनीत कॉवत

## योगेश्वरी सैनिक स्कूलचा प्रवेशोत्सव उत्साहात संपन्न



**अंबाजोगाई :** अंबाजोगाई येथील योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित योगेश्वरी सैनिक स्कूलचा प्रवेशोत्सवाचा कार्यक्रम सोमवारी उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्ष योगेश्वरी शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष तथा मार्गदर्शक डॉ. सुरेश खुरसाळे होते. प्रमुख पाहुणे बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत होते. विशेष निमंत्रित म्हणून अंबाजोगाईचे उपजिल्हाधिकारी दीपक वजाळे,कर्नल सतीश हंगे, उपसंचालक सैनिकी कल्याण विभाग हे होते.

योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या सैनिक स्कूलची या शैक्षणिक वर्षापासून सुरू झाली असून सहावीच्या पहिल्या तुकडीचा प्रवेशोत्सव ढोल ताशाच्या गजरात ,पारंपारिक हलगीच्या नादात मुलींच्या ढोल पथकाच्या वाद्य वृंदात झाला.

यावेळी बोलत असताना बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत म्हणाले की, मी सुद्धा सहावीपासून सैनिकी शाळेतच शिकलो. सैनिकी शाळेमध्ये शिक्षण आणि शिस्त या दोन्हीचा संगम घडवून विद्यार्थ्यांची घडवणूक केली जाते. विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबन तसेच आत्मविश्वास वाढावा याकरिता शिस्त लावली जाते. शिक्षणासोबत शिस्त असली की देशाचा एक सजग नागरिक बनण्यास अत्यंत काटेकोरपणे मदत होते. आज सहावीला विद्यार्थ्यांना सोडायला आलेल्या पालकांना पाहून मला सुद्धा माझ्या सैनिकी शाळेच्या पहिल्या दिवसाची म्हणजे प्रवेशाची आठवण झाली. माझेही पालक अशाच पद्धतीने सोडायला आले होते. याच सैनिकी शाळेच्या माध्यमातून मला लागलेल्या शिस्तीमुळे आज मी आयपीएस बनू शकलो. याचा मला सार्थ अभिमान आहे.आपण सुद्धा सैनिकी शाळेमधून शिक्षण घेऊन देश सेवला स्वतःला अर्पण करून घ्यावे असा संदेश दिला.

यावेळी बोलत असताना योगेश्वरी शिक्षण संस्थेचे मार्गदर्शक डॉक्टर सुरेश खुरसाळे म्हणाले 1917 साली लोकमान्य टिळकांच्या चतुसूत्री कार्यक्रमांतर्गत येणाऱ्या राष्ट्रीय शिक्षण देण्यासाठी योगेश्वरी शिक्षण संस्थेची स्थापना झाली. तदपासून ते मागील चार वर्षांपूर्वी रक्षा मंत्रालयाकडे केलेल्या अर्जानुसार व चार वेळेस झालेल्या इन्स्पेक्शनद्वारे या सैनिकी शाळेतला मान्यता मिळाली व आज प्रवेशोत्सव होताना अत्यंत आनंद होत आहे. देशभक्तीपर विचारातून झालेल्या संस्थेच्या स्थापनेपासून ते सैनिकी स्कूलच्या होणाऱ्या प्रवेश पर्यंत विद्यार्थी देशसेवेसाठी घडविण्याचे काम या संस्थेद्वारे केले जात आहे व केले जात राहील. तर संस्थेचे अध्यक्ष श्री चंद्रशेखर बर्दापूरकर यांनी प्रास्ताविकात प्रयत्नांती मिळालेल्या या सैनिक स्कूल मधून विद्यार्थ्यांनी शिक्षण घेऊन देशसेवा करावी असे मत व्यक्त केले.

सैनिक स्कूलचे प्राचार्य मेजर एस पी कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. मेजर एस पी कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना देश सेवेची प्रतिज्ञा सांगितली व त्यांच्याकडून ती म्हणून घेतली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन संस्थेचे सचिव कमलाकर चौसाळकर यांनी केले.या कार्यक्रमास योगेश्वरी शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, संचालक, अंबाजोगाईतील प्रतिष्ठित नागरिक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, नुकतेच प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी योगेश्वरी सैनिक स्कूलचे शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# राष्ट्रीय कर्तव्य म्हणून मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी बी एल ओ यांना सहकार्य करा :- अनिल बोर्डे



गेवराई (प्रतिनिधी) भारतीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू झालेल्या ' विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमे ' अंतर्गत मतदार यादीची पडताळणी प्रक्रिया दिनांक 29 जुलै 2026 पर्यंत सुरू राहणार आहे. या प्रक्रियेत पात्र नागरिकांनी आपले नाव मतदार यादीत समाविष्ट होण्यासाठी गणना प्रपत्र ( भरून द्यावे. बोर्डे म्हणाले, " मतदान हा आपला घटनात्मक अधिकार आणि राष्ट्रीय कर्तव्य आहे. अनेकांची नावे मतदार यादीतून सुटले असते. त्यामुळे बी एल ओ म्हणजेच मतदान केंद्रस्तरीय अधिकारी घरोघरी येऊन पडताळणी करणार आहेत ".

तरी सर्व मतदारांनी बीएलओ यांना पुढील माहिती व कागदपत्रे उपलब्ध करून सहकार्य करावे.

1) मतदाराचा अलीकडील पासपोर्ट आकाराचा रंगीत छायाचित्र. 2) मतदाराची जन्मतारीख. 3) आधार क्रमांक,EPIC( मतदार ओळखपत्र ) क्रमांक व मोबाईल क्रमांक. 4) मतदाराच्या वडीलाचे नाव, आईचे नाव, पती-पत्नीचे नाव तसेच संबंधिताचे EPIC क्रमांक (लागू असल्यास )

BLO यांच्याकडून Enumeration Form (EF) गणना प्रपत्र दोन प्रतीमध्ये उपलब्ध करून देण्यात येईल. सदर गणना पत्रकावरील सर्व माहिती काळजीपूर्वक तपासून त्यावर प्रौढ सदस्यांची स्वाक्षरी करून एक प्रत जतन करावी व दुसरी प्रत बीएलओ यांच्याकडे जमा करावी. दिनांक 29.7.2026 पर्यंत Enumeration Form भरून न देणाऱ्या मतदाराचा सामावेश मतदार यादीत होणार नाही, याची मतदाराने गंभीर्याने नोंद घ्यावी. तरी सर्व मतदाराने आपल्या गावातील BLO यांना आवश्यक ती माहिती व कागदपत्रे वेळेत उपलब्ध करून देऊन मतदार यादी विशेष पुनरीक्षण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे.

लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान हक्क बजावणे अत्यंत आवश्यक आहे. एकही पात्र मतदार यादीतून वंचित राहू नये. ही मोहीम लोकशाहीची पायाभरणी आहे. तरी जिल्ह्यातील सर्व मतदारांनी व नागरिकांनी पुढे येऊन सहभाग नोंदवावा असे आवाहन बीड जिल्हा ग्राहक पंचायत जिल्हा उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी केले आहे.

# मुलं वयात येताना काय करावे ; पालकांसाठी एक सोपी मार्गदर्शिका : डॉ.राजेश इंगोले

किशोरवयीन मुलाला मोठं करणं म्हणजे वादळातून होडी चालवण्यासारखं आहे. खूप पेशन्स, समजूतदारपणा आणि स्वतःवरही प्रेम लागतं. कारण हे वयच तसं आहे - गोंधळाचं, बदलांचं आणि चॅलेंजचं. चला तर मग जाणून घेवू आणि लगेच कृतीत अणुयात सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले काय सांगयेत ते खास आपल्या वाचकांसाठी देत आहोत प्रबोधनपर लेख...

**1) मुलगा असा का वागतो? मूळ कारण काय..? :** आजकालचं जग, त्यातही पॅण्डेमिक नंतर मुलं जास्त एकटी झालीत. खोलीत बसून अभ्यास, मोबाईल आणि टेन्शन. मुली मन मोकळं बोलून मोकळ्या होतात. पण, मुलं..? त्यांच्या मनात वादळ सुरू असतं पण ते सांगायला शब्द सापडत नाहीत. मग मित्र जवळचे वाटतात. याचं सगळ्यात मोठं कारण आहे. शरीर आणि मेंदूतील बदल.1) हार्मोनल बदल : राग, चिडचिड, इमोशन एका सेकंदात बदलणं - हे सगळं हार्मोन्समुळे. 2) मेंदूचा विकास : निर्णय घेणारा मेंदूचा भाग प्रिफ्रण्टल कोर्टेक्स हा पूर्णपणे 20-22 वयापर्यंत तयार होतो. त्यामुळे त्यांना याचे परिणाम काय होतील हे लगेच कळत नाही. म्हणूनच इम्पल्सिव्ह वागणं, रिस्क घेणं दिसतं. जोरात गाडी चालवणं, तोडफोड, सिगारेट, स्क्रीनवर तासन्तास, मारामारी, उद्धट बोलणं - यामागे मी मोठा झालोय हे दाखवण्याचा आणि पीअर प्रेशरचा खेळ असतो.

**2) मग मुलांशी वागायचं कसं..? 4 सोपे नियम :** नियम 1 - बाऊंड्रीज ठरवा, पण एकत्र बसून : घरात काय चालेल आणि काय नाही याचे नियम ठरवा. माझा शब्दच अंतिम" असं नको. मुलालाही विचारा. उदाहरणार्थ रात्री 10 नंतर बाहेर नाही कारण सुरक्षितता महत्त्वाची आहे. नियम मोडल्यास काय होईल हे आधीच सांगा. जबाबदारी त्याचीच आहे हे समजावून द्या. ओरडून शिक्षा दिल्याने मुलं आणखी लांब जातात.

**नियम 2 - शिक्षा नको, संवाद हवा :**

संशोधन सांगतं - ज्या पालकांशी मुलं मोकळेपणाने बोलू शकतात ती मुलं जास्त शिस्त पाळतात. पुरूष आहेस, रडू नको हे टाळा. दुःखी, घाबरलेला आहे तरी मुलगा ते लपवेल.

**नियम 3 - बोलण्याची कला शिका :** 1) शॉर्ट आणि स्वीट बोला : तेच तेच उगाळत बसू नका. 2 मुद्दे सांगा आणि ऐकून घ्या. 2) डोळ्यांत डोळे घालून नको : याने मुलं घाबरतात. संध्याकाळी वॉकला जाताना, जेवताना गप्पा मारा. तेव्हा ते जास्त मोकळे होतात. 3) शांत रहा : मुलगा उद्धट बोलला तरी तुम्ही ओरडलात की तो अजून कवचात जाईल. आधी स्वतः शांत व्हा. 4) वेळ द्या : तुम्ही जे सांगितलं ते त्याला समजायला 1-2 दिवस लागू शकतात. लगेच रिझल्टची अपेक्षा नका करू.

**नियम 4 - शरीरातील बदलांबद्दल बोला :** मुलींप्रमाणेच मुलांच्या शरीरातही बदल होतात. लैंगिक भावना, शंका येतात. हे लपवू नका. वडिलांनी किंवा डॉक्टरांनी योग्य माहिती द्यावी. नाहीतर इंटरनेटवर चुकीची आणि घाबरवणारी माहिती मिळेल.

**शेवटी काय..? :** मुलगा चुकतोय, पडतोय, ठेचाळतोय...कारण, तो नवीन रस्ता शोधतोय. स्वतःची ओळख बनवतोय. मुलगा आता मोठा होतोय हे मनाने स्वीकारलं की जरब कमी होईल आणि जवळीक वाढेल. लक्षात ठेवा त्याला तुमच्या फक्त भाषणाची नाही, तुमच्या साथीची, त्याला समजून घेण्याची गरज आहे.

(डॉ.राजेश इंगोले हे अंबाजोगाईतील समाधान मानसोपचार रूग्णालय येथे सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ व्यसनमुक्ती तज्ञ व विद्यार्थी समुपदेशक म्हणून कार्यरत आहेत. मोबाईल नंबर ~ 9422240710)

# 'प्रशासनाचा संवेदनशील पुढाकार: वंचित, दिव्यांगांच्या हक्कासाठी तहसीलदार श्रीकांत निळेंची विशेष मोहीम!'

## शासकीय योजनांचा लाभ थेट बँक खात्यात पोहोचवण्यासाठी तहसीलदार आणि नायब तहसीलदारांची तत्परता'

**किल्ले धारूर ( प्रतिनिधी ) :** शासनाच्या विविध सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ कोणत्याही अडथळ्याविना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचावा, यासाठी धारूर तहसील कार्यालयात अंध, अपंग, दिव्यांग, निराधार, श्रावणबाळ तसेच इतर पात्र लाभार्थ्यांसाठी विशेष आधार कार्ड अद्ययावत (अपडेट) कॅम्प सुरू करण्यात आला आहे. या कॅम्पमध्ये आधार कार्ड अद्ययावत करणे, बायोमेट्रिक माहिती नोंदविणे तसेच आधार क्रमांक बँक खात्याशी संलग्न (सीडिंग) करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या विशेष उपक्रमाचा लाभ सर्व पात्र लाभार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन धारूरचे तहसीलदार श्रीकांत निळे यांनी केले आहे.

सध्या शासनाच्या विविध सामाजिक सुरक्षा योजनांचे अनुदान, मानधन व आर्थिक लाभ थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात डीबीटी (डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर) प्रणालीद्वारे जमा करण्यात येतात. त्यामुळे लाभार्थ्यांचे आधार कार्ड अद्ययावत असणे आणि ते संबंधित बँक खात्याशी जोडलेले असणे अत्यावश्यक आहे. आधार कार्ड अद्ययावत नसल्यास किंवा बायोमेट्रिक प्रमाणीकरणात अडचणी असल्यास शासकीय योजनांचा लाभ मिळण्यात अडथळे निर्माण होण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे.

या पार्श्वभूमीवर तहसीलदार श्रीकांत निळे व नायब तहसीलदार बाबुराव दळवी यांनी तालुक्यातील सर्व अंध, अपंग, दिव्यांग, निराधार, श्रावणबाळ तसेच इतर पात्र लाभार्थ्यांनी विलंब न करता या विशेष कॅम्पला भेट देऊन आधार कार्ड अद्ययावत करून घ्यावे, असे आवाहन केले आहे. लाभार्थ्यांनी आधार कार्ड, बँक पासबुक, चालू मोबाईल क्रमांक, संबंधित योजनेचा पुरावा तसेच ओळखपत्र (मतदार ओळखपत्र अथवा रेशन कार्ड) ही आवश्यक कागदपत्रे सोबत घेऊन धारूर तहसील कार्यालयातील विशेष कॅम्पमध्ये उपस्थित राहावे. वेळेत आधार अद्ययावत करून शासनाच्या विविध सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ अखंडितपणे मिळावा, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# मतदारांनी SIR विशेष मतदार यादी पुनरिक्षण मोहिमेत सहभागी व्हावे – राजेंद्र मस्के

**बीड | प्रतिनिधी :** भारत निवडणूक आयोगामार्फत राज्यभर विशेष मतदार यादी पुनरिक्षण (SIR) मोहीम राबविण्यात येत आहे. महाराष्ट्रात ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत बूथ लेव्हल अधिकारी (BLO) घराघरांत जाऊन मतदारांची माहिती पडताळून घेत आहेत. या मोहिमेत प्रत्येक नागरिकाने सक्रिय सहभाग घेऊन सहकार्य करावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले आहे.

या मोहिमेदरम्यान BLO प्रत्येक कुटुंबाला दोन फॉर्म देत आहेत. नागरिकांनी हे दोन्ही फॉर्म काळजीपूर्वक व अचूक भरावेत. त्यापैकी एक भरलेला फॉर्म BLO कडे जमा करावा, तर दुसरी प्रत स्वतःकडे सुरक्षित जपून ठेवावी. भविष्यात मतदार यादीच्या पडताळणीसाठी किंवा इतर आवश्यक कामांसाठी ही प्रत उपयुक्त ठरू शकते.

फॉर्म भरताना नाव, जन्मतारीख, पत्ता, मतदार क्रमांक व इतर सर्व माहिती अचूक नमूद करावी. आवश्यक असल्यास संबंधित कागदपत्रांच्या प्रती जोडाव्यात. चुकीची किंवा अपूर्ण माहिती देणे टाळावे. मतदार यादीतील प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव अचूक राहणे ही लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची बाब आहे. त्यामुळे कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता भारत निवडणूक आयोगाच्या अधिकृत प्रक्रियेला सहकार्य करावे. BLO आपल्या घरी आल्यास त्यांना आवश्यक माहिती द्यावी आणि आपल्या कुटुंबातील सर्व पात्र सदस्यांची पडताळणी पूर्ण झाल्याची खात्री करून घ्यावी, असेही राजेंद्र मस्के यांनी पत्रकात म्हटले आहे.

# अंबाजोगाई नगरपरिषदेच्या कंत्राटी स्वच्छता कामगारांचे 'कामबंद' आंदोलन स्थगित : नगराध्यक्ष मुंदडांनी केली मध्यस्थी





**अंबाजोगाई :** अंबाजोगाई शहरात ढगाळ वातावरणामुळे वातावरण जरी थंड असलं तरी नगरपरिषदेचं राजकारण चांगलंच तापलं आहे. अंबाजोगाई नगरपरिषदेतील कंत्राटी स्वच्छता कामगारांनी गेल्या तीन महिन्यांच्या थकीत वेतनासाठी आजपासून बेमुदत 'कामबंद' आंदोलन सुरू केले होते. थकीत वेतनामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या कामगारांनी वेतन मिळेपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा इशारा दिला होता. या आंदोलनाची गंभीर दखल घेत नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांनी कामगारांशी दूरध्वनीवर संवाद साधत लवकरात लवकर वेतन अदा करतो, असे कामगारांना आश्वासित केले, त्यामुळे कंत्राटी स्वच्छता कामगारांनी 'कामबंद' आंदोलन स्थगित केले आहे.

दुसरीकडे लोकविकास महाआघाडीच्या काही नगरसेवकांनी मुख्याधिकारी यांची भेट घेत आम्ही मागवलेली माहिती का दिली नाही ? याचा जाब विचारला आहे. त्यामुळे दिवसेंदिवस नगरपरिषदेच्या राजकारणाचा चांगलाच पारा चढताना दिसत आहे.

अंबाजोगाई नगरपरिषदेच्या कंत्राटी स्वच्छता कामगारांचे वेतन गेल्या तीन महिन्यांपासून थकले आहे. वेतन थकल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली असून कुटुंबाचा उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न त्यांच्यासमोर उभा टाकला आहे. त्यामुळे कामगारांनी आजपासून 'कामबंद' आंदोलनाचे हत्यार उपसले होते. या आंदोलनामुळे अंबाजोगाई शहरातील स्वच्छता, कचरा संकलन व इतर नागरी सेवांवर परिणाम होण्याची दाट शक्यता होती. या आंदोलनाची दखल घेत जनविकास परिवर्तन आघाडीचे गटनेते संजय गंभीरे आणि अनंत वेडे यांनी नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा आणि कामगारांची फोनद्वारे चर्चा घडवून आणली. यावेळी मुंदडा यांनी कामगारांच्या समस्या ऐकून घेत त्या सोडविण्याचा शब्द दिला. त्यामुळे कामगारांनी 'कामबंद' आंदोलन स्थगित केले.

स्वच्छता कामगारांनी घेतली माजी नगराध्यक्ष मोदी यांची घेतली होती भेट

अंबाजोगाई नगरपरिषदेच्या स्वच्छता कामगारांनी 'कामबंद' आंदोलन सुरु केल्यानंतर माजी नगराध्यक्ष तथा लोकविकास आघाडीचे सर्वेसर्वा राजकिशोर मोदी यांची सहकार भवन येथे भेट घेतली. कामगारांनी त्यांना थकीत वेतनासंबंधी माहिती देत त्यांच्या व्यथा मांडल्या. यावेळी मोदी यांनी माझ्या हातात काही नाही, परंतू, तुमच्या वेतनासाठी मी मुख्याधिकारी यांना विनंती करतो, असे सांगितले. यावेळी कामगारांनी त्यांना तुमच्या काळात आमचे वेतन थकले नाही, अशी आठवण करुन दिली.

# एस आय आर प्रक्रिया सुरु फॉर्म भरले नाही तर मतदारांचे मतदार यादीतून नाव होणार कमी : विनायक रत्नपारखी.



मतदान यादीत नाव ठेवण्यासाठी सर्व मतदारांनीठी फॉर्म भरून बीएलओ यांना सहकार्य करावे. असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे शहर मंडळ तालुका अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी केले आहे. . सध्या देशभरत SIR ,(स्पेशल इंटेन्सिव्ह रिझर्वेशन) अंतर्गत मतदार यादी विशेष शुद्धीकरण मतदान पुनर्रचना फार्म भरून घेणे चालू आहे त्या अनुषंगाने महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात तालुक्यात एस आय आर फॉर्म भरणे चालू आहे ही मुदत 1 जुलै ते 30 जुलै अशी असल्यामुळे सर्व मतदारांनी आपला फॉर्म भरून शासकीय बीएलओ व त्यांच्यासोबत असलेले सर्व पक्षांचे सहकारी बी एल ओ यांना देऊन सहकार्य करावे . आपण मतदान यादीत नाव कायम ठेवण्यासाठी फॉर्म भरून नोंदणी करणे गरजेचे आहे नसता आपले मतदान यादीतून नाव वगळण्यात येईल . सध्या बीएलओ प्रत्येक प्रभागांमध्ये फॉर्म भरण्यासाठी जात आहेत त्यामुळे सर्वांनी एक पासपोर्ट फोटो व आधार कार्ड देऊन त्यांना सहकार्य करून फॉर्म भरून घ्यावा तसेच ज्यांची मॅपिंग झालेली आहे त्यांनी कुठलेही कागदपत्रे देण्याची आवश्यकता नाही फक्त फॉर्मलां एक फोटो लावून माहिती भरून द्यावा.

लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत असणे आवश्यक आहे त्यामुळे प्रत्येक नागरिकाने आपले नाव मतदार यादीत कायम ठेवण्यासाठी फॉर्म भरून घेणे गरजेचे आहे नसता आपले नाव मतदार यादीत राहणार नाही व आपल्याला मतदान करण्यापासून तर वंचित रहावेच लागेल व पण त्यासोबतच अनेक शासकीय योजने पासून पण वंचित राहावे लागेल .

# आसाराम झगडे यांचे निधन ; परिसरात हळहळ



**माजलगाव, प्रतिनिधी :** तालुक्यातील पात्रुड येथील रहिवाशी व हल्ली मुक्काम शेलापुरी येथील ज्येष्ठ नागरिक तथा सामाजिक स्वभावामुळे परिचित असलेले आसाराम बळवंतराव झगडे (वय ७६) यांचे रविवारी (दि. ५ जुलै २०२६) दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाची बातमी समजताच गावासह माजलगाव परिसरात हळहळ व्यक्त करण्यात आली.

आसाराम झगडे हे शांत, मनमिळावू आणि कष्टाळू व्यक्तिमत्त्व म्हणून परिसरात परिचित होते. सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी आयुष्यभर सर्वांशी जिव्हाळ्याचे संबंध ठेवले. गावातील विविध सामाजिक आणि धार्मिक उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असे. त्यांच्या साध्या राहणीमानामुळे आणि प्रेमळ स्वभावामुळे त्यांनी समाजात आपली वेगळी ओळख निर्माण केली होती. त्यांच्या पार्थिवावर मंगलनाथ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यसंस्कारावेळी नातेवाईक, मित्रपरिवार, ग्रामस्थ, विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी तसेच अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी दिवंगत झगडे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. महाराष्ट्र नाभिक महामंडळ, बीड जिल्हाध्यक्ष तथा पत्रकार दिलीप झगडे यांचे ते वडील होत.

# रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईकडून डॉक्टर, सी.ए आणि टॅक्स प्रॅक्टिशनर्स यांचा सत्कार



**अंबाजोगाई :** येथील रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईच्या पदाधिकारी व सदस्य यांनी सेवा हीच आमची ओळख, सेवा हीच आमची प्रेरणा हे ब्रीद जोपासत शहर व परिसरात कार्यरत डॉक्टर, सी.ए. आणि टॅक्स प्रॅक्टिशनर्स यांचा सत्कार करून सामाजिक बांधिलकी जोपासत आपले योगदान दिले असल्याची माहिती रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईचे अध्यक्ष रो.भिमाशंकर न.शिंदे व सचिव रो.सुनील व्यवहारे, प्रोजेक्ट डायरेक्टर डॉ.योगेश गालफाडे यांनी दिली आहे.

शहरातील नवकेशर डान्स ॲण्ड ड्रामा अकॅडमी, अंबाजोगाई येथे रविवार, दि. ५ जुलै २०२६ रोजी रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाई यांनी डॉक्टर्स डे व सी.ए. डे साजरा केला. यावेळी अभिनव संकल्पना राबविली. सेवा हीच आमची ओळख, सेवा हीच आमची प्रेरणा हे ब्रीद जोपासत शहर व परिसरात कार्यरत डॉक्टर, सी.ए. आणि टॅक्स प्रॅक्टिशनर्स यांचा सत्कार करून सामाजिक बांधिलकी जोपासली. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी डॉ.सिद्धेश्वर बिराजदार हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून आए.एम.ए.शाखा अंबाजोगाईचे अध्यक्ष डॉ.राहूल धाकडे व ॲम्पाच्या अध्यक्ष डॉ.सुलभा पाटील व सी.ए.असोसिएशनचे प्रतिनिधी ॲड.सचिन बजाज तर प्रोजेक्ट डायरेक्टर डॉ.योगेश गालफाडे, रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईचे अध्यक्ष रो.भिमाशंकर न.शिंदे व सचिव रो.सुनील व्यवहारे आणि मान्यवरांच्या हस्ते व प्रमुख उपस्थितीत हा सत्कार सोहळा संपन्न झाला. या उपक्रमाचे हे पहिले वर्ष होते. प्रारंभी रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाई कडून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी कार्यक्रम आयोजनामागील भुमिका नमूद करताना रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईचे अध्यक्ष रो.भिमाशंकर न.शिंदे यांनी सांगितले की, रोटरीच्या माध्यमातून अंबाजोगाई पंचक्रोशीत वेगवेगळ्या क्षेत्रात कार्य केले जाईल. समाजाच्या उपयोगी पडेल असे कार्य रोटरीच्या माध्यमातून आम्ही करीत राहू. जिथे कमी तिथे आम्ही ही भावना जोपासून आम्ही कार्य करू व अंबाजोगाईचा सामाजिक वसा व वारसा आम्ही समर्थपणे पुढे घेऊन जाऊत असा विश्वास या कार्यक्रमाच्या माध्यमातून मी सर्वांना देतो. यावर्षी प्रथमच आम्ही शहर व परिसरात कार्यरत डॉक्टर, सी.ए. आणि टॅक्स प्रॅक्टिशनर्स बांधव यांचा सत्कार करून सामाजिक बांधिलकी जोपासण्याचा प्रयत्न केला आहे. विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान करण्यासाठी आम्ही रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाई प्रयत्नशील राहणार आहोत असे अध्यक्ष रो.शिंदे यांनी सांगितले. तर यावेळी बोलताना प्रमुख अतिथी डॉ.राहूल धाकडे, डॉ.सुलभा पाटील व सी.ए.ॲड. सचिन बजाज या मान्यवरांनी रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईच्या विविध अभिनव उपक्रमांचे कौतुक केले. तर अध्यक्षीय समारोप करताना डॉ.सिध्देश्वर बिराजदार यांनी पुढील काळात अभिनंदनीय संकल्पना राबवत भीमाशंकर शिंदे आणि त्यांचे सर्व सहकारी रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाई या नव्या क्लबचे कामही अतिशय उत्तम रितीने करतील असा विश्वास व्यक्त करून रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईला शुभेच्छा दिल्या. सत्काराचे स्वरूप शाल, पुष्पगुच्छ असे होते. प्रारंभी रोटरीचे संस्थापक रो.पॉल हॅरीस यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्ज्वलाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रो.जगदीश जाजू यांनी केले. तर सूत्रसंचालन रो.भिमाशंकर शिंदे यांनी करून उपस्थितांचे आभार सचिव रो.सुनील व्यवहारे यांनी मानले. यावेळी कार्यक्रमाला सर्व रोटरीयन रो.डॉ. डी.एच.थोरात, रो.आनंद कर्नावट, रो.पुरूषोत्तम रांदड, रो.जगदीश जाजू, रो.ॲड.प्रवीण बजाज, रो.श्रीकांत धायगुडे, रो.ॲड.कल्याण लोमटे, रो.वि.वा.गंगणे, रो.भागवत कांबळे, रो.वाजेद काझी, रो.कृष्णा चव्हाण, रो.शरद देडे आदींसह अंबाजोगाई शहरातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, विधी, वैद्यकीय, पत्रकारिता, संगीत, सहकार, व्यापार आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

उपविभागीय कार्यालय : आदर्श नगर, गणपती मंदिराजवळ, पांगरी रोड, बीड. मो. 9403264930, ई-मेल - jagannathdeshmukh2020@gmail.com

## अग्रलेख

# लोककलेतील तेजस्वी ताऱ्याचे निखळणे...

काही व्यक्तिमत्त्वे आपल्या उत्तुंग कामगिरीच्या बळावर अमिट ठसा उमटवून जातात. त्यातील एक नाव म्हणजे पंडवानी या लोककला प्रकाराद्वारे महाभारताचे सादरीकरण करून ही लोककला सातासमुद्रापार नेणाऱ्या कलावंत तीजनबाई. तीजनबाई यांच्या निधनासोबत पंडवानी लोककलेचा एक अध्याय समाप्त झाला आहे. एखाद्या कठीण खडकातून झिरपणारा लहानसा झरा गंगा नदीप्रमाणे विशाल रूप धारण करतो आणि इतरांसाठी प्रेरणादायी ठरतो. त्यांच्या आयुष्याकडे पाहून असे म्हणावे लागते. संघर्ष, जिद्द, प्रतिभा आणि आत्मविश्वास यांच्या संगमातून तीजनबाई यांनी पंडवानी लोककलेचे विश्व प्रकाशमान केले होते. छत्तीसगडच्या साध्या मातीत जन्मलेली ही कन्या सुरुवातीला कुणाच्याही नजरेत भरली नव्हती. पण, जसा खाणीतून निघालेला हिरा पैलू पाडल्यावर तेजस्वी होतो, त्याचप्रमाणे त्यांच्यातील कलाविष्कार काळासोबत अधिकाधिक झळाळून उठला. तीजनबाई यांनी पंडवानीला विलक्षण उंचीवर नेऊन ठेवले. त्यांच्या पश्चात आता पंडवानी लोककलेचे काय होणार, असा प्रश्न स्वाभाविकच उपस्थित झाला आहे. काळच त्याचे उत्तर देईल, पण तीजनबाई कधीही विस्मरणात जाणार नाहीत.

लोककला ही कोणत्याही समाजाच्या सांस्कृतिक स्मृतीची जिवंत अभिव्यक्ती असते. ती केवळ मनोरंजनाचे साधन नसते. समाजाचा इतिहास, तत्त्वज्ञान, लोकजीवन, श्रद्धा आणि सामूहिक अनुभव जतन करणारी ती परंपरा असते. छत्तीसगडच्या मातीत रुजलेली पंडवानी ही अशीच एक अद्वितीय लोककला आहे. पंडवानी म्हणजे पांडवांची अर्थात महाभारताची कथा. गायन, अभिनय, संवाद, नाट्यमय निवेदन आणि संगीताच्या साहाय्याने महाभारत जिवंत करणारी ही कला अनेक पिढ्यांपासून चालत आलेली आहे. लोकभाषा, लोकसंगीत, अभिनय आणि कथनकलेचा अद्भुत संगम म्हणजे पंडवानी. ही कला महाभारतातील प्रसंगांना शब्द, स्वर आणि भाव यांच्या माध्यमातून नवजीवन देते. या कलेत गायक कथा तर सांगतोच, शिवाय तो प्रत्येक पात्रात स्वतःला झोकून देतो आणि त्या व्यक्तिरेखा श्रोत्यांसमोर जिवंत करतो. पंडवानीचे वैशिष्ट्य म्हणजे सहजता आणि जिवंतपणा. हातातील तंबुरी कधी अर्जुनाचे गांडीव बनते, कधी भीमाची गदा, तर कधी श्रीकृष्णाचे सुदर्शनचक्र. गायकाच्या हावभावांतून, आवाजातील चढ-उतारांतून आणि देहबोलीतून संपूर्ण महाभारत रसिकांच्या डोळ्यांसमोर साकार होते. त्यामुळे पंडवानी ऐकण्याचा अनुभव हा केवळ श्रवणाचा अनुभव नव्हे, तो कल्पनाशक्ती जागी करणारा दृश्य अनुभव ठरतो. या कलेत वीर रसाची गर्जना, करुण रसाची आर्तता, भक्तीची पावनता आणि जीवनतत्त्वज्ञानाची गहनता यांचा सुरेख मिलाफ दिसून येतो. प्रत्येक सादरीकरण म्हणजे लोकजीवनातील मूल्ये, नातेसंबंध, धर्म, कर्तव्य आणि मानवतेचा शोध घेणारा एक सांस्कृतिक सोहळा असतो. म्हणूनच पंडवानी ही मनोरंजनाच्या पल्याड संस्कार, परंपरा आणि इतिहास यांचे जतन करणारी सजीव लोकविद्या ठरते. पंडवानी म्हणजे लोकमनाच्या स्मृतीत अखंड वाहणारी संस्कृतीची नदी. तिच्या स्वरांत इतिहास बोलतो, तिच्या कथनात लोकजीवन धडधडते आणि तिच्या भावविश्वात भारतीय संस्कृतीचे शाश्वत मूल्य प्रतिबिंबित होते. पंडवानी हा भारतीय लोककलेच्या आत्म्याचा श्वास आणि पिढ्यानपिढ्या वाहत आलेल्या सांस्कृतिक परंपरेचे चिरंतन प्रतीक आहे.

या कलेला जागतिक पातळीवर नेण्याचे श्रेय निर्विवादपणे तीजनबाई यांना जाते. त्यांनी आपल्या विलक्षण आवाजाने, प्रभावी देहबोलीने आणि अभिनयाच्या अफाट सामर्थ्याने पंडवानीला एका प्रादेशिक लोकपरंपरेतून जागतिक सांस्कृतिक मंचावर नेऊन उभे केले. इतिहास सांगतो की लोककला कधीच एका कलाकाराच्या भरवशावर विकसित होत नाही. ती पिढ्यानपिढ्या वाहणाऱ्या परंपरेतून पुढे सरकत राहते. तरीही काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की, त्यांच्या अस्तित्वामुळे एखाद्या कलेला नवे आयाम आणि नवी शिखरे मिळतात. तीजनबाई यांचे पंडवानी लोककलेच्या संदर्भातील स्थान असेच आहे. त्यांनी पंडवानीच्या अभिव्यक्तीची व्याप्ती विस्तारली. स्त्रियांना या क्षेत्रात स्वतंत्र स्थान मिळवून देण्यात त्यांचे योगदान ऐतिहासिक आहे. तीजनबाई यांचा जीवनप्रवास हा संघर्ष, जिद्द आणि कलेवरील निष्ठेचा प्रेरणादायी आदर्श आहे. त्यांचा जन्म छत्तीसगडमधील एका अत्यंत गरीब कुटुंबात झाला. बालपणापासूनच त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. औपचारिक शिक्षण घेण्याची संधी त्यांना फारशी मिळाली नाही. परंतु, लोककलेबद्दलची ओढ मात्र दिवसेंदिवस वाढत गेली. त्या काळात पंडवानी ही कला मुख्यतः पुरुषांकडून सादर केली जात असे. आता त्यांच्या शिष्यांना ही परंपरा पुढे नेण्याचा प्रयत्न सुरू ठेवावा लागणार आहे. कोणत्याही गुरूची शैली, आवाजातील नैसर्गिक ताकद, रंगमंचावरील करिष्मा आणि प्रेक्षकांशी निर्माण होणारे भावनिक नाते यांची पुनरावृत्ती करणे शक्य नसते. त्यामुळे पंडवानीच्या भविष्यातील कलाकारांनी तीजनबाई यांची नक्कल करण्याऐवजी त्यांच्या वारशातून प्रेरणा घेऊन स्वतःची स्वतंत्र अभिव्यक्ती निर्माण करणे अधिक आवश्यक आहे. आजच्या डिजिटल युगात लोककलांसमोर एक वेगळेच आव्हान उभे आहे. मनोरंजनाची साधने बदलली आहेत. सामाजिक माध्यमांच्या वेगवान जगात दीर्घ कथनपर लोककलेला प्रेक्षक मिळवणे कठीण झाले आहे. परंतु, याच तंत्रज्ञानामध्ये पंडवानीच्या पुनरुज्जीवनाची संधीही दडलेली आहे. डिजिटल संग्रहालये, माहितीपट, ऑनलाईन कार्यशाळा, विद्यापीठांतील अभ्यासक्रम, युट्युबवरील सादरीकरणे आणि बहुभाषिक दस्तावेजीकरण यांच्या माध्यमातून पंडवानी नव्या पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचू शकते. संशोधनाच्या दृष्टीने पंडवानी हा भारतीय मौखिक लोकपरंपरेच्या अभ्यासासाठी महत्त्वाचा स्रोत आहे. तिच्यात लोकभाषा, संगीत, अभिनय, सामाजिक मानसशास्त्र, सांस्कृतिक इतिहास आणि स्त्री-अभिव्यक्ती यांचे अनेक स्तर दडलेले आहेत. त्यामुळे विद्यापीठे, संशोधन संस्था आणि सांस्कृतिक अकादमी यांनी या कलेवर अधिक सखोल संशोधन करणे आवश्यक आहे. तीजनबाई यांच्या सादरीकरणांचे ध्वनी व दृश्य संग्रह, त्यांच्या मुलाखती, शैली वैशिष्ट्ये आणि जीवनप्रवास यांचे शास्त्रीय दस्तावेजीकरण ही काळाची गरज आहे. शासनाची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. लोककलावंतांना आर्थिक स्थैर्य, प्रशिक्षण केंद्रे, नियमित महोत्सव, शिष्यवृत्ती, शालेय अभ्यासक्रमात लोककलांचा समावेश आणि आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक देवाणघेवाण यासारख्या उपाययोजना राबवल्यास पंडवानीचे भवितव्य अधिक सुरक्षित होईल. आपल्या लोकपरंपरांवर प्रेम करणारा समाजच त्या परंपरांना दीर्घायुष्य देतो. त्यामुळे पंडवानीला केवळ उत्सवापुरती मर्यादित न ठेवता ती दैनंदिन सांस्कृतिक जीवनाचा भाग बनविणे आवश्यक आहे. तीजनबाई यांनी आपल्या कलेतून महाभारताला लोकभाषेत नवा अर्थ दिला. त्यांच्या आवाजात भीमाचा पराक्रम, अर्जुनाचे शौर्य, द्रौपदीचा स्वाभिमान आणि श्रीकृष्णाचे तत्त्वज्ञान जिवंत होत असे. त्यांच्या जाण्यानंतर तो आवाज कदाचित ऐकू येणार नाही. परंतु त्यांनी चेतविलेली सांस्कृतिक ज्योत विझू नये. पंडवानीचे भविष्य एखाद्या कलाकारावर अवलंबून नाही हे खरेच; तरीही तीजनबाईंचे जाणे एखादा लख्ख तारा निखळल्यागत टोचते आहे. तीजनबाई यांच्या वारशाचे जतन, संवर्धन आणि नव्या पिढीकडे हस्तांतरण करणे ही कलाकार, संशोधक, शासन, सांस्कृतिक संस्था आणि रसिक समाज या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. व्यक्ती नश्वर असते. परंतु, तिच्या कार्यातून निर्माण झालेली सांस्कृतिक परंपरा अमर होऊ शकते. तीजनबाई यांचे कार्य हे याच अमरत्वाचे तेजस्वी उदाहरण आहे. ■

## आंतरराष्ट्रीय

# हसीना यांच्या भूमिकेने राजकीय हादरा

**प्रा. जयसिंग यादव**

इतिहासाची एक विलक्षण सवय असते. तो कधीच कोणत्याही नेत्याला कायमचा निरोप देत नाही. एका हाताने तो सत्तेचा मुकुट हिसकावून घेतो तर दुसऱ्या हाताने पुनरागमनाची आशा जिवंत ठेवतो. कालपर्यंत ज्यांच्या एका शब्दावर संपूर्ण राष्ट्राचे राजकारण फिरत होते, त्याच नेत्याला आज निर्वासिताचे जीवन जगावे लागते आणि निर्वासनात असतानाच तो पुन्हा मायभूमीत परतण्याची घोषणा करतो. बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांनी 'याच वर्षी मी बांगलादेशमध्ये परतणार' असे जाहीर करताच ढाक्यापासून दिल्लीपर्यंतच्या राजकीय वर्तुळात पुन्हा खळबळ उडाली. एका वाक्याने संपूर्ण राजकीय पट पुन्हा हलू शकतो, याचे हे जिवंत उदाहरण आहे. बांगलादेशच्या विकासाचा चेहरा म्हणून गौरवल्या जाणाऱ्या हसीना आज शेकडो गुन्ह्यांना सामोऱ्या जात आहेत.

हसीना यांच्या नेतृत्वाखाली बांगलादेशने वस्त्रोद्योगात जागतिक स्थान मिळवले, महिलांचे आर्थिक सक्षमीकरण वाढले, पायाभूत सुविधा विस्तारल्या, गरिबीमध्ये घट झाली आणि आर्थिक वाढीचे अनेक विक्रम नोंदवले. दुसरीकडे विरोधकांवरील कारवाई, प्रसारमाध्यमांवरील निर्बंध, निवडणुकांच्या निष्पक्षतेबाबतचे प्रश्न आणि वाढती केंद्रीकृत सत्ता यांमुळे त्यांच्यावर सातत्याने टीकाझाली. म्हणूनच आज त्यांच्याबद्दलचा जनमताचा कौल सरळ नाही, तर तो आशा आणि अविश्वास यांच्या मधोमध उभा आहे. २०२४ मधील विद्यार्थी आंदोलनाने बांगलादेशचा राजकीय इतिहास बदलला. हजारो तरुण रस्त्यावर उतरले. बेरोजगारी, आरक्षण, प्रशासनातील कथित दडपशाही आणि लोकशाही संस्थांवरील प्रश्न या सगळ्यांनी आंदोलनाला वेग दिला. अखेरीस सत्तेचा अभेद्य किल्ला कोसळला आणि हसीना यांना देश सोडावा लागला. अवामी लीग हा केवळ एक राजकीय पक्ष नाही, तर बांगलादेशच्या स्वातंत्र्यलढ्याशी जोडलेला भावनिक वारसा आहे. राष्ट्रपिता शेख मुजीबुर रहमान यांच्या नेतृत्वाखाली जन्मलेला हा पक्ष आजही त्यांच्या कुटुंबाभोवती फिरतो. त्यामुळे हसीना यांनी पक्षाचे नेतृत्व दुसऱ्याच्या हाती दिले असते, तर तो केवळ संघटनात्मक बदल ठरला नसता, तर मुजीब कुटुंबाच्या राजकीय वारशाच्या अस्तित्वालाच आव्हान ठरला असता. त्यामुळे त्यांनी स्वतःच पुनरागमनाची घोषणा करून हा वारसा अजूनही आपल्या हातात असल्याचा संदेश दिला आहे; पण प्रश्न केवळ अवामी लीगचा नाही. प्रश्न आहे बांगलादेशमधील लोकशाहीचा. एखादा नेता कितीही लोकप्रिय असला, तरी लोकशाहीची ताकद व्यक्तीपेक्षा संस्थांमध्ये असते. न्यायालये स्वतंत्र असली पाहिजेत, निवडणुका विश्वासार्ह असल्या पाहिजेत आणि विरोधी पक्षाला राजकीय अवकाश मिळाला पाहिजे. दुर्दैवाने दक्षिण आशियामध्ये ही तीनही तत्त्वे अनेकदा राजकीय संघर्षात हरवून जातात. भारत आणि बांगलादेश यांच्यातील संबंध गेल्या दशकात एका नव्या उंचीवर पोहोचले. सीमावादाचा तोडगा, ईशान्य भारतासाठी संपर्कमार्ग, दहशतवादविरोधी सहकार्य, ऊर्जा देवाणघेवाण आणि व्यापारवाढ यामुळे दोन्ही देशांमध्ये विश्वासाचे नवे पर्व सुरू झाले. या प्रक्रियेत हसीना यांची भूमिका महत्त्वाची होती. त्यामुळे त्यांचे राजकीय भवितव्य भारतासाठीही धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाचे आहे; मात्र भारताने आजवर संयमाची भूमिका घेतली आहे. कारण शेजारी देशांच्या अंतर्गत राजकारणात प्रत्यक्ष हस्तक्षेप केल्यास त्याचे दूरगामी परिणाम होऊ शकतात. या संपूर्ण घटनाक्रमात सर्वाधिक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे न्याय आणि सूड यातील सीमारेषा. एखाद्या नेत्यावर गंभीर आरोप असतील, तर त्यांची निष्पक्ष चौकशी झालीच पाहिजे; पण न्यायव्यवस्था राजकीय सूडाचे साधन बनली, तर लोकशाहीवरील विश्वास डळमळतो. आज हसीना यांच्या समर्थकांचा दावा आहे, की त्यांच्यावरील अनेक खटले हे राजकीय हेतूने प्रेरित आहेत. विरोधक मात्र त्यांना कायद्यापुढे उत्तरदायी ठरवण्याची मागणी करतात. सत्य नेमके कुठे आहे, हे न्यायसंस्थेलाच ठरवावे लागेल. राजकारणातील पुनरागमनाच्या कथा लोकांना अनेकदा आकर्षित करतात. कारण त्या आशेच्या कथा असतात. पराभवानंतर पुन्हा उभे राहण्याच्या कथा असतात; पण प्रत्येक पुनरागमन यशस्वीच होईल, याची शाश्वती नसते.

पाकिस्तानमध्ये नवाज शरीफ परतले; पण राजकीय समीकरणे बदलली होती. इम्रान खान आज तुरुंगात असूनही जनमताचा केंद्रबिंदू आहेत. श्रीलंकेत राजपक्षे घराण्याची ताकद कमी झाली. नेपाळमध्ये नेतृत्व वारंवार बदलते. दक्षिण आशियातील लोकशाही अजूनही व्यक्तींच्या प्रभावातून पूर्णपणे मुक्त झालेली नाही. हसीना यांच्या बाबतीतही हेच सत्य आहे. त्या परततील. त्यांना कदाचित अटकही होईल, न्यायालयीन लढाईही सुरू राहील; पण त्यांच्या एका घोषणेमुळे एवढे स्पष्ट झाले आहे, की त्या अजूनही बांगलादेशच्या राजकारणातील सर्वांत प्रभावशाली व्यक्तिमत्त्वांपैकी एक आहेत. त्यांच्या अनुपस्थितीतही राजकारण त्यांच्याभोवती फिरते, हेच त्यांच्या राजकीय वजनाचे प्रतीक आहे; परंतु अखेरीस प्रश्न एका व्यक्तीचा नाही, तर एका राष्ट्राच्या राजकीय परिपक्वतेचा आहे. लोकशाहीची खरी ताकद सत्तांतरात नसते, तर सत्तांतरानंतरही संवाद टिकवून ठेवण्यात असते. विरोधकांना संपवणे सोपे असते. त्यांच्याशी स्पर्धा करत लोकशाही मजबूत करणे कठीण असते. बांगलादेश आज या दोन मार्गांच्या फाट्यावर उभा आहे. हसीना यांच्या पुनरागमनाची घोषणा म्हणूनच एका व्यक्तीच्या इच्छेपेक्षा अधिक मोठी आहे. ती इतिहासाशी संवाद साधणारी घोषणा आहे. ती सत्तेच्या क्षणभंगुरतेची आठवण करून देणारी आहे. ती दक्षिण आशियातील लोकशाहीला स्वतःकडे पुन्हा पाहण्यास भाग पाडणारी आहे. उद्या त्या बांगलादेशमध्ये परततील किंवा नाहीत, हा प्रश्न काळ उत्तर देईल; पण त्यांच्या या घोषणेने एक गोष्ट निश्चित केली आहे, ती म्हणजे इतिहासाने अजून त्यांच्यावर पूर्णविराम दिलेला नाही. त्याने फक्त आणखी एक स्वल्पविराम टाकला आहे.

राजकारणात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात, ज्यांची उपस्थितीच संपूर्ण राजकीय समीकरणे बदलून टाकते. हसीना या अशाच नेत्यांपैकी एक आहेत. सत्तेवरून हकालपट्टी, शेकडो गुन्हे, मृत्युदंडाची शिक्षा, भारतातील वास्तव्यासारख्या अभूतपूर्व घटनांनंतर आता 'याच वर्षी मी बांगलादेशात परतणार' या त्यांच्या घोषणेने ढाका आणि नवी दिल्ली या दोन्ही राजधान्यांमध्ये राजकीय चर्चांना वेग आला आहे. ही केवळ एका माजी पंतप्रधानाच्या पुनरागमनाची घोषणा नाही, तर बांगलादेशच्या भविष्यातील राजकारण, लोकशाही, भारत-बांगलादेश संबंध आणि दक्षिण आशियातील सामरिक समीकरणांवर परिणाम करू शकणारी घटना आहे. ■

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**चंद्रकांत लोहाणा**

# एनजीओच्या दुकानदारीवर लगाम

मोदी सरकारचा प्रत्येक निर्णय हा भारतीयत्वाने भारलेला असतो. त्यामध्ये देश आणि सामान्य नागरिकांच्या हिताला बाधा येणार नाही, याची पुरेपूर काळजी घेतली जाते. अशाच एका निर्णयाने पुन्हा एकदा काँग्रेस आणि मोदी विरोधकांचे धाबे दणाणले आहेत. त्यामुळे या सर्वांची तळपायातली आग मस्तकात गेली असून, संपूर्ण इकोसिस्टिम बैचेन आहे. देशामधील गैरसरकारी स्वयंसेवी संस्थांना मिळणाऱ्या विदेशी देणग्यांबाबत केंद्र सरकारने केलेले कडक नियम हीच त्याची मूळ समस्या आहे. विदेशी पैशावर राजरोसपणे चालणारी आपली दुकानदारी यापुढे बंद होईल; या धास्तीने या सर्वांचे धाबे दणाणले आहेत. त्यामुळे या कायद्यामधील नवीन सुधारणा रद्द करण्यासाठी या सर्वांनी आकाश पाताळ एक करणे सुरू केले असून, पुन्हा एकदा या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदींवर आगपाखड सुरू केली आहे. या संस्थांना विदेशातून मिळणारा पैसा मूळ उद्देशासाठी कधीच वापरला जात नाही आणि देणाऱ्याचाही उद्देश वेगळाच असतो. भारताला आतून पूर्णपणे पोखरून काढणे या एकमेव उद्देशाने विदेशातून पैशाचा ओघ सतत सुरू असतो. भारतीयांचे धर्मांतरण करून येथील डेमोग्राफी बदलून आपले वर्चस्व स्थापित करण्यासाठी हा पैसा मागील अनेक दशकांपासून वापरला जात असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे समाजसेवेच्या नावाखाली विदेशातून येणारा पैसा जर भारतीयत्व नष्ट करण्यासाठी वापरला जात असेल तर ही बाब कोणताही देशभक्त कधीच सहन करणार नाही. त्यामुळे मिळणाऱ्या परकीय निधीबाबत कठोर नियम केले आहेत.



विदेशातून येणारा पैसा नेमका कोठे आाणि कसा वापरला याबाबत यापुढे सरकारला पूर्ण हिशेब द्यावा लागणार आहे. पूर्वी असा कोणताही नियम नसल्याने या कथित स्वयंसेवी संस्था देशातील हिंदू व आदिवासी यांची मूळ सभ्यता आणि आणि संस्कृती नष्ट करण्यासाठी हा पैसा वापरत असल्याचा सतत आरोप होत होता. हा आरोप तथ्यहीन आहे, असेही नाही. २०१४ मध्ये जेव्हा नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले त्यावेळी देशामध्ये जवळपास चाळीस हजार गैरसरकारी स्वयंसेवी संस्थांना देणग्या मिळत होत्या. अण्णा हजारे यांच्या आंदोलनानंतर २० हजार ७०० स्वयंसेवी संस्थांचे परवाने रद्द केले गेले. २०२०-२०२२ दरम्यान १३ हजार ५२० स्वयंसेवी संस्थांना ५५ हजार कोटी रुपयांच्या विदेशी देणग्या या संस्थांना मिळाल्या. या पैशाचा विनियोग देशामध्ये कशाप्रकारे केला गेला, याचा हिशेबच या संस्थोजवळ नाही. त्यामुळे यापुढेही अशीच ही दुकानदारी सुरू राहिली तर भविष्यामध्ये भारतावर केवढे मोठे गंभीर संकट येऊ शकते याची कल्पनाही न केलेली बरी. नवीन नियमानुसार या स्वयंसेवी संस्थांना यापुढे मिळालेल्या एकेका पैशाचा हिशेब सरकारला द्यावा लागणार आहे. त्यामुळे काँग्रेसने तर हा नवीन कायदाच रद्द करण्याची मागणी केली आहे. यापुढे धर्मांतरण होणार नाही. बाहेरून पैसा येणार नाही. पक्ष कसा चालवायचा हा प्रश्न काँग्रेससमोर उभा राहिला आहे. मानवतेच्या कल्याणासाठी जगामधील बलाढ्य देश दरवर्षी अब्जावधी रुपये कधीच खर्च करणार नाही. पाश्चिमात्य देशांचा इतिहास पाहिला तर अनेक धक्कादायक बाबी समोर येतील. काँग्रेसच्या राजवटीमध्ये हा गोरखधंदा सर्वाधिक फोफावला. सर्व काही बिनदिक्कत सुरू होते. काँग्रेसला या राष्ट्राच्या संस्कृतीशी काहीएक देणेघेणे नाही. राष्ट्रहिताचा कोणताही निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतला की, काँग्रेसच्या व अन्य विरोधकांच्या पोटामध्ये दुखते. सर्व जंतरमंतरकडे धाव घेतात. त्यामुळे राष्ट्रद्रोहच यांचा धर्म बनला की काय अशी शंका निर्माण होते. त्यामुळे प्रत्येक विदेशी कटकारस्थानामध्ये यांचा सहभाग आहे किंवा नाही याची सखोल चौकशी करून सरकारने सोक्षमोक्ष लावायला हवा. त्यामुळे जनतेलाही खरे काय ते कळायला सोपे होईल. धर्मांतरण ही राष्ट्राला हळूहळू पोखरणारी कीड आहे. त्यामुळे विदेशी पैशावर चालणारे हे कारस्थान उधळून लावण्याचे प्रत्येक राष्ट्रप्रेमी नागरिकांचे कर्तव्य आहे. त्यासाठी एक सजग प्रहरी म्हणून प्रत्येकाने डोळ्यात तेल घालून आपल्या सभोवताल लक्ष ठेवायला हवे. ■

९८८१७१७८५६

## कानोसा

# तरुणांच्या तेजाला आवाहन

**अमोल पुसदकर**

हे वर्ष राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शताब्दी वर्ष आहे. यानिमित्ताने विविध कार्यक्रम संपूर्ण देशभर आयोजित करण्यात आलेले आहेत. आता सर्वत्र युवा संमेलन असे कार्यक्रम सुरू आहेत. भारत हा तरुणांचा देश आहे. याचा अर्थ असा की, भारतामध्ये राहणारी जवळपास ६५ टक्के जनता ही ३५ पर्यंतच्या वयोगटातील आहे. या देशामध्ये जी काही क्रांती झालेली आहे, नवीन गोष्ट झालेली आहे, ती तरुणांनीच केलेली आहे. आर्य चाणक्यांनी तरुण चंद्रगुप्ताच्या मदतीने क्रांती घडवून आणली आणि नंद वंशाचा अत्याचारी राजा धननंद याचा विनाश केला. भारत छोट्या छोट्या गणराज्यांमध्ये विभागलेला होता. त्यातल्या छोट्या गणराज्यांना एकत्रित करून सिकंदरचा सेनापती सेलूकस याचा पराभव केला व संपूर्ण देशामध्ये अखंडतेची आणि एकतेची भावना निर्माण केली.

महाराणा प्रताप यांनी अकबराच्या विरोधात अगदी वयाच्या सोळाव्या वर्षीच आजन्म लढण्याची प्रतिज्ञा केली. छत्रपती शिवाजी महाराजांनी सुद्धा हिंदवी स्वराज्याची प्रतिज्ञा वयाच्या सोळाव्या वर्षीच केली. स्वामी विवेकानंद सुद्धा तरुण वयातच प्रसिद्ध झाले होते. संघ संस्थापक पूजनीय डॉ. हेडगेवार यांनी सुद्धा विद्यार्थी तसेच स्वातंत्र्य लढ्यात उडी घेतलेली होती व त्यावेळच्या अनुभव आणि चिंतनातूनच पुढे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना त्यांनी केली. संघ स्थापनेच्या वेळी जे किशोर आणि तरुण होते, तेच पुढे भारतातील विविध प्रांतांमध्ये संघ विचाराच्या प्रचारार्थ गेले व तेथे त्यांनी संघ रुजविला व वाढविला. यावरून आपल्या असे लक्षात येते की, सर्व महत्त्वाच्या घटनांमध्ये तरुणांचा सहभाग राहिलेला आहे.

देशाची युवाशक्ती ही देशाचा खूप मोठा आधार आहे. त्यामुळेच ही युवाशक्ती देशभक्त व ध्येयवादी असणे आवश्यक आहे. या युवाशक्तीला देशाचा गौरवशाली इतिहास, आपल्या पूर्वजांनी व क्रांतिकारकांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी, सन्मानासाठी दिलेला लढा व केलेले बलिदान याची सुद्धा माहिती सांगणे आवश्यक आहे. आज भारत जगातील सर्वांत वेगाने प्रगती करणाऱ्या राष्ट्रांपैकी एक आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग, संरक्षण, अवकाश संशोधन, कृषी, शिक्षण, क्रीडा आणि उद्योजकता या सर्व क्षेत्रांमध्ये भारत नवीन उंची गाठत आहे. परंतु या प्रगतीचा खरा पाया देशातील परिश्रमी, कर्तव्यनिष्ठ आणि राष्ट्रभक्त युवक आहेत. केवळ आर्थिक प्रगती पुरेशी नसते; त्याबरोबर नैतिक मूल्ये, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रीय चारित्र्य यांचीही जोपासना आवश्यक असते. आमच्या धर्मग्रंथांमधून सुद्धा श्रेष्ठ जीवन जगण्यास आवश्यक अशी जीवनमूल्ये तरुणांना मिळू शकतात.

आजच्या काळात युवकांसमोर अनेक संधी आहेत, परंतु त्याचबरोबर अनेक आव्हानेही आहेत. मोबाईल, सोशल मीडिया, व्यसनाधीनता, चुकीची माहिती, स्वार्थी जीवनशैली आणि पाश्चात्त्य अंधानुकरण यामुळे अनेक तरुण आपले ध्येय विसरत आहेत. अशा परिस्थितीत योग्य संस्कार, योग्य मार्गदर्शन आणि राष्ट्रहिताची जाणीव निर्माण करणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.

राष्ट्र प्रथम ही भावना म्हणजे स्वतःचे अस्तित्व विसरणे नव्हे, तर प्रत्येक निर्णय घेताना देशाच्या हिताला सर्वोच्च स्थान देणे होय. आपण कोणत्याही क्षेत्रात कार्यरत असलो तरी आपल्या कामातून देशाची प्रगती कशी होईल, समाजाचे भले कसे होईल आणि पुढील पिढीसाठी आपण काय योगदान देऊ शकतो याचा सातत्याने विचार करणे हीच राष्ट्र प्रथमची खरी भावना आहे. देशाच्या सीमांचे संरक्षण करण्यासाठी अगदीच कोवळ्या तरुण वयात आपल्या जीवनाचे बलिदान करणारा सैनिक हा राष्ट्र प्रथम याचे सर्वोच्च उदाहरण आहे. युवकांमध्ये अमर्याद ऊर्जा असते. ही ऊर्जा योग्य दिशेने वापरली तर राष्ट्रनिर्मिती होते; चुकीच्या दिशेने वापरली तर समाजात अराजकता निर्माण होते. समाजातील काही लोक हे तरुणांना कॉक्रोच म्हणून त्यांचे संघटन करण्याचा प्रयत्न करीत असतात. तरुणांना कॉक्रोच संबोधणे किंवा कॉक्रोचच्या नावावर त्यांचे संघटन करणे म्हणजे त्यांना देशाच्या गौरवशाली इतिहासापासून दूर नेणेच आहे. म्हणूनच युवकांना शिस्त, संघटन, सेवा, समर्पण आणि स्वावलंबन या मूल्यांचे शिक्षण देणे अत्यंत आवश्यक आहे. संघटनशक्तीमुळे सामान्य माणूसही असामान्य कार्य करू शकतो. इतिहासात याची अनेक उदाहरणे आहेत.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने गेल्या शंभर वर्षांत व्यक्तिनिर्माण, समाजसंघटन आणि राष्ट्रनिर्माण या त्रिसूत्रीवर सातत्याने कार्य केले आहे. शाखेच्या माध्यमातून शारीरिक, बौद्धिक आणि राष्ट्रीय चारित्र्यनिर्मितीचे कार्य घडवून लाखो स्वयंसेवक समाजजीवनाच्या विविध क्षेत्रांत कार्यरत झाले आहेत. शिक्षण, ग्रामविकास, सेवा, पर्यावरण, आपत्ती व्यवस्थापन, सामाजिक समरसता, कुटुंब प्रबोधन, स्वदेशी आणि संस्कृती संवर्धन अशा अनेक क्षेत्रांत स्वयंसेवक निःस्वार्थ भावनेने कार्य करीत आहेत. तरुणांकरिता देशासाठी आपला वेळ देणारे निःस्वार्थ बुद्धीने काम करणारे असे तरुण स्वयंसेवक हे आदर्श ठरू शकतात. तरुणांनी सुद्धा अशाच कुठल्यातरी कार्यामध्ये स्वतःला जोडून घेणे, वाहून घेणे आवश्यक आहे.

आज भारताला केवळ नोकरी शोधणारे युवक नकोत, तर रोजगार निर्माण करणारे युवक हवे आहेत. संशोधन करणारे, नवीन उद्योग उभारणारे, शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणारे, पर्यावरणाचे रक्षण करणारे, समाजातील दुर्बल घटकांना हात देणारे आणि देशाला आत्मनिर्भर बनविणारे युवक आजच्या काळाची गरज आहेत.

प्रत्येक युवकाने स्वतःला काही प्रश्न विचारले पाहिजेत. ज्यामध्ये मी माझ्या समाजासाठी काय करीत आहे? आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे माझ्या राष्ट्रासाठी माझे योगदान काय आहे? या प्रश्नांची प्रामाणिक उत्तरे देण्याचा प्रयत्नच युवकाला महान बनवू शकतात.

देशभक्ती ही केवळ घोषणांमध्ये नसते; ती आपल्या दैनंदिन आचरणात असते. प्रामाणिकपणे काम करणे, कायद्याचे पालन करणे, पर्यावरणाची काळजी घेणे, स्वच्छता राखणे, कर प्रामाणिकपणे भरणे, सामाजिक ऐक्य टिकविणे, जाती पंथाच्या पलीकडे जाऊन सर्वांना आपले मानणे आणि संकटाच्या काळात समाजाच्या मदतीला धावून जाणे, हीच खरी राष्ट्रसेवा आहे. आजच्या युवा पिढीने आपल्या शरीराचे आरोग्य, मनाची शुद्धता, आत्मविश्वास, बुद्धीची प्रगल्भता यांचा सातत्याने विकास केला पाहिजे. निरोगी शरीर, सुदृढ मन आणि राष्ट्रभक्त विचार यांच्या आधारावरच विकसित भारताचे स्वप्न साकार होऊ शकते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शताब्दी वर्ष हे केवळ एका संस्थेचा वर्धापनदिन नाही, तर राष्ट्रकार्याचा संकल्प अधिक दृढ करण्याची संधी आहे. या निमित्ताने प्रत्येक युवकाने समाजाशी जोडले गेले पाहिजे, सेवाकार्यात सहभागी झाले पाहिजे, आपल्या संस्कृतीचा अभिमान बाळगला पाहिजे आणि भारताला जगातील सर्वश्रेष्ठ राष्ट्र बनविण्याच्या ध्येयासाठी स्वतःला समर्पित केले पाहिजे. त्यासाठी राष्ट्र प्रथम हा संकल्प आवश्यक आहे. ■

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### राखावी बहुतांची अंतरे, भाग्य तद नंतरे

आपल्या भारतीय समाजाची जडणघडण ही वैविध्यपूर्ण आहे. महाराष्ट्राला तर संतांची महान परंपरा लाभली आहे. संत ज्ञानेश्वर महाराज ते संत तुकडोजी महाराजपर्यंत प्रचंड मोठी मांदियाळी आहे. या सर्व संतानी त्यांच्या आचरणातून आणि साहित्य वांङ्मयातून समस्त समाजाला सदाचार, एकोपा, सलोखा, भक्ती व समरसतेचा संदेश दिला आहे. अभंग, ओव्या, पोवाडे, गीत, श्लोक, प्रवचने उपलब्ध माध्यमातून सामान्य मनुष्याचे जीवन समृद्ध केले आहे.

'राखावी बहुतांची अंतरे, भाग्य तद नंतरे' हा दोन ओळींचा उपदेश अर्थपूर्ण आहे. आपण नेहमी इतरांच्या मनाचा सांभाळ करावा, त्यांना दुखवू नये. जर आपण दुसऱ्याच्या मनातलं जपलं तर आपलं भाग्य आपोआप आपल्या मागे येतं. संत एकनाथ हे समाजाला माणुसकी, नम्रता, आणि समभाव शिकविण्यासाठी ओळखले जातात. ही ओवी त्याच शिकवणीचा भाग आहे. कुटुंब किंवा समाजात अनेक वेळा आपल्याला ही नम्रतेची भूमिका निभवावी लागते. कुटुंबात व्यक्तिपरत्वे वैचारिक भिन्नता असते. एखाद्या क्लिष्ट आणि संवेदनशील विषयांवर सहमती झाली तर कौटुंबिक सौहार्द कायम राहून कुटुंबात सलोखा निर्माण होऊन त्याचे दूरगामी सुखदायक परिणाम येणाऱ्या पिढीवर होतात, त्यांना शिकवण मिळते. थोरामोठ्यांचा मानसन्मान राखला जातो आणि कुटुंबात एकतेची भावना निर्माण होऊन सुख- दुःखात त्याची प्रचीती येते. वैचारिक मतभेद हे समाजात अपेक्षित आहेत. 'मुंडे-मुंडे मर्ती भिन्नः' प्रमाणे विचार मंथन, चिंतन व मतपरिवर्तन करून सहमती प्राप्ती करून घेणे, ही तारेवरची कसरत असते. हे कार्य करण्यासाठी त्या व्यक्तीमध्ये अनुभव, मुत्सद्देगिरी, मृदुभाषी व इतरांप्रति सर्वार्थाने आदर असला तर मतभेद वेळीच जिरवायला मदतच होते आणि संस्थेचे कार्य प्रगतिपथावर येते. याच्या विरुद्ध आचरणातून मतभेदाचे रूपांतर मनभेदात होऊन विघटन होते, बाह्य स्वार्थी शक्ती कार्यरत होतात समाजात अशा अनेक उत्तम संस्था अधोगतीला लागल्या आहेत. तेव्हा सामाजिक कार्य करीत असताना संतांच्या शिकवणीचे स्मरण झाल्यास अनर्थ होणार नाही, हे निश्चित.

**संजय पाठक**/९४२२१४७६७७

### डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या जीवनावरील लेख उत्कृष्ट

दि. ६ जुलैच्या तरुण भारतच्या संपादकीय पानावर माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जींच्या जीवनावरील लेख अभ्यासपूर्ण आहे. त्यावरून साहित्य क्षेतातही पंतप्रधानांची छाप प्रकर्षाने जाणवते. जे सत्य आहे ते परखडपणे मांडण्याची त्यांची वृत्ती येथेही जाणवते. त्यांच्या कार्यबाहुल्यातूनही वेळ काढून हा दीर्घ लेख त्यांनी लिहिला व आपणही तत्परतेने तो आपल्या वाचकांसाठी प्रस्तुत केला यासाठी आपले अभिनंदन.

**किशोर आपटे**/खराडी ज्येष्ठ नागरिक सदस्य.
७८८८१६४४७१

■■■

### कलासक्त पद्मविभूषण तीजनबाई



छत्तीसगडमधील आदिवासी समाजातील कलासक्त तीजनबाई यांनी भारताचे सांस्कृतिक संचित असलेल्या पंडवानी या लोककलेला जागतिक स्तरावर नेऊन महत्त्वपूर्ण कामगिरी केली. त्यामुळेच त्या पद्मश्री, पद्मभूषण आणि पद्मविभूषण या नागरी पुरस्कारांच्या मानकरी ठरल्या. अतिशय खडा, भारदस्त आणि तितक्याच गोड आवाजाची उपजत देणगी लाभलेल्या तीजनबाई सर्वांगसुंदर मुद्राभिनयाने रामायण-महाभारतातील प्रसंग जिवंत करत. त्यांच्या सादरीकरणातून त्यांना पाहणे आणि ऐकणे हा विलक्षण आनंद मिळायचा. त्यांच्या जाण्याने भारतीय सांस्कृतिक क्षेत्राची अपरिमित हानी झाली आहे.

**डॉ. सुनील भंडगे**/आनंदनगर, पुणे

### 'त्या' लाचखोरांचे पुढे काय होते ?

'लाचखोर अधिकाऱ्याच्या घरात आढळले तीन कोटींचे घबाड' ही बातमी वाचली. अमक्या तमक्याला सापळा रचून लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडून अटक झाली अशा बातम्या नियमित येत असतात. सामान्य नागरिकांनाही बातमी वाचून बरे वाटते की सरकार कारवाई करते आहे. परंतु कालांतराने संबंधित प्रकरणात गुन्हा सिद्ध होऊन न्यायालयाने शिक्षा ठोठावली का? लाचखोर सरकारी कर्मचारी /अधिकारी असल्यास नोकरीतून हकालपट्टी करण्यात आली आहे का? याबद्दल काहीच कळत नाही. दीर्घकालीन न्यायालयीन खटल्यामुळे अनेक प्रकरणांत दोषसिद्धी न होण्याचीही शक्यता जास्तच. म्हणून किती लाचखोरांवर गुन्हे दाखल झाले, विभागीय शिस्तभंग कारवाई, आरोप सिद्ध होऊन न्यायालयाने ठोठावलेल्या शिक्षेची अंमलबजावणी याबाबतची आकडेवारी शासनातर्फे जनतेच्या माहितीसाठी नियमित जाहीर करण्याचा पायंडा पाडल्यास सामान्यांचा विश्वास दृढ होईल आणि लाचखोरांनाही जरब बसेल. ■

**राम राजे**/९४२१७७९९४५

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त...

### डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जयंती साजरी



तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. ७ जुलै : शहरातील आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या जनसेवा संपर्क कार्यालयात सोमवारी भारतीय जनसंघाचे संस्थापक, महान राष्ट्रपुरुष,प्रखर राष्ट्रभक्त अखंड भारताचे पुरस्कर्ते डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त तालुकाध्यक्ष माधवराव बिरादार यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

त्या प्रसंगी ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष गोविंदराव चिलकुरे, पंचायत समिती सभापती संजय सुर्यवंशी जेष्ठ नेते धोंडीराम सांगवे साहेब, नगराध्यक्ष रतन शिवणे, गणेश खरटमोल, संगायो समिती अध्यक्ष गणेश सलगरे, साकोळ पंस सदस्य तुकाराम लांडगे, माजी नगराध्यक्ष गणेश धुमाळे, पाणी पुरवठा सभापती विरभद्र मुदाळे ,नगरसेवक अनंत काळे, माधव खरटमोल, संदीप बिरादार, डॉ मुजेवार, सिध्दलिंग शिवणे,शहाजी पाटील, रामदास भुसागरे, सुभाष भंडे व तालुक्यातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. तत्पूर्वी मान्यवरांनी डॉ श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या जीवनावर सखोल मार्गदर्शन केले .

## सभापतींची शाळेला अचानक भेट; विद्यार्थ्यांच्या अभ्यासाबद्दल शिक्षकांना दिल्या सूचना
# दांडी मारणाऱ्या शिक्षकावर होणार कारवाई : संजय सूर्यवंशी

तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. ७ जुलै : सभापतींनी तालुक्यातील मौजे थेरगाव येथील जि.प. प्राथमिक शाळेला सोमवारी अचानक भेट दिली. वर्गात जाऊन विद्यार्थ्यांची वाचन-लेखन क्षमता तपासल्यानंतर सभापतींनी शिक्षकांची बैठक घेऊन अभ्यासाबाबत महत्त्वाच्या सूचना केल्या.




वाचन-लेखन-गणितावर भर द्या, इयत्ता दुसरी नंतरच्या प्रत्येक मुलाला मराठीचे पुस्तक धडे वाचता आले पाहिजे. स्वतःचे नाव, पत्ता लिहिता आला पाहिजे. चौथीच्या विद्यार्थ्यांना विस पर्यंत पाडे तोंडपाठ हवेत. यात तडजोड नाही.

दुसरी पासून पाढे न समजणारा विद्यार्थी आढळून आला नाही पाहिजे त्याची जबाबदारी ज्या त्या शिक्षकांवर राहील.

वर्गात १० मुले असतील तर १०ही मुलांना समजले पाहिजे. फक्त हुशार एक , दोन मुलांना विचारून पाठ पुढे नेऊ नका. मागे राहणाऱ्या मुलांसाठी रोज तीस मिनिटे 'उजळणी तास' घ्या.

विद्यार्थ्यांचे दप्तर तपासणी सक्तीची करा

दररोज प्रत्येक विद्यार्थ्याचे दप्तर व वह्या तपासा. गृहपाठ दिला असेल तर तो तपासल्याशिवाय पुढचा धडा शिकवू नका. पालकांनाही महिन्यातून एकदा वह्या दाखवा.

विद्यार्थ्यांना त्यांना समजेल अशा कृतीतून शिक्षण द्या फक्त फळ्यावर लिहून पाठांतर नको. पाढे शिकवताना खडे मोजा. विज्ञान शिकवताना शाळेच्या बागेत न्या. परिसर हीच तुमची प्रयोगशाळा आहे.त्याच बरोबर शिक्षकांना वेळेवर येण्याची सुचना करण्यात आली शाळा भरण्याच्या अगोदर किमान पंधरा मिनिटे आले पाहिजे तुम्ही उशिरा आलात तर पोरं काय शिकणार? तसेच शिक्षकांनी मोबाईल वर्गाबाहेर ठेवावे

तास सुरू असताना मोबाईलवर बोलणे, व्हॉट्सअप बघणे बंद करा. ४५ मिनिटे फक्त विद्यार्थ्यांसाठी द्या. मुख्याध्यापकांनी यावर लक्ष ठेवावे.फक्त रिझल्टच्या दिवशी पालकांना बोलावू नका. कोणते मूल कुठे कमी पडतेय ते पालकांना सांगा. त्यासाठी पालक सभा दर महिन्याला घ्या. जेवढे विद्यार्थी तेवढ्या कुटुंबांचे भविष्य तुमच्या हातात आहे हे लक्षात ठेवा मी पुढच्या महिन्यात येईन तेव्हा प्रगती दिसली पाहिजे.या सर्व सुचनांचे काटेकोर पालन केले जाईल असे उपस्थित शिक्षक बिराजदार सर आणि सांभाळे सर यांनी सभापती संजय सुर्यवंशी यांना दिले.

या धडक भेटीमुळे तालुक्यातील इतर जि.प. शाळांमधील शिक्षकही आता सावध झाले आहेत.

## तहसीलदारांच्या हस्ते एस आय आर अभियानाचा शुभारंभ




तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. ७ जुलै : शहरात भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राबविण्यात येत असलेल्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (ड्खठ) अभियानाचा शुभारंभ शिरूर अनंतपाळ शहरात तहसीलदार किशोर यादव यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी तहसील कार्यालयातील निवडणूक शाखेच्या अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या तसेच मतदार यादी अद्ययावत करण्याचे काम पारदर्शक व वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले.

या अभियानांतर्गत नवीन मतदारांची नोंदणी,मृत व स्थलांतरित मतदारांची नावे वगळणे,तसेच मतदार यादीतील त्रुटी दुरुस्त करण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह संबंधित बूथ लेव्हल अधिकारी (इड्ज) किंवा तहसील कार्यालयाशी संपर्क साधून आपली माहिती अद्ययावत करून घ्यावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

शुभारंभप्रसंगी तहसील कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी तसेच निवडणूक विभागाचे प्रतिनिधी,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (श.प.) माजी शहराध्यक्ष संदिप धुमाळे तसेच नागरिक उपस्थित होते. एसआयआर अभियानामुळे मतदार यादी अधिक अचूक व अद्ययावत होण्यास मदत होणार असून प्रत्येक पात्र नागरिकाने या अभियानात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.

## टाकाऊ वस्तूंपासून तयार केले विद्यार्थ्यांने शेकडो फलक पुसण्याचे डस्टर

तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. ७ जुलै : कलेतून आनंदही, शिक्षणही या संकल्पनेला मूर्त स्वरूप देत यशवंत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अहमदपूर येथे विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला आणि कौशल्याला वाव देणारा अभिनव उपक्रम राबविण्यात आला.

विद्यालयाचे उपक्रमशील कलाशिक्षक महादेव खळुरे यांच्या मार्गदर्शनाखाली 'वेस्ट इज बेस्ट' या संकल्पनेवर आधारित टाकाऊ वस्तूंपासून फलक पुसण्यासाठी उपयोगी पडणारे डस्टर तयार करण्याचा उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

विद्यार्थ्यांच्या अंगी सृजनशीलता, स्वावलंबन, पर्यावरण संवर्धनाची जाणीव आणि श्रमप्रतिष्ठेची भावना शालेय जीवनातच रुजावी, तसेच टाकाऊ वस्तूंचा पुनर्वापर करून त्यांना उपयुक्त स्वरूप देता येते, हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावा या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला.

यामध्ये विद्यार्थ्यांनी घरातील वापरात नसलेले स्पंज, कापडाचे तुकडे, फोम, कार्डबोर्ड, प्लास्टिकचे तुकडे व इतर टाकाऊ साहित्याचा कल्पकतेने वापर करून आकर्षक, मजबूत व उपयुक्त असे फलक पुसण्याचे डस्टर तयार केले. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या कल्पकतेचा वापर करत वेगवेगळ्या प्रकारचे डस्टर तयार करून कलात्मकतेचा सुंदर आविष्कार घडविला.

कौशल्यपूर्ण उपक्रमात विद्यालयातील शेकडो विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी तयार केलेले डस्टर केवळ आकर्षकच नव्हे, तर दैनंदिन शालेय वापरासाठीही उपयुक्त ठरले. त्यामुळे शिकत शिकत निर्मिती आणि करून शिकणे या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील (छएझ २०२०) कौशल्याधारित शिक्षणाच्या संकल्पनेलाही या उपक्रमातून प्रभावी बळ मिळाले.

कलाशिक्षक महादेव खळुरे यांनी विद्यार्थ्यांना टाकाऊ वस्तूंचे योग्य नियोजन, पुनर्वापराचे महत्त्व, पर्यावरण संरक्षण आणि कलात्मक सादरीकरण याबाबत मार्गदर्शन केले. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये दडलेली सर्जनशीलता ओळखून तिला योग्य दिशा दिल्यास त्यातून नाविन्यपूर्ण निर्मिती घडू शकते, असा संदेश त्यांनी दिला.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्र्वास, कल्पकता, निरीक्षणशक्ती, समस्या सोडविण्याची क्षमता, हस्तकौशल्य आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीची जाणीव विकसित झाली. शिक्षक व पालकांनीही या उपक्रमाचे कौतुक करत अशा कृतीशील उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होत असल्याचे मत व्यक्त केले.

विद्यालयामध्ये राबविण्यात आलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारा, पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा आणि कौशल्याधारित शिक्षणाला चालना देणारा आदर्श उपक्रम ठरला आहे. वरील नाविन्यपूर्ण उपक्रमाबद्दल टागोर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. अशोक सांगवीकर, सचिव डी. बी. लोहारे गुरुजी, उपाध्यक्ष डॉ.भालचंद्र पैके,सहसचिव डॉ. सुनिता चवळे,प्राचार्य गजानन शिंदे, उपमुख्याध्यापक माधव वाघमारे, पर्यवेक्षक शिवाजी सुर्यवंशी, विजयकुमार चव्हाण आदिनी अभिनंदन व कौतुक केले.

### बनावट दिव्यांग प्रमाणपत्र सादर करून शासनाची फसवणूक करण्याचा प्रयत्न
## दोघा आरोपींना ३ वर्षांचा कारावास व प्रत्येकी १०,००० दंड

तभा वृत्तसेवा

निलंगा दि. ७ जुलै : नोकरी साठी बनावट दिव्यांग प्रमाणपत्र सादर करून शासनाची फसवणूक करण्याचा प्रयत्न करणाऱ्या निलंगा येथील दोन आरोपींना ३ वर्षांचा कारावास व प्रत्येकी १०,००० दंडाची शिक्षा सुनावली आहे.

शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या शासनाची फसवणूक व बनावट कागदपत्रांचा वापर करून नोकरी मिळविण्याच्या प्रयत्नाच्या प्रकरणात प्रभावी तपास, सक्षम पुरावे आणि न्यायालयीन पाठपुराव्याच्या बळावर दोन्ही आरोपींना न्यायालयाने दोषी ठरवत तीन वर्षांच्या कारावासाची तसेच प्रत्येकी १०,००० दंडाची शिक्षा सुनावली आहे.

याबाबतची थोडक्यात हकीकत अशी की, फिर्यादी बळीराम टोपाजी चव्हाण, तत्कालीन गटविकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर यांच्या फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दिनांक २३ फेब्रुवारी २००८ रोजी गुन्हा रजिस्टर क्रमांक ४५/२००८ अन्वये भारतीय दंड संहितेच्या कलम ४२०, ४६७, ४६८, ४७१ व ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपासादरम्यान असे निष्पन्न झाले की, आरोपी १) श्रीराम ज्ञानेश्र्वर पाटील, रा. रामकृष्ण नगर, निलंगा २) ज्ञानेश्र्वर वसंतराव दोडतल्ले, रा. माळेगाव, ता. निलंगा यांनी ग्रामसेवक पदाच्या भरती प्रक्रियेदरम्यान अर्जासोबत बनावट व खोटे दिव्यांग प्रमाणपत्र सादर करून शासनाची दिशाभूल करत नोकरी मिळविण्याचा प्रयत्न केला होता. या प्रकाराची दखल घेत संबंधितांविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्ह्याचा तपास तत्कालीन शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक डी. एस. बिराजदार यांनी करून आवश्यक पुरावे संकलित केले व न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

या खटल्यात सरकारी अभियोक्ता रामेश्वर ढेले यांनी सरकारतर्फे प्रभावी युक्तिवाद केला. फिर्यादी अधिकारी, जिल्हा परिषदेतील दोन अधिकारी, तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक तसेच तपास अधिकारी यांच्या साक्षी न्यायालयाने महत्त्वपूर्ण मानल्या. तसेच संबंधित दिव्यांग प्रमाणपत्र जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयातून कधीही निर्गमित झाले नसल्याचे पुराव्यांद्वारे सिद्ध झाल्याने आरोपींविरुद्धचा गुन्हा निर्विवादपणे सिद्ध झाला.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर मुख्य न्यायदंडाधिकारी श्रीमती एम. एन. चव्हाण यांनी दिनांक ०४ जुलै २०२६ रोजी आरोपी श्रीराम ज्ञानेश्र्वर पाटील व ज्ञानेश्र्वर वसंतराव दोडतल्ले यांना भारतीय दंड संहितेच्या कलम ४१७ व ४६८ अन्वये तीन वर्षांच्या कारावासाची तसेच प्रत्येकी १०,००० दंडाची शिक्षा सुनावली.

या खटल्याच्या यशस्वी न्यायालयीन पाठपुराव्यासाठी पोलीस अधीक्षक अमोल तांबे व अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली ट्रायल मॉनिटरिंग सेलचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवशंकर मनाळे तसेच पैरवी अंमलदार सचिन उस्तुरगे यांनी विशेष परिश्रम घेतले.

सोलापूर तरूण भारत
वाचणे चांगली सवय

## स्कूल बस खड्ड्यात उलटली ४ विद्यार्थी किरकोळ जखमी



तभा वृत्तसेवा

रेणापूर दि. ७ जुलै : रेणापूर तालुक्यातील पोहरेगाव येथील जनता विद्यालयाची विद्यार्थ्यांना घेऊन जाणारी स्कूलबस सोमवारी सकाळी साडे आठच्या सुमारास खानापूर पाटीजवळ रस्त्यालगतच्या खड्ड्यात पलटी झाली. या अपघातात ४ विद्यार्थ्यांना किरकोळ दुखापत झाली असून बसमधील उर्वरित सर्व विद्यार्थी सुखरूप बचावले आहेत.

जनता विद्यालय, पोहरेगाव येथे शिकणारे डिगोळ तांडा व ईटी खानापूर परिसरातील पाचवी ते नववीचे विद्यार्थी दररोज या स्कूलबसमधून शाळेत ये-जा करतात. बस (क्र. एम एच २४ बीडब्ल्यू २५६९) मध्ये अपघातावेळी सुमारे २७ विद्यार्थी होते. बस खानापूरहून पोहरेगावकडे जात असताना खानापूर पाटीजवळ समोरून येणाऱ्या वाहनाला रस्ता देण्याच्या प्रयत्न ात रस्त्याच्या कडेला असलेल्या

मातीवरून घसरली. चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने स्कुल बस रस्त्यालगतच्या खड्ड्यात पलटी झाली. संबंधित रस्ता अत्यंत खराब असल्यानेच हा अपघात घडल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले. या घटनेची माहिती मिळताच पोहरेगाव व खानापूर येथील नागरिक, जनता विद्यालयाच्या प्राचार्य शिक्षक तसेच परिसरातील ग्रामस्थांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत. बसमधील विद्यार्थ्यांना व कर्मचाऱ्यांना सुरक्षित बाहेर काढून रेणापूर ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. वैद्यकीय तपासणीनंतर ४ विद्यार्थ्यांना किरकोळ दुखापत झाल्याचे निदर्शनास आले. ४ विद्यार्थ्यांना उपचार व तपासणीसाठी लातूर येथील शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले. या अपघाताची माहिती मिळताच संस्थेचे अध्यक्ष ॲड. शिरीष यादव, सचिव सदानंद शिंदे यांनी ग्रामीण रुग्णालयास भेट देवून विद्यार्थी व पालकांना धिर दिला.

## संभाजी सेनेचे आंदोलन लेखी आश्वासनानंतर स्थगित

तभा वृत्तसेवा

रेणापूर दि. ७ जुलै : तालुक्यातील शेतरस्ते, महसूल व न्यायप्रविष्ट प्रकरणांतील प्रलंबित प्रश्र्न निकाली काढण्याच्या मागणीसाठी संभाजी सेनेच्या वतीने सोमवारी (दि. ६ जुलै) येथील तहसील कार्यालयासमोर पुकारण्यात आलेले आत्मदहन आंदोलन प्रशासनाकडून लेखी आश्र्वासन मिळाल्यानंतर स्थगित करण्यात आले. उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी यांच्या हस्तक्षेपाने आंदोलकांशी झालेल्या सकारात्मक चर्चेनंतर हा तोडगा निघाला.

संभाजी सेनेचे रेणापूर तालुकाध्यक्ष सुरेश चव्हाण यांनी यापूर्वी दि. ९ जून २०२६ रोजी तहसील प्रशासनाला विविध शेतरस्ते व महसूल विषयक प्रश्र्नांबाबत निवेदन दिले होते. त्यानुसार मागण्यांची पूर्तता न झाल्याने सोमवारी सकाळी ११ वाजल्यापासून तहसील कार्यालयासमोर आत्मदहन आंदोलन सुरू करण्यात आले होते. आंदोलनास तालुक्यातील विविध गावांतील शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

दुपारी सुमारे २ वाजता औसा रेणापूर उपविभागीय अधिकारी यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन आंदोलकांशी चर्चा केली. त्यानंतर तहसील कार्यालयाच्या वतीने लेखी आश्र्वासन देण्यात आले. त्यामध्ये गाव नकाशे व शिवरस्ते दर्शविलेल्या रस्त्यांच्या प्रकरणांमध्ये आदेश देऊन आठ दिवसांच्या आत मंडळ अधिकाऱ्यांमार्फत रस्ते खुले करण्याची कार्यवाही केली जाईल, असे नमूद करण्यात आले आहे. तसेच, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम १४३ तसेच मामलेदार न्यायालय अधिनियम १९०६ अंतर्गत सुरू असलेल्या रस्ता प्रकरणांमध्ये एका महिन्याच्या आत आदेश पारित करण्याची कार्यवाही केली जाईल, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. ज्या प्रकरणांमध्ये सुनावणी सुरू आहे, त्या ठिकाणी शेतकऱ्यांची पेरणी अडचणीत येऊ नये म्हणून मंडळ अधिकाऱ्यांमार्फत तात्पुरत्या स्वरूपात रस्ता उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

प्रशासनाने दिलेल्या या लेखी आश्र्वासनावर विश्र्वास ठेवून आंदोलन सध्या स्थगित करण्यात आले असले, तरी निश्र्चीत कालावधीत कार्यवाही झाली नाही तर एक महिन्यानंतर पुन्हा तहसील कार्यालयासमोर तीव्र आत्मदहन आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संभाजी सेनेच्या वतीने देण्यात आला. हे आंदोलन संभाजी सेनेचे संस्थापक अध्यक्ष सुधाकर माने यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.

यावेळी जिल्हा संपर्कप्रमुख धर्मराज पवार, जिल्हाध्यक्ष योगेश देशमुख, ग्रामीण जिल्हाध्यक्ष मदन पाटील, विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष अमोल कांदे, शिक्षक आघाडी जिल्हाध्यक्ष सत्यपाल जाधव, विद्यार्थी आघाडी संपर्कप्रमुख प्रसाद पवार, कार्याध्यक्ष मंगेश निकम, जिल्हा संघटक सिद्धाजी माने, जिल्हा सचिव गजानन मुंगळे, जिल्हा उपाध्यक्ष शशिकांत माने, संतोष शिंदे, रेणापूर तालुकाध्यक्ष सुरेश चव्हाण, हनुमंत बारलेकर, मनोज गरड, चव्हाण, यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी उपस्थित होते.

## फेरफार प्रकरणात गुन्हा दाखल तलाठ्याला बडतर्फ न केल्यास १३ जुलैपासून आमरण उपोषणाचा इशारा

तभा वृत्तसेवा



शिरूर अनंतपाळ दि. ७ जुलै : येथील गट क्रमांक १४व१४(ब) मधील फेरफार कृ.७१५२ प्रकरणाला न्यायालयाच्या आदेशाने नवे वळण मिळाले असून, संबंधिताविरुद्ध गुन्हा दाखल झाला असला तरी, संबंधित तलाठी आर. एस. पाटील यांच्यावर अद्याप कायमस्वरूपी बडतर्फीची कारवाई करण्यात आलेली नाही. याच्या निषेधार्थ पीडित शेतकरी राहुल येंजने यांनी १३ जुलै २०२६ पासून आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. याबाबत राहुल येंजने यांनी जिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, मौजे शिरूर अनंतपाळ येथील भ्रष्टाचारी तलाठी आर. एस. पाटील यांना सेवेतून कायमस्वरूपी बडतर्फ करण्यात यावे, भ्रष्टाचार करणारे कर्मचारी दिलीप तिघाडे यांचे जोपर्यंत न्यायालयीन निकालातून निर्दोष मुक्तता होत नाही तोपर्यंत पेन्शन होऊ नये, विभागीय चौकशी अधिकारी बदलण्यात यावा, मौजे शिरूर अनंतपाळ येथील गट नं.१४व१४(ब) मधील फेरफार नं.७१५२ कायमस्वरूपी रद्द करण्यात यावा, भ्रष्टाचार करणाऱ्या आर.एस.पाटील या कर्मचाऱ्याला २०१६मध्ये एसीबि.ने रंगेहात पकडले असताना पुन्हा त्याला तलाठी या पदावर रुजू का केले.

न्यायालयाच्या आदेशानुसार गुन्हा दाखल झाल्यानंतर ही केवळ प्रशासकीय कार्यवाहीवरच प्रशासन थांबले आहे. गुन्हा दाखल झालेल्या कर्मचाऱ्याला सेवेत कायम ठेवणे हे शासनाच्या पारदर्शक कारभारावर प्रश्र्नचिन्ह निर्माण करणारे असल्याचा आरोप राहुल येंजने यांनी आपल्या निवेदनात केला आहे. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन संबंधित तलाठ्याला तात्काळ सेवेतून कायमस्वरूपी बडतर्फ करण्यात यावे. अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. अन्यथा महसूल विभागातील बनावट फेरफार व भ्रष्टाचार करणाऱ्या कर्मचाऱ्यांना अभय मिळण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. फेरफार कृ.७१५२ची सखोल चौकशी करून या प्रकरणात सहभागी असलेल्या सर्व महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्र्चित करण्यात यावी. अशी ही मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. तसेच या संपूर्ण प्रकरणाचे ऑडिट करून दोषीवर कठोर कारवाई करण्यात यावी असेही मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाला १३ जुलै पर्यंत मुदत दिली असून, तोपर्यंत माझ्या मागण्या बाबत ठोस निर्णय नाही झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. या आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाचे राहील असे ही नमूद केले आहे. न्यायालयाच्या आदेशानंतर गुन्हा दाखल झाल्यामुळे महसूल विभागातील या प्रकरणाची पुन्हा एकदा जिल्हाभर चर्चा सुरू आहे. संबंधित तलाठ्यावर कोणती कारवाई केली जाते, चौकशीचा निकष काय लागतो आणि प्रशासन या प्रकरणात कोणती भूमिका घेते, याकडे शेतकरी, तालुक्यातील नागरिक, महसूल कर्मचारी यांचे लक्ष लागले आहे.दरम्यान १३ जुलै च्या प्रस्तावित आमरण उपोषणामुळे हे प्रकरण चिघळण्याची शक्यता नाकारता येत नाही अशी चर्चा तालुकाभरातील नागरिकांमधून ऐकावयास मिळत आहे.

## मराठा सेवा संघातर्फे १५० गुणवंत विध्यार्थ्यांचा सत्कार



तभा वृत्तसेवा

निलंगा दि. ७ जुलै : मराठा सेवा संघाच्या वतीने येथील जिजाऊ सृष्टी सभागृहात निलंगा तालुक्यातील १० वी १२ वी तसेच एमबीबीएस ला प्रवेशित व युवा उद्योजक यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माजी न्यायाधीश व्यंकटराव कदम,उदघाटक गटविकास अधिकारी सतिष पाटील प्रमुख पाहुणे उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल ढूमे, पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे, उद्योजक उदय पाटील, डॉ. अरविंद भातांबरे, डॉ. नरसिंह भिकाने, मराठा सेवा संघाचे जिल्हा सचिव एम एम जाधव,जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषदेचे डी. बी.बरमदे,सतिष हानेगावे,विनोद सोनवणे,संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रमोद कदम,प्राचार्य अशोकराव चव्हाण, समाधानताई माने,ज्ञानेश्र्वर जाधव आदी उपस्थित होते.यावेळी बोलताना माजी न्यायाधीश व्यंकटराव कदम म्हणाले विद्यार्थ्यांच्या जडणघडणीमध्ये माता पिता व गुरुजनांच्या संस्काराचे मोल अनन्यसाधारण आहे.या संस्काररूपी शिदोरीच्या बळावरच आज गुणवंत म्हणून नामलौकिक केला आहे.त्यामुळे माता पिता व गुरुच्या संस्काराचा हा अनमोल ठेवा आयुष्यात कदापी विसरू नका असा मौलिक सल्ला गुणवंत विध्यार्थ्यांना दिला.

यशस्वी होण्याची गुरुकिल्ली म्हणजे विद्यार्थ्यांनी मी कधीच हरू शकणार नाही हा आत्मविश्र्वास स्वतःमध्ये निर्माण करावा आणि आपण जे ठरवतो त्याच दिशेने मार्गक्रमण करावे म्हणजे जीवनात यश प्राप्त होईल. गेलेली वेळ कधीच परत येत नाही त्यामुळे वेळेला महत्त्व दिले पाहिजे असे मत उद्योजक उदय पाटील यांनी व्यक्त केले.

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थी व युवा उद्योजकरत्न राम क्षीरसागर,मिथुन दिवे, सदाशिव लोभे यासह स्विमिंग मध्ये राष्ट्रीय पातळीवर काश्य पदक पटकवणारे जलतरणपट्टू हर्षद अंबादास जाधव यांचाही सन्मानचिन्ह व प्रमाणात देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

प्रस्ताविक मराठा सेवा संघाचे जिल्हा सचिव एम एम जाधव यांनी तर सूत्रसंचालन सतीश हानेगावे आभार अमरदीप पाटील यांनी मानले.कार्यक्रम यशस्वितेसाठी आर के नेलवाडे, अजय मोरे, प्रताप हंगरगे, श्रीमंत जाधव, अंबादास जाधव, किरण धुमाळ,महेश जाधव, आशिष गायकवाड,परमेश्र्वर बोधले, सिद्धेश्र्वर तेलंग आदींनी परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

बुधवार, ८ जुलै २०२६

# प्रशासनाच्या दिरंगाई कारभाराविरोधात माढ्यात ठिय्या

## मुख्य चौकातील वाहतूक तासाभर ठप्प

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. ७ जुलै-**

माढा भूमी अभिलेख कार्यालय व माढा नगरपंचायत यांच्या दिरंगाई कारभारा विरोधात माढ्यातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात मंगळवारी सामाजिक कार्यकर्ते शंभू साठे यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी व नागरिकांनी रस्ता रोको आंदोलन केले या आंदोलनाला शेकडो नागरिक उपस्थित होते. या आंदोलनामुळे जवळपास एका तासापेक्षा जास्त वेळ मुख्य चौकातील वाहतूक ठप्प झाली होती.

यापूर्वी सामाजिक कार्यकर्ते शंभू साठे यांनी संबंधित दोन्ही कार्यालयास निवेदन देऊन रस्ता रोकोचा इशारा दिला होता. त्या निवेदनात असे म्हटले आहे की माढा भूमी अभिलेख कार्यालयामध्ये अनेक दिवसांपासून गंभीर स्वरूपाचा गैरकारभार सुरू असून शेतकरी व सर्वसाम ान्य नागरिकांना आर्थिक, मानसिक व वेळेचा त्रास सहन करावा लागत आहे.



या कार्यालयात सातत्याने कर्मचारी कार्यालयीन वेळेत उपस्थिती नसतात त्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनीची मोजणी व इतर कामे विनाकारण लांबवली जाऊन त्यांची आर्थिक पिळवणूक होते. तसेच दलाला मार्फत आलेली कामे मात्र प्राधान्याने व लवकर केली जात असल्याची नागरिकांमध्ये भावना आहे. कर्मचाऱ्यांकडून नागरिकांशी उद्धट व अरेरावीची भाषा वापरत असल्याच्या अनेक तक्रारी आहेत.

कर्मचाऱ्यांवर वरिष्ठ अधिकाऱ्यांचे प्रभावी नियंत्रण नसल्याचे दिसून येते व कार्यालयातील कागदपत्रे बाहेरील व्यक्तींकडून हाताळली जात असल्याची बाब अत्यंत गंभीर असून याची तात्काळ चौकशी होणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे.

तसेच नगरपंचायतीस दिलेल्या निवेदनात माढा बार्शी रोड वरील छत्रपती संभाजी महाराज चौकात हायमास्ट दिवा बसवण्यात यावा, ही प्रमुख मागणी केली होती. त्या पूर्ण न झाल्याने हे आंदोलन करण्यात आले होते.

आंदोलन स्थळी भूमी अभिलेख अधिकाऱ्यांनी उपस्थित राहून संबंधित शेतकऱ्यांचे कामे वेळेत मार्गी लावू व कार्यालयातील कामकाजावर लक्ष ठेवण्याचे आश्वासन दिले आहे. नगरपंचायत अधिकाऱ्यांनी हायमास्ट दिव्या संदर्भात लागणाऱ्या परवानग्या घेऊन कारवाई करण्याचे आश्वासन दिले.

यावेळी अनेक शेतकऱ्यांनी आपल्या भावना व्यक्त करत माढा भूमी अभिलेख कार्यालयाच्या कारभारावर नाराजी व्यक्त केली.

## महत्वाचे...



### अक्कलकोटमध्ये आरोग्य तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**अक्कलकोट, दि. ७ जुलै-**

दानशूर शिक्षण महर्षी कै. शिवशरण खेडगी यांच्या चौथ्या पुण्यस्मरणानिमित्त चेअरमन बसलिंगप्पा खेडगी मित्र परिवाराच्या वतीने आयोजित सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांच्या अंतर्गत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी अक्कलकोट एज्युकेशन सोसायटीच्या संचालिका पवित्रा खेडगी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे उद्घाटन प्रभारी प्राचार्य डॉ. अंकुश शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. शिबिरात ग्रामीण रुग्णालय, अक्कलकोट शहरातील वैद्यकीय अधिकारी डॉ. गुरुशांत चिंचोळी, डॉ. सतीश बिराजदार, डॉ. महांतेश्वर स्वामी, डॉ. रेखा लोकापुरे, डॉ. शैलजा माळी, डॉ. संजीवनी जावळकोट, डॉ. ऋग्वेद वैद्य, श्रीशैल कोटनुर व सविता बिराजदार यांनी सहभाग घेतला. डॉ. गुरुशांत चिंचोळी यांनी विद्यार्थ्यांना आरोग्याचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाच्या समन्वयिका डॉ. लता हिंडोळे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्या प्रा. वैदेही वैद्य, पर्यवेक्षक प्रा. निलप्पा भरमशेट्टी, प्रा. जयश्री बिराजदार, प्रा. संध्या परांजपे, संयोजक प्रा. संध्या इंगळे व प्रा. श्रीकांत जिड्डीमनी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. लक्ष्मी रेड्डी व प्रा. दीपा दिवटे, आभार प्रा. विजया कोन्हाळी यांनी मानले.



### २० गटई कामगारांना पत्र्याच्या स्टॉलचे वाटप

**सोलापूर, दि. ७ जुलै-**

अनुसूचित जातीतील चर्मकार समाजातील कामगारांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाच्या गटई स्टॉल योजनेंतर्गत २० पात्र लाभार्थ्यांना पत्र्याच्या स्टॉलचे वाटप सहायक आयुक्त समाज कल्याण सुलोचना सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह, सोलापूर येथे सहायक आयुक्त समाज कल्याण सुलोचना सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली व हस्ते हा कार्यक्रम पार पडला. गटई स्टॉल योजना १९७७ पासून शासनाने अनुसूचित जातीतील चर्मकार, ढोर, होलार, मोची इत्यादी समाजातील लोकांसाठी सुरू केली आहे. महाराष्ट्रात चामड्याच्या वस्तू व पादत्राणे दुरुस्तीच्या व्यवसायात मोठ्या प्रमाणावर अनुसूचित जातीतील व्यक्ती कार्यरत आहेत. हे व्यावसायिक रस्त्याच्या कडेला उन्हातान्हात बसून सेवा देत असतात. त्यांना ऊन, वारा व पावसापासून संरक्षण मिळावे व आर्थिक उन्नती व्हावी यासाठी ग्रामपंचायत, नगरपालिका क्षेत्रात १०० टक्के सहायक अनुदानावर गटई स्टॉल देण्याची योजना राबविण्यात येते. या योजनेंतर्गत प्रति गटई स्टॉलसाठी रु. ४२ हजार ७९७ व चर्मोद्योग/पादत्राणे व्यवसायासाठी आवश्यक साहित्य खरेदीसाठी प्रति लाभार्थी रु. ५ हजार प्रमाणे १०० टक्के सहायक अनुदानावर लाभ दिला जातो. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये या योजनेसाठी एकूण रु. ९ लाख ८० हजार इतके अनुदान कार्यालयाकडे प्राप्त झाले आहे.



### गौडगांव येथील जि.प.शाळेमध्ये शैक्षणिक साहित्याचे वाटप

**बार्शी, दि. ७ जुलै-**

समाजाप्रती असलेली बांधिलकी जपत विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी 'माय व्हिलेज' ग्रुपच्यावतीने विद्यार्थ्यांना वह्या वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष गुलाबराव रोहीले, प्रमुख पाहुणे प्रभाकर भड, पंचायत समिती सदस्य संजय भड, सामाजिक कार्यकर्ते राहुल भड, शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष बालाजी भड, जीवराज गरड, संदीप चव्हाण यांच्या उपस्थितीमध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. मुख्याध्यापिका सुवर्णा साठे, सहकारी शिक्षक रंगनाथ घोंगडे, शिक्षिका सुषमा रणदिवे, संगीता जाधव यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम संपन्न झाला.

### साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी दर्शन कदम

**माढा, दि. ७ जुलै-**





माढा शहरात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती दरवर्षी उत्साहात साजरी करण्यात येते. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती असून त्या अनुषंगाने मध्यवर्ती मंडळच्या उत्सव समिती पदाधिकाऱ्यांच्या निवडीसाठी बैठक घेऊन पदाधिकारी निवडण्यात आले. अध्यक्षपदी दर्शन कदम उपाध्यक्षपदी विकी पवार यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. तसेच खजिनदार पदी रोहित थोरात, सहखजिनदार मयुर पवार यांचीही निवड यावेळी करण्यात आली.

## लोकमंगल महाविद्यालयाच्या कृषी कन्यांकडून शेतकऱ्यांना बीजप्रक्रिया, जैविक खतांचे प्रात्यक्षिक



**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ७ जुलै-**

रासायनिक खतांचा वाढता वापर आणि त्यामुळे शेतीचा बिघडत चाललेला पोत सुधारण्यासाठी आता कृषी क्षेत्रातील तरुण पिढी पुढे सरसावली आहे. तालुक्यातील मोरवंची येथे लोकमंगल कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी ग्रामीण भागात जाऊन शेतकरी बांधवांना बीजप्रक्रिया आणि 'रायझोबियम' या जैविक खताचे प्रात्यक्षिक दाखवले.

रासायनिक खतांना उत्तम आणि किफायतशीर पर्याय म्हणून जैविक खतांचा वापर कसा करावा, याचे मार्गदर्शन यावेळी करण्यात आले.

हे यशस्वी प्रात्यक्षिक आणि जनजागृती मोहीम लोकमंगल कृषी महाविद्यालयाच्या कृषी कन्या श्रावणी आचार्य, स्मिता बिरादार, सायली दराडे, सुहानी घोळवे आणि साक्षी काळे यांनी यशस्वीरित्या राबवली. त्यांच्या या मार्गदर्शनाबद्दल मोरवंची येथील शेतकरी बांधवांनी त्यांचे आभार मानले व कौतुक केले.

## शिवरत्न स्कूलमध्ये स्वसंरक्षण प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ७ जुलै-**



शिवरत्न सेमी इंग्लिश स्कूल शंकर नगर अकलूज येथील विद्यार्थ्यांना सुरक्षितता, छेडछाड प्रतिबंध, गुड टच-बॅड टच या विषयावर स्वसंरक्षणाचे धडे देण्यात आले.

हे ट्रेनिंग निर्भया पथक अकलूजचे प्रमुख एएसआय समाधान देशमुख तसेच लेडीज कॉन्स्टेबल पद्मजा पिसे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.

अनोळखी व्यक्तीने हल्ला केल्यास स्वतःचा बचाव कसा करावा, आणि गर्दीच्या ठिकाणी सतर्क कसे राहावे, याचे प्रात्यक्षिक दाखवले. यावेळी बोलताना निर्भया पथकाचे प्रमुख म्हणाले महिलांनी कोणत्याही संकटाला न घाबरता धैर्याने सामोरे जाणे गरजेचे आहे. शारीरिक सक्षमतेसोबतच मानसिक दृष्ट्या खंबीर होण्यासाठी हे प्रशिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे.

या शिबिरात शारीरिक कसरतींशिवाय 'सायबर सुरक्षा' आणि 'सोशल मीडियाचा सुरक्षित वापर' यावरही मार्गदर्शन करण्यात आले. तसेच मुलींना कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ मदतीसाठी ११२ (पोलीस नियंत्रण कक्ष) आणि १०९१ (महिला हेल्पलाईन) या क्रमांकांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले. यशस्वी उपक्रमाबद्दल मुख्याध्यापक जितेंद्र माने देशमुख यांनी निर्भया पथक अकलूज यांचे आभार मानले.

सदरील उपक्रमाचा लाभ इयत्ता चौथी ते नववीच्या विद्यार्थ्यांना मिळाला त्याचप्रमाणे मुलींना आरोग्य विषयक स्वच्छतेच्या सवयींचे मार्गदर्शन करण्यात आले.





## महात्मा फुले विद्यालयाचे १७ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. ७ जुलै-**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'पूर्व उच्च प्राथमिक (इ. ५ वी) आणि पूर्व प्राथमिक (इ. ८ वी) शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ चा निकाल नुकताच जाहीर झाला असून विद्यालयातील १७ विद्यार्थ्यांनी या परीक्षेत यश संपादन केले. तब्बल ७५ विद्यार्थी शिष्यवृत्ती पात्र झाले आहेत.

विद्यालयातील गिरमकर समृद्धी संदीप, ढवळे प्रणाली नितीन, भालेराव अंजली रोहिदास, गरड विनायक लक्ष्मण, शिंदे अंजली चंद्रकांत, गायकवाड जान्हवी विजय, जाधव वैष्णवी मकरध्वज, भानवसे श्रावणी सुनील, सटाले श्रेया महादेव, मस्के कृष्णप्रिया संतोष, देशमुख साद जफर, बनकर तृप्ती उल्हास, जगताप समृद्धी धोंडिराम, साळुंखे अभिनव प्रमोद, माळी रुद्रप्रताप गणेश, नागटिळक स्वरा अच्युत, खोचरे रणवीर रणजित हे विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक म्हणून पात्र ठरले आहेत.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक प्रतीक कुटे, सोहम व्यवहारे, मीनल कुटे, प्रियंका हावळे, माऊली पवार, वैभव चव्हाण, अनिता भालेराव, रूपाली साळुंखे या शिक्षकांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले.

यशाबद्दल पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार अभिजीत पाटील, सोलापूर जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजीत शिंदे, सोलापूर जिल्हा परिषदेच्या महिला व बाल कल्याण सभापती अमृता वाघे, ज्ञानदीप शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष नारायण भानवसे, विद्यालयाचे प्राचार्य विजय यादव, मुख्याध्यापक शोएब बागवान यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## शिष्यवृत्ती परीक्षेत सांगोला विद्यामंदिरचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ७ जुलै-**





सांगोला विद्यामंदिर प्रशालेने शिष्यवृत्ती परीक्षेत गुणवत्ता यादीत राज्यस्तरीय यश मिळवले असून इ.५ वी मधील राजवीर घाडगे याने ५ वे तर इ.८ वी मधील अथर्व चंदनशिवे याने १० वे स्थान प्राप्त केले. इ.५ वी मधील २९ विद्यार्थ्यांनी जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान प्राप्त केले.

.या विद्यार्थ्यांना नागेश पाटील, वैभव कोठावळे, चैतन्य कांबळे, आशितोष नष्टे, अश्विनी साळुंखे, संध्या तेली, दत्तात्रय पाटील, दत्तात्रय कांबळे, दिग्विजय चव्हाण, धनश्री ढोले, रूपाली सरगर, रूपाली देशमुख या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. तसेच इ.८ वी मधील ३१ विद्यार्थ्यांनी जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान प्राप्त केले. या विद्यार्थ्यांना रमेश बिले, भाग्यश्री मिरजे, मेहजबीन मुलाणी, सुवर्णा कांबळे, वंदना टिंगरे यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, उपाध्यक्ष ॲड.विजयसिंह चव्हाण, खजिनदार शंकरराव सावंत, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, सदस्य विश्वेश झपके, प्राचार्य चारुदत्त जगताप, उपमुख्याध्यापक प्रदीप धुकटे, उपप्राचार्य शिवशंकर तटाळे, पर्यवेक्षक उत्तम सरगर, काकासाहेब नरुटे, शुभांगी घोंगडे, परीक्षा विभाग प्रमुख नामदेव खंडागळे, सिताराम राऊत यांनी अभिनंदन केले.

**जिल्हा गुणवत्ता यादी इ.५ वी**

विवेक टकले, अनुश्री तेली, स्वराली बंडगर, प्रत्युष मस्के, श्लोक देशमुख, संस्कृती बेहरे, अर्णव कोरे, अजय कोरे, उत्कर्ष क्षीरसागर, श्रेया बाबर, आरोही इंगवले, आदिती माने, सई दिवटे, शौर्यन चंदनशिवे, चिराग खतीब, प्रगती पिसे, ओम जानकर, स्वयंम शिर्के, सायली पोरे, स्वराज पोरे, समर्थ पवार, विश्वजीत बोराडे, आरवी पवार, सिद्धार्थ वेळापुरे, आरोही कोकरे, अल्फिया शेख, स्वानंदी साळे, स्वरा साळुंखे, चैतन्य गावडे

**जिल्हा गुणवत्ता यादी इ.८ वी**

मृणाली शिंदे, जयवर्धन गायकवाड, सुबोधिनी इंगवले, अनुराग ऐवळे, श्रेयश देशमुख, स्वरा बाजारे, ऋषिकेश केदार, आर्या पिसे, स्नेहल सावंत, श्रावणी दिवसे, श्रेयश शेंबडे, यशराज केदार, सिद्धी इंगोले, आर्या कांबळे, केतकी साळुंखे, सिद्धी शिर्के, अथर्व सोडळ, संस्कृती चांडोले, ओम लिगाडे, प्रियल जालगिरे, श्रावणी भाले, पार्थ सावंत, संकेत माळी, आराध्या पाटील, युवराज काशीद, संस्कृती लोंढे, शौर्या कसबे, पृथ्वीराज विभुते, हर्षवर्धन शिंदे, श्रीवर्धन लिगाडे, अर्जुन आदलिंगे.

### शिष्यवृत्ती परीक्षेत मोहिते-पाटील विद्यालयाचे यश

**माळशिरस, दि. ७ जुलै-**

भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळ संचलित रणजितसिंह मोहिते पाटील विद्यालय, जाधववाडी यांनी शिष्यवृत्ती व स्पर्धा परीक्षांम ध्ये उल्लेखनीय यश संपादन करून गुणवत्तेची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत राज रामचंद्र ढगे व अनुष्का विजय चव्हाण हे विद्यार्थी सोलापूर जिल्ह्यातून शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत. इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत समर्थ श्रीकांत सावंत याने जिल्हास्तरावर यश संपादन केले असून एन एम एम एस शिष्यवृत्तीसाठीही पात्र ठरत दुहेरी यश मिळविले आहे. तसेच सातारा सैनिक स्कूल प्रवेशासाठी नमन विक्रम धाईंजे याची निवड झाली आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष शिवाजी जाधव, मुख्याध्यापक नानासो घार्गे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.





## संतोष गुळमिरे विद्यामंदिर शाळेस वॉटर फिल्टर भेट

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ७ जुलै-**

विद्यार्थ्यांना शुद्ध व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे या सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून लायन्स क्लब बार्शी रॉयल यांच्यावतीने संतोष गुळमिरे प्राथमि क विद्यामंदिर, बार्शी या शाळेस वॉटर फिल्टर भेट देण्यात आला.

या कार्यक्रमाला लायन्स क्लब बार्शी रॉयलचे किरण खोराटे, लायन जितेंद्र दोशी, म ाजी गटशिक्षणाधिकारी अशोक भांजे, अध्यक्ष मंगेश बागुल, दयानंद रेवडकर, उमेश जाधव, ग्रोटेक अग्री सायन्स रिसर्च प्रा. लि., सचिन जाधव, श्रीकृष्ण लाड, सागर बागुलपस्थित होते. या उपक्रमास ग्रोटेक अग्री सायन्स अँड रिसर्च प्रा. लि. यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमास शाळेचे संस्थापक संतोष गुळमिरे, अध्यक्ष विजयकुमार गुळमिरे, सेक्रेटरी सोनल गुळमिरे, मुख्याध्यापिका, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कंटेनरमधून चोरीस गेलेला १४ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. ७ जुलै-**

मोहोळ महामार्गावर कंटेनरमधून चोरीस गेलेले एसीचे ५६ बॉक्ससह पीक अप असा १४ लाखाचा मुददेमाल जप्त करून तीन जणांना ताब्यात घेण्यात मोहोळच्या गुन्हे अन्वेषण पथकाला यश आले आहे

मोहोळ महामार्गावरून कंटेनर नंबर एन एल ०१ / ए एच याम धील ५६ एसी मालाचे बॉक्स हे चोरीचे गेले होते. मोहोळ पोलीस ठाणे मध्ये गुन्हा दाखल झाला होता. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली मोहोळ पोलिस ठाण्यातील गुन्हे अन्वेषण पथक तपास करू लागले. वेगवेगळ्या भागात तपास सुरु केला. सीसीटीव्ही फुटेज चेक होवू लागले. दरम्यान नितीन गंगाराम कांबळे (वय ३१ वर्ष नन्हेगाव ता अक्कलकोट ), निशांत वसुदेव घोलप (वय २१ वर्षे ) विराज संजय घोलप (वय २० वर्ष रा गावडी दारफळ उत्तर सोलापूर ) यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे तपास केला असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. चोरीस गेलेले ९ लाख ७१६ रु किमतीचे ५६ एसीचे बॉक्स त्यांच्या कडून ताब्यात घेण्यात आले. तसेच या गुन्ह्यात वापरलेली पिक अप अंदाजे ५ लाख रुपये असा १४ लाख ७१६ रुपयेचा मुद्देमाल जप्त करून ताब्यात घेतला सदरची कामगिरी मोहोळ पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक दिपक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उप निरीक्षक श्रीनिवास दासरी, पोना चंद्रकांत ढवळे पो कॉन्स्टेबल अम ोल जगताप स्वनिल कुबेर संदिप सावंत योगेश खलाटे सोमनाथ जगताप व सयबर पोलिस ठाण्याचे निखिल पवार यांनी केली.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## शासकीय, खासगी आस्थापनांनी ३१ जुलैपर्यंत मनुष्यबळाचे त्रैमासिक विवरणपत्र सादर करावे

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ७ जुलै : सर्व शासकीय आणि खासगी आस्थापनांनी कार्यरत मनुष्यबळाची माहिती दर्शविणारे त्रैमासिक विवरणपत्र (ईआर-१) प्रत्येक तिमाही संपल्यानंतर ३० दिवसांच्या आत ऑनलाइन सादर करणे बंधनकारक आहे. सेवायोजन कार्यालये रिक्तपदे सक्तीने अधिसूचित करणारा अधिनियम, १९५९ आणि त्याअंतर्गत नियमावली, १९६० नुसार, सर्व आस्थापनांनी हे विवरणपत्र तातडीने सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

केंद्र आणि राज्य शासन, अंगीकृत उद्योग, व्यवसाय, महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषद, पंचायत समिती, महापालिका, नगरपालिका तसेच खासगी क्षेत्रातील सर्व आस्थापनांना ईआर-१ विवरणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. या विवरणपत्रासाठी आस्थापनांनी HTTPS://ROJGAR.MAHASWAYAM.GOV.IN या वेबपोर्टलवर नियोक्ता लॉगइनद्वारे प्रवेश करावा. यासाठी 'एम्प्लॉयर (लिस्ट अ जॉब)' पर्यायावर क्लिक करून, युजर आयडी आणि पासवर्ड वापरून लॉगइन करावे. त्यानंतर डॅशबोर्डवरील 'ईआर-१' पर्याय निवडून 'एंटर ईआर-१' वर क्लिक करावे. यानुसार, त्रैमासिक विवरणपत्र ३१ जुलै २०२६ पूर्वी ऑनलाईन सादर करावे, असे आवाहन सहायक आयुक्त निशांत सूर्यवंशी यांनी केले आहे. विवरणपत्र सादर करताना तांत्रिक अडचणी उद्भवल्यास ०२३८२-२९९४६२ या क्रमांकावर संपर्क साधावा, असेही त्यांनी कळविले आहे.



# विविध वृत्त...

## जिल्ह्यात सरासरीच्या १६.६ टक्के पाऊस; प्रकल्पांमध्ये १७ टक्के पाणीसाठा

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ७ : जिल्ह्याची वार्षिक सरासरी ७०६ मिमी इतकी असून, ६ जुलैपर्यंत प्रत्यक्ष ११७.२ मिमी पावसाची नोंद झाली आहे. हे प्रमाण वार्षिक सरासरीच्या १६.६ टक्के आहे. जून महिन्याचा विचार केला असता, जूनमधील सर्वसाधारण १३५ मिमी पावसाच्या तुलनेत प्रत्यक्षात ९५ मिमी पाऊस पडला आहे. त्यामुळे यंदाचा जून महिना सरासरीपेक्षा कमी राहिला आहे.

जिल्ह्यातील मोठे, मध्यम व लघु प्रकल्पांमध्ये मिळून सध्या एकूण १७ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. मांजरा प्रकल्पात १८ टक्के, तर निम्न तेरणा प्रकल्पात ३२.१६ टक्के पाणीसाठा आहे. तसेच मध्यम ८ प्रकल्पांमध्ये १२.२७ टक्के, १३५ लघुप्रकल्पांमध्ये १२.५१ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.

जिल्ह्यात खरिपाचे सर्वसाधारण क्षेत्र ५.८६ लाख हेक्टर इतके आहे. सद्यस्थितीला एकूण क्षेत्रापैकी १८.२६% म्हणजेच सुमारे १.०७ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली आहे. यंदाच्या हंगामात मुख्य पीक म्हणून सोयाबीनची मोठ्या प्रमाणावर पेरणी झाली असून, त्यापाठोपाठ तुरीची लागवड करण्यात येत आहे.

जिल्ह्यात पाणी टंचाई भासू नये म्हणून प्रशासनाकडून आवश्यक उपाययोजना सुरू करण्यात आल्या आहेत. टंचाईग्रस्त भागात सध्या ३ टँकर्स सुरू असून, १८७ खाजगी विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. दरम्यान, महानगरपालिका आणि नगरपालिका क्षेत्रात उपलब्ध पाणीसाठ्याचे योग्य नियोजन करण्यात आले असून, डिसेंबर अखेरपर्यंत पुरेल एवढा पाणीसाठा सुरक्षित उपलब्ध आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून न जाता पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील पशुधनासाठी चाऱ्याची पुरेशी उपलब्धता आहे. जिल्ह्यात सध्या १२३ दिवस (सुमारे चार महिने) पुरेल इतका चारा साठा उपलब्ध आहे. त्यामुळे पशुपालकांनी चिंतेचे कारण नाही. जिल्हा प्रशासन जिल्ह्यातील सर्व परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्र्वास ठेवू नये. केवळ अधिकृत माहितीवरच विश्र्वास ठेवावा आणि पाणी तसेच चाऱ्याचा अपव्यय टाळून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

## राज्यातील खाजगी शिकवणी व सावकारी तात्काळ बंद करावी : संजयभाऊ कांबळे




तभा वृत्तसेवा

लातूर दि. ७ जुलै : महाराष्ट्रातील खाजगी शिकवणी वर्ग आणि खाजगी फायनान्स व सावकारी तात्काळ बंद करण्यात यावेत,अशी मागणी भारतीय दलित पँथरचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष संजयभाऊ कांबळे यांनी एका लेखी निवेदनाद्वारे मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. तत्पूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शनेही करण्यात आली.

लातूरच्या जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या निवेदनात संजयभाऊ कांबळे यांनी पुढे असे नमूद केले आहे की, नीट पेपर फुटी प्रकरणाने देशभरात खळब माजली आहे. अकरावी - बारावीचे शिक्षण हे केवळ अनुदानापुरते मर्यादित राहिले आहे.

कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांसाठी बायोमेट्रिक पद्धत नसल्याने सर्व महाविद्यालयातीलप्राध्यापकाच्या संमतीने सर्व विद्यार्थी खाजगी क्लासेस मध्ये मोठ्या प्रमाणात फीस भरून शिक्षण घेत आहेत. गरिबांच्या विद्यार्थ्यांना फीस भरून खाजगी कोचिंग क्लासेस मध्ये शिक्षण घेणे परवडत नसल्याने आणि महाविद्यालयात प्राध्यापक शिकवत नसल्याने गरिबांचे शिक्षण राहिलेच नाही, ही बाब गंभीर असून शासनाने याची तात्काळ दखल घेऊन महाराष्ट्रातील सर्व खाजगी कोचिंग क्लासेस बंद करावेत आणि महाविद्यालयातील अकरावी बारावीचे शिक्षण प्रत्यक्षात कॉलेजमध्ये घेण्याचे सक्तीचे करून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी बायोमेट्रिक पद्धत अवलंब करण्याचे आदेश द्यावेत.

तसेच लातूर जिल्ह्यातील नणंद गावच्या शेतकऱ्यांची सावकारांनी मोठ्या प्रमाणात पिळवणूक केल्याचे उघड झाले असून असे अनेक प्रकार लातूर जिल्ह्यात घडले आहेत व दैनंदिन घडत आहेत. फायनान्सवाले आणि खाजगी सावकार यांच्या दहशतीमुळे पुढे येण्यास कोणी धजत नसून त्यांनी लातूर जिल्ह्यामध्ये दहशत निर्माण केली आहे. ग्रामीण व शहरी भागातील मजबूर लोकांचा फायदा घेऊन त्यांचा मोठ्या प्रमाणात पिळवणूक करीत आहेत. त्यांची प्रचंड दहशत असल्याने लोक समोर येण्यास तयार नाहीत, मात्र आत्महत्या करण्यास तयार असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्याचप्रमाणे लातूर जिल्ह्यातील १२ शासकीय धान्य गोदामामध्ये हमाली करणाऱ्या हमालांचे बनावट रेकॉर्ड तयार करून कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार करणाऱ्या संबंधित कंत्राटदाराची एसआयटीमार्फत चौकशी करून त्याच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी,अशी मागणी त्यांनी केली आहे.

यावेळी संजयभाऊ कांबळे यांच्यासह धम्मानंद घोडके, संग्राम कदम, सतीश मादळे, नितीन कांबळे, राजू कांबळे दावणगावकर , सायस पाडुळे, केतन कांबळे, प्रकाश सूर्यवंशी, रमेश पाडुळे, राम सावते , दिलीप साबळे, सुभाष हुलसुरे, बब्रुवान भालेराव, देवानंद चिकाटे , प्रकाश सूर्यवंशी, अंकुश पाडुळे, कमलाकर साबळे, आत्माराम हुलसुरे यांची उपस्थिती होती.

## तांदूळजा-चिंचोली मंडळातील गावे मुरुड अपर तहसीलला जोडण्यास तीव्र विरोध



तभा वृत्तसेवा

मुरूड दि. ७ जुलै : मुरुड येथे नव्याने मंजूर झालेल्या अप्पर तहसील कार्यालयास तांदुळजा व चिचोली मंडळातील गावे जोडण्याच्या प्रस्तावाला दोन्ही मंडळांतील ग्रामस्थ, ग्रामपंचायती व लोकप्रतिनिधींनी तीव्र विरोध दर्शविला आहे. ग्रामसभांचे ठराव मंजूर करून नागरिकांच्या स्वाक्षऱ्यांसह जिल्हाधिकारी लातूर व उपविभागीय अधिकारी यांच्याकडे निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, तांदुळजा व चिचोली मंडळातील नागरिकांची महसूल, उत्पन्न, जात, निवासी दाखले, संजय गांधी योजना, आपत्ती पंचनामे, जमीनविषयक प्रकरणे आदी सर्व शासकीय कामे अनेक वर्षांपासून लातूर तहसील कार्यालयामार्फत सुरळीतपणे होत आहेत. तसेच शिक्षण, व्यापार, बैंकिंग, आरोग्य सेवा व दैनंदिन व्यवहारही प्रामुख्याने लातूर शहराशी निगडित असल्याने नागरिकांची प्रशासकीय व्यवस्था लातूर तहसीलशी सुसंगत झाली आहे. त्यामुळे ही गावे मुरुड अप्पर तहसील कार्यालयाशी जोडल्यास नागरिकांना अनावश्यक गैरसोय, वेळेचा अपव्यय व आर्थिक भार सहन करावा लागेल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. लोकभावना व जनहित लक्षात घेऊन तांदुळजा व चिंचोली मंडळातील गावे लातूर तहसील कार्यालयाशीच कायम ठेवावीत व मुरुड अप्पर तहसील कार्यालयाशी जोडण्याचा प्रस्ताव रद्द करावा, अशी मागणी करण्यात आली. अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला. निवेदन सादर करताना लातूर पंचायत समितीचे उपसभापती महेश चव्हाण, जिल्हा परिषद सदस्य श्रीकांत माने, बाजार समिती संचालक अनिल पाटील, पंचायत समिती सदस्य अमोल देडे, पंचायत समिती सदस्य प्रतिनिधी संतोष स्वामी, जनक गायकवाड तसेच सरपंच सुहास कदम, प्रताप पाटील, बब्रुवान पवार, महेश हावल, पांडुरंग देशमुख, मनोज करपे, ज्ञानेश्र्वर बोराडे, चंद्रप्रकाश लाहडे, विलास भिसे, संजय चव्हाण, गणेश सोमासे, बाबासाहेब भिसे, नरेंद्र अल्टे, आकाश नर्सिंगे, सतीश शिंदे यांच्यासह दोन्ही मंडळांतील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व नागरिक उपस्थित होते.

## ४४५ थकबाकीदारांनी भरला कर, पहिल्या दिवशी ५७ लाख वसुली




तभा वृत्तसेवा

लातूर दि. ७ जुलै : लातूर शहर महानगरपालिका प्रशासनाने शहरातील करदात्यांसाठी एक दिलासादायक निर्णय घेतला आहे. ६ ते २० जुलै या पंधरा दिवसांच्या कालावधीत थकीत मालमत्ता कराचा एकरकमी भरणा करणाऱ्या नागरिकांना व्याज आणि शास्तीमध्ये (दंड) १०० टक्के सवलत देण्यात येत आहे. मनपा आयुक्त राहुल कुलकर्णी यांनी जाहीर केलेल्या या विशेष योजनेला पहिल्याच दिवशी (सोमवार, ता. ६) नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. वाढीव व्याजामुळे कर भरणे जिकिरीचे होत असल्याने नागरिकांनी आणि लोकप्रतिनिधींनी व्याजात सवलत देण्याची मागणी केली होती.

वसुलीसाठी अधिकाऱ्यांसह ४१ प्रतिनिधी 'फिल्ड'वर थकबाकीदारांपर्यंत पोहोचण्यासाठी आणि या सवलत योजनेची माहिती देण्यासाठी मनपाने विशेष यंत्रणा कामाला लावली आहे. या मोहिमेत क्षेत्रीय कार्यालयांतील कर्मचाऱ्यांसोबतच ४१ वसुली प्रतिनिधी, ४ कर निरीक्षक आणि ४ सहायक कर अधीक्षक प्रत्यक्ष 'फिल्ड' वर कार्यरत आहेत. घरोघरी जाऊन नागरिकांना सवलतीचे महत्त्व पटवून देणे आणि जास्तीत जास्त वसुली करणे, यावर या पथकांचा भर असल्याने आगामी दिवसांत वसुलीचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे.

करदात्यांना रांगेत उभे राहावे लागू नये आणि करभरणा प्रक्रिया जलद व्हावी, यासाठी महानगरपालिकेने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत 'क्यूआर कोड'ची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. लातूर शहरातील ए, बी, सी आणि डी या चारही क्षेत्रीय कार्यालयांमध्ये थकीत कर भरण्यासाठी स्वतंत्र काऊंटर सुरू करण्यात आले असले तरी, क्यूआर कोडमुळे नागरिकांना ऑनलाईन पद्धतीने कर भरणे अधिक सुलभ झाले आहे.

## कुलगुरू चासकर यांचा कव्हेकर यांनी केला सत्कार

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ७ जुलै : भाजपा नेते माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर हे नांदेड दौऱ्यावर गेले असताना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर गणपतराव चासकर यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी कव्हेकर यांनी डॉ. चासकर यांचा त्यांची शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. तसेच नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप यांची भेट घेऊन मराठवाड्याचा विकास व सुरक्षा यावर सविस्तर चर्चा झाली.

## सफाई कर्मचारी सेनेच्या मराठवाडा विभागीय सरचिटणीसपदी कांबळे



तभा वृत्तसेवा

लातूर, दि.७ जुलै : येथील सामाजिक कार्यकर्ते बी.एम. कांबळे हे गेल्या विस ते पंचविस वर्षापासून मेहत्तर, भंगी, रूकी, वाल्मीकी समाजासाठी व विविध क्षेत्रातील सफाई कर्मचारी यांच्या सर्वांगीण विकासासाठी सामाजिक, शैक्षणीक, शासकिय प्रशासकीय क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करीत आहेत.

त्यांच्या कार्याची दखल घेवून मुकेश सारवान मा. अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) तथा विद्यमान उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य व निरंजन माने, राज्य सरचिटणीस महाराष्ट्र राज्य यांनी शिवराज्य सफाई कर्मचारी सेनेच्या मराठवाडा विभाग सरचिटणीसपदी नियुक्ती केली आहे.

मराठवाड्यातील संबध महानगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत विविध शासकीय निमशासकिय क्षेत्रातील सफाई कर्मचार्यांना योग्य न्याय मिळावा त्यांना शासनाच्या सुविधा मिळाव्यात त्यांना सुरक्षा मिळावी या करिता पुढील दिशा असणार आहे. लवकरच संबध मराठवाड्यात दौरा करून समस्या जाणून घेण्यात येतील बी.एम. कांबळे यांची मराठवाडा विभागीय सरचिटणीसपदी नियुक्ती झाल्याने अध्यक्ष शंकर कांबळे, सर्वश्री अशोक सुर्यवंशी, अंकुश गायकवाड, अशोक कांबळे आदिंनी अभिनंदन केले.

## पावसामुळे लातूर एक्स्प्रेस मनमाड मार्गे

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ७ जुलै : पुणे आणि मुंबई परिसरात कोसळत असलेल्या मुसळधार पावसामुळे मध्य रेल्वेच्या वाहतुकीवर मोठा परिणाम झाला आहे.

खबरदारीचा उपाय म्हणून रेल्वे प्रशासनाने लातूर आणि सोलापूरहून मुंबईला जाणाऱ्या दोन महत्त्वाच्या गाड्यांचे मार्ग तात्पुरत्या स्वरूपात बदलले आहेत. रेल्वे प्रशासनाने दिलेल्या अधिकृत माहितीनुसार, सोमवार, ६ जुलै २०२६ रोजी सुटणारी गाडी क्रमांक २२१०८ लातूर-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (मुंबई) एक्स्प्रेस आणि गाडी क्रमांक १२११६ सोलापूर-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (मुंबई) सिद्धेश्र्वर एक्स्प्रेस या दोन्ही गाड्या त्यांच्या नियमित मार्गावरून धावणार नाहीत. मुसळधार पावसामुळे रेल्वे ट्रॅकवर पाणी व साचून प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून मार्ग बदलला आहे.

पुणे-मुंबई रेल्वे मार्गावरील अतिवृष्टीच्या पार्श्र्वभूमीवर, ६ जुलै रोजी धावणारी गाडी क्र. २२१०८ लातूर-मुंबई एक्स्प्रेस आणि गाडी क्र. १२११६ सोलापूर-मुंबई सिद्धेश्र्वर एक्स्प्रेस या दोन गाड्यांच्या मार्गात बदल झाला आहे. या गाड्या आता नेहमीच्या मार्गाऐवजी दौंड, मनमाड, इगतपुरी आणि कल्याण या पर्यायी लांबच्या मार्गाने मुंबईला (सीएसएमटी) पोहोचतील.

## महिला सक्षमीकरणासाठी विलासराव देशमुख फाउंडेशनचा पुढाकार कातपुर येथे मोफत ब्युटी पार्लर प्रशिक्षण केंद्राचा शुभारंभ



तभा वृत्तसेवा

लातूर : मंगळवार, ७ जूलै २०२६ विलासराव देशमुख फाउंडेशनच्या वतीने कातपुर येथे महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी मोफत ब्युटी पार्लर प्रशिक्षण केंद्र क्र. ३ ची सुरुवात करण्यात आली आहे. आ. अमित देशमुख यांच्या मार्गदर्शनाने आणि ट्वेंटीवन ग्री लि.च्या संचालिका सौ. अदिती अमित देशमुख यांच्या पुढाकारातून हे प्रशिक्षण केंद्र चालवण्यात आले होते.

विलासराव देशमुख फाउंडेशनच्या प्रयत्नातून ग्रामीण भागातील महिलांना रोजगाराची संधी मिळावी, या उद्देशाने हे केंद्र सुरू करण्यात आले आहे. फाउंडेशन महिलांना मोफत प्रशिक्षण देऊन स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे काम करत आहे. या नवीन प्रशिक्षण केंद्रामध्ये एकूण

महिलांनी सहभाग नोंदवला आहे. या प्रशिक्षणात महिलांना ब्युटी पार्लरच्या विविध पद्धती शिकवल्या जाणार आहेत.

संस्थेच्या विभाग प्रमुख संगीता मोळवणे यांच्या शुभहस्ते या केंद्राचे उद्घाटन झाले. यावेळी अविनाश देशमुख, गावचे उपसरपंच मनोज देशमुख, ट्रेनर सलमा पठाण समन्वयक गजानन बोयणे, सोशल प्लॅनर सोमनाथ कावळे आणि गावातील मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

## उपवर्गीकरणविरोधातील महामोर्चाला अभूतपूर्व प्रतिसाद



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ७ जुलै : अनुसूचित जाती प्रवर्गाचे आरक्षण उपवर्गीकरण निर्णयाच्या निषेधार्थ अनूसूचित जाती प्रवर्गातील सर्वच ५८ जातींच्यावतीने येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. या महामोर्चाचे नेतृत्व सरसेनानी आनंदराज आंबेडकर, माजीमंत्री बबनराव घोलप यांनी केले. या महामोर्चात अमन आंबेडकर यांची उपस्थितीही सर्वांचे आकर्षण ठरत होती.

अनुसूचित जाती प्रवर्गाचे उपवर्गीकरण करण्याचा घाट सरकारने घातला आहे. यामुळे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधाना छेद देण्याचा प्रयत्न सरकार करीत आहे. हे आरक्षण उपवर्गीकरण रद्द करावे, या मागणीसाठी अनुसूचित जाती प्रवर्गातील ५९ जातींच्यावतीने राज्यभर आंदोलने करण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून सोमवारी (दि.६) अनुसूचित जाती प्रवर्गातील सर्वच समाजघटकांच्यावतीने उत्स्फूर्त सहभाग नोंदवत जिल्हाधिकारी महामोर्चा काढण्यात आला.

येथील आंबेडकर चौकात सोमवारी दुपारी बारा वाजता महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर महामोर्चाला सुरुवात झाली. हा मोर्चा राजर्षी शाहू महाराज चौक, अण्णाभाऊ साठे चौक, गंजगोलाई, हनुमान चौक, गांधी चौक, आंबेडकर पार्क, अशोक हॉटेल चौक, तहसील कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज चौकातून जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयावर जाऊन धडकला.

या महामोर्चात हजारोंच्या संख्येने नागरिक, महिला, तरुण-तरुणी सहभागी झाले होते. आरक्षण उपवर्गीकरण रद्द करण्याच्या मागण्यांच्या फलकांसह सरकारविरोधी घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. तब्बल पाच किलोमीटरचे आंतर सर्व आंदोलकांनी चालून पूर्ण केले. आरक्षणाचे उपवर्गीकरण रद्द करून आरक्षित असलेली सर्व शासकीय पदे भरण्यासाठी घटनात्मक हक्कांच्या संरक्षणासाठी प्रभावी उपाययोजना राबवाव्यात, अशा मागण्यांचे निवेदन राज्य शासनाला देण्यात

आरक्षण उपवर्गीकरणाच्या विरोधात काढण्यात येणारा महामोर्चा यशस्वी व्हावा, यासाठी जिल्ह्यातील विविध संघटनांचे पदाधिकारी अहोरात्र मेहनत घेत होते. त्यानुसार या महामोर्चाला हजारोंच्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता. त्यात प्रामुख्याने भंते पय्यानंद थेरो, प्रा. अनंत लांडगे, व्ही. एस. पँथर्स युवा संघटनेचे संस्थापक विनोद खटके, सचिन मस्के, चर्मकार महासंघाचे उपाध्यक्ष सी. के मुरळीकर, माजी उपनगराध्यक्ष मोहन माने, माजी नगरसेवक चंद्रकांत चिकटे, नगरसेवक ॲड. अतीश चिकटे, साधू गायकवाड, युवा भीम सेनेचे पंकज काटे, चर्मकार महासंघाचे प्रदेशाध्यक्ष माधव गायकवाड, महापालिकेचे नगरसेवक, ५९ जातीतील समाजबांधव उपस्थित होते.

### शिस्तबध्द महामोर्चा

शहरातून काढण्यात आलेल्या महामोर्चात सहभागी होण्यासाठी सकाळपासूनच नागरिकांनी आंबेडकर चौकात जमण्यास सुरुवात केली होती. जुने जिल्हाधिकारी कार्यालयापुढेही विचारपीठासह आंदोलकांना बसण्यासाठी आसनांची व्यवस्था करण्यात आली होती. आंबेडकर चौकातून निघालेला हा महामोर्चा अत्यंत शिस्तबध्दपणे जोरदार घोषणाबाजी करीत मार्गक्रमण करीत होता. पहिले टोक जुने जिल्हाधिकारी कार्यालयावर पोहोचले असताना शेवटचा व्यक्ती मात्र गंजगोलाईतही नव्हता. प्रत्येकाच्या हातात फलक, गळ्यात निळा गमचा, निळा फेटा असा पेहराव केलेले नागरिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जयघोष तर सरकारचा निषेध करताना दिसून आले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# हिंगोलीत संत नामदेव महाराजांच्या पालखीचा रिंगण सोहळा उत्साहात

## हिंगोलीकरांकडून संत नामदेव महाराजांच्या पालखीचे भव्य स्वागत





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ जुलै**
जिल्ह्यातील तीर्थक्षेत्र नर्सी येथून संत नामदेव महाराजांची दिंडी पंढरपूरकडे रवाना झाली आहे. हिंगोलीतील रामलीला मैदानावर संत नामदेव महाराज यांच्या पालखीचा रिंगण सो-हळा मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी संत नामदेव महाराजांची पालखी अग्रसेन चौकात येताच फटाक्यांची आतिषबाजी करीत भव्य स्वागत करण्यात आले. त्यानंतर भव्य रिंगण सोहळ्यात राजकीय पुढारी, वारकरी, भाविकांनी सहभाग घेतला.
जिल्ह्यातील संत नामदेव महाराजांची जन्मभूमी असलेल्या नर्सी येथून संत नामदेव महाराजांची पालखी पंढरपूरकडे पायी निघाली असून या दिंडीमध्ये वारकरी मुले-मुली तसेच वारकऱ्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला आहे. सोमवारी सायंकाळी ही दिंडी हिंगोली शहरातील अग्रसेन चौकात आल्यानंतर नगराध्यक्षा सौ रेखा श्रीराम बांगर, शिवसेना गटनेते श्रीराम बांगर यांच्यासह भाविकांनी पालखीचे भव्य स्वागत केले.
त्यानंतर ही दिंडी येथील रामलीला मैदानाकडे निघाली. दिंडीमध्ये वारकरी मुले-मुली यांनी टाळ मृदंगाच्या गजरात विठ्ठल नामाचा गजर करीत मैदानात प्रवेश केला.
रिंगण सोहळ्यासाठी दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी नगर पालिकेच्यावतीने जय्यत तयारी करण्यात आली होती. यावेळी नगराध्यक्षा सौ रेखा श्रीराम बांगर, शिवसेना गटनेते श्रीराम बांगर, माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, नगरसेवक बांगर, भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकुळे, मुख्याधिकारी माने, नगर पालिकेचे बाळू बांगर यांच्यासह राजकीय पुढारी तसेच नगर पालिकेचे अधिकारी व कर्मचारी तसेच भाविकांनी संत नामदेव महाराजांच्या पालखीचे दर्शन घेत पूजा केली. यावेळी संस्थानचे उपाध्यक्ष भिकाजी किर्तनकार, सचिव द्वारकादास सारडा, मनोज आखरे, आंबादास गाडे, सुभाष हुले, भिकुलाल बाहेती, ब्रिजगोपाल तोष्णीवाल, संजय देशमुख, रमेश मगर, राहुल नाईक, भागवत सोळंके आदींची उपस्थिती होती.
यावेळी रिंगण सोहळ्यात वारकरी मुलांनी मोठमोठे मनोरे तयार केले तसेच संत नामदेव महाराज यांच्या पालखीला रिंगण मारण्यासाठी वारकरी मुलामुलींनी धावत रिंगण पूर्ण केले. यावेळी उपस्थित भाविकांनी विठ्ठल नामाचा गजर केला तसेच ज्ञानोबा, तुकाराम तसेच संत नामदेव महाराजांचा जयजयकार करीत रिंगण सोहळ्यात सहभाग घेतला.
रिंगण सोहळ्याचे मुख्य आकर्षण असलेले घोडे यावेळी पालखीच्या भोवती नाचत रिंगण पूर्ण करीत असतांना डोळ्यांचे पारणे फेडणारे दृश्य उपस्थित असलेल्या सर्व भाविकांनी ऱ्हदयात साठवून ठेवले. यावेळी राजकीय पुढाऱ्यांनी संत नामदेव महाराजांच्या दिंडीत फुगड्या खेळण्याचा आनंद लुटला. यावेळी संपूर्ण वातावरण भक्तीमय आणि भगवेमय झाले होते. हिंगोली येथे मुक्कामानंतर संत नामदेव महाराज यांची पालखीने मंगळवारी पंढरपूरकडे प्रस्थान केले. या दिंडीमध्ये सुमारे ५०० वारकरी सहभागी झाले असून ७०० किमीचा पायी प्रवास करणार आहेत. या पालखीचे पाच रिंगण सोहळे होणार असून पहिले रिंगण हिंगोलीत पार पडले.

# करणी केल्याच्या संशयावरून वृध्द दाम्पत्याचा खूनप्रकरणी तिघे अटक

## हिंगोली स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ जुलै**
बासंबा पोलिस ठाण्याच्या हद्दीत पारडा शेत शिवारातील आखाड्यावर असतांना कोणीतरी अज्ञात इसमाने वयोवृध्द दाम्पत्याची घातक हत्याराने मारून गंभीर जखमी करून खून केल्याची घटना घडली होती. याप्रकरणी बासंबा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने लावला असून या प्रकरणात करणी केल्याचा संशयावरून वयोवृध्द दाम्पत्यास ठार मारल्याप्रकरणी तीन जणांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे.
पोलिस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार पारडा शेत शिवारातील आखाड्यावर वृध्द पती-पत्नी राहत होते. या दाम्पत्यास अज्ञातांनी घातक हत्याराने वार करून त्यांचा खून केला. याप्रकरणी फिर्यादी अनिल बळीराम वाघमारे वय ४० रा पारडा यांनी बासंबा पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेवून पोलिस अधीक्षक श्रेणीक लोढा यांनी सदर गुन्ह्याचा तत्काळ शोध लावण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक मोहन भोसले यांना सूचना दिल्या. या खूनाच्या तपासासाठी सपोनि व्ही एस अरसेवार यांचे विशेष पथक नेमण्यात आले.
या पथकाने सदर गुन्ह्यातील अज्ञात आरोपीतांचा शोध तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीवरून सदर गुन्ह्यात राहुल सम्राट खंदारे वय ३२ रा इसापूर रमणा, अक्षय घनशाम वाघमारे वय ३० रा पारडा, राजू गौतम वाघमारे वय ३३ रा पारडा यांना ताब्यात घेवून विचारपूस केली असता पारडा गावातील इसम बळीराम देवबा वाघमारे व त्यांची पत्नी कलावती बळीराम वाघमारे हे दोघे करणी करत असल्याचे संशयावरून तसेच यातील राजू वाघमारे याने त्याची प्रकृती वारंवार बिघडत असल्याने व त्यास बळीराम वाघमारे व कलावती वाघमारे यांनी केलेली करणी कारणीभूत असेल असा संशय असल्याने त्याने त्याचे साथीदार राहुल खंदारे व अक्षय वाघमारे यांना सांगितल्याने अक्षय व राहुल यांनी राजू वाघमारे यांच्या सांगण्यावरून बळीराम वाघमारे व कलावती वाघमारे यांना ते राहत असलेल्या शेतातील आखाड्यावर जाऊत जीवानिशी ठार मारले असल्याची कबुली दिली.
सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक श्रेणीक लोढा, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, पोनि मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि व्ही एस अरसेवार, उपनि माधव जिव्हारे, अंमलदार पांडुरंग राठोड, गजानन पोकळे, लिंबाजी वाव्हळे, निरंजन नलवार, सतीश जाधव, नरेंद्र साळवे, दत्ता नागरे, प्रदीप झुंगरे, इरफान पठाण, मारोती काकडे यांनी केली आहे. पोलिस अधीक्षक श्रेणीक लोढा यांनी पथकाचे अभिनंदन केले आहे.

## संक्षिप्त वृत्त

### अनोळखी व्यक्तीचा मृतदेह सापडला

हिंगोली- तालुक्यातील मौजे सावा शिवारात अकोला-हिंगोली रेल्वे पटरीजवळ लिंबाच्या झाडास अडकलेल्या अवस्थेत एका अनोळखी पुरूषाचा मृतदेह ग्रामीण पोलिसांना आढळला आहे. मयत व्यक्ती अंदाजे ३५ ते ४० वर्षाचा असून उंची ५ ते ५.५ फूट आहे. कुरळ्या दाढी व मिशा तसेच अर्धे टक्कल आहे. उजव्या कानात बाळी, गळ्यात हिरवा व लाल रंगाचा दोरा असून उजव्या हातावर आकाश अंजली व फिकट रंगात शिल्पा असे गोंदलेले आहे. हाताच्या बोटात सिंहाचे चिन्ह असलेली धातूची अंगठी, काळा रूमाल आढळला असून सदरील वर्णनाची व्यक्ती बेपत्ता असल्याची माहिती असल्यास किंवा कोणत्याही पोलिस ठाण्यात अशा वर्णनाची मिसींग नोंद दाखल असल्यास त्वरीत हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक विष्णुकांत गुठ्ठे मो. न. ८८३०५६४६१८ व तपास अधिकारी राजकुमार जमदाडे मो.न. ८७८८१४३७९६ वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### खटकाळीरोडवरीलमहावितरणच्याकार्यालयाच्या परिसरात चिखल, रोहीत्र नेण्यास अडचणी



हिंगोली-शहरातील खटकाळी रोडवरील महावितरणच्या सबस्टेशनमध्ये पावसामुळे मोठ्या प्रमाणात चिखल झाला आहे. पावसाळा असल्यामुळे ग्रामीण भागातील रोहीत्र नादुरूस्त होत आहेत. रोहीत्र नेण्यासाठी अनेक वाहने या कार्यालयात येत आहेत. परंतु कार्यालयाच्या गेटपासून ते परिसरात सर्वत्र चिखल झाल्यामुळे वाहनांना रोहीत्र नेत असतांना परेशानी होत आहे तसेच उघड्यावर रोहीत्र ठेवल्यामुळे पावसात भिजत आहेत. या परिसरात महावितरणकडून मुरूंब टाकण्यात यावा त्यामुळे चिखल होणार नाही अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

### कयाधू नदीचे पात्र अजूनही कोरडेच



हिंगोली- हिंगोली जिल्ह्यात मागील आठवडाभरापासून पावसाने समाधानकारक हजेरी लावली आहे. पेरण्यांना सुरूवात झाली आहे परंतु शहरातून वाहणाऱ्या कयाधू नदीचे पात्र अजूनही कोरडेच असल्याचे दिसत आहे.

# हिंगोलीतील शुभम राजे खून प्रकरणी तिघांना जन्मठेप, न्यायालयाचा निकाल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ जुलै**
हिंगोली शहरातील एका तरूणाच्या खून प्रकरणात तिघांना जन्मठेपेची शिक्षा तसेच प्रत्येकी ५० हजार रूपये दंडाच्या शिक्षेचा निर्णय जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायधीश एस एन माने-गाडेकर यांनी सोमवारी दिला आहे.
याबाबत सरकारी वकील ॲड एन एस मुटकुळे यांनी दिलेल्या माहीतीनुसार शहरातील तलाब कट्टा भागांमध्ये दि १८ एप्रिल २०२२ रोजी रात्री ९.३० ते ९.४५ वाजता शुभम राजे याचा तीन जणांसोबत एका मुलीची छेड काढण्यावरून वाद झाला होता. यावरून झालेल्या वादाचा बदला घेण्यासाठी आरोपींनी शुभमवर लोखंडी रॉड आणि खंजीरने हल्ला केला. ज्यात त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी शहर पोलिस ठाण्यात दि १९ एप्रिल २०२२ रोजी तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. तत्कालीन पोलिस उपनिरीक्षक विक्रम विठूबोने यांच्या पथकाने अधिक तपास करून न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले होते. सदर प्रकरण जिल्हा व सत्र न्यायालयाच्या न्यायधीश एस एन माने-गाडेकर यांच्या न्यायालयात सुनावणीसाठी आले होते. या प्रकरणात एकूण १७ साक्षीदार तपासण्यात आले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने बबलू उर्फ बाब सुभाष धाबे वय २३ संतोष उर्फ मोहन चिंतामणराव जोरेवार वय २० आणि विशु उर्फ विश्वास संजय मेकवाल वय २१ या तिघांनाही दोषी ठरवले आहे. भारतीय दंड विधानाच्या कलम ३०२ नुसार या तिघांना जन्मठेप आणि प्रत्येक ५० हजार रूपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.
यासोबतच न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार दंड म्हणून वसूल केलेल्या एकूण रकमेपैकी एक लाख रूपये मृताची आई शोभाबाई राजे यांना देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच या घटनेतील जखमी साक्षीदार अजय चोपडे यांना योग्य नुकसान भरपाई देण्याचे निर्देश जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाला दिले आहेत. या खटल्यात सरकार पक्षातर्फे जिल्हा सरकारी वकील ॲड एन एस मुटकुळे यांनी काम पाहीले. त्यांना सहाय्यक सरकारी वकील ॲड एस डी कुटे, ॲड सविता देशमुख यांनी सहकार्य केले. पैरवी अधिकारी म्हणून जमादार एम बी गव्हाणे यांनी काम पाहीले.

# कळमनुरी भाजपकडून येथे डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांना अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ जुलै**
कळमनुरी येथील विश्रामगृहात भाजपाच्यावतीने डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या जयंतीच्या निमित्ताने आयोजित बैठकीत उपस्थित भाजपाच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या वतीने डॉ. श्यामप्रसाद मुखर्जी यांच्या प्रतिमेला पुष्पहार व पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी अनेक पदाधिकाऱ्यां कडून डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकण्यात आला. डॉ. मुखर्जींचे जम्मू काश्मीर सह अखंड व एकात्म भारताचे स्वप्न पूर्ण करण्याच्या उद्देशाने देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गृहमंत्री अमित शाह यांच्या पुढाकारातून सरकारने ३७० कलम रद्द करून त्या दिशेने पाऊले टाकण्यास सुरुवात केली असून, डॉ.श्यामा प्रसाद मुखर्जींचे कार्य आणि विचार आजही भाजपाच्या कार्यकर्त्यांसाठीप्रेरणादायी असून हे विचार आणि कार्य पुढे घेऊन जाण्याचा संकल्प सर्वांनी करावा असे आवाहन प्रा. गुलाब भोयर, वर्षाताई खंदारे, ओंकार नावडे यांच्यासह अनेक वक्त्यांनी आपल्या भाषणातून केले आहे. या बैठकीसाठी कळमनुरी शहर मंडळाध्यक्ष ओंकार नावडे, जिल्हा पदाधिकारी अशोक संगेकर, राहुल मेने, प्रा.गुलाब भोयर, वर्षाताई खंदारे, रेखा ताई ढेंगळे, नगरसेवक राजू जाधव, विक्रम शिंदे, विकास ठाकूर, अनिल इंगळे, मुकेश इंगोले, सुरज शिंदे, गणेश इंगोले, अनिस बागवान, एहसान सिद्दिकी इंदेश काबरा, अजय वाढवे, योगेश संगेकर, दशरथ सोनटक्के, ॲड. राकेश मेहता यांच्यासह अनेक भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# औंढा पंचायत समितीमध्ये सहाय्यक गटविकास अधिकाऱ्यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ जुलै**
औंढा पंचायत समितीमध्ये सहाय्यक गटविकास अधिकारी पदी अनंता घोरपडे व गटशिक्षणाधिकारी पदी नीता भरोसे नुकतेच रुजू झाले आहेत. सहाय्यक गटविकास अधिकारी अनंता घोरपडे व गटशिक्षणाधिकारी नीता भरोसे यांचा औंढा नागनाथ पंचायत समितीमध्ये गटविकास अधिकारी गोपाळ कल्हारे व कर्मचाऱ्यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी गटविकास अधिकारी गोपाळ कल्हारे, कृषी अधिकारी सुभाष पाचपुते, प्रशासन अधिकारी राधेश्याम परांडकर, कृषी विस्तार अधिकारी जितेंद्र सोनटक्के, कृषी विस्तार अधिकारी प्रताप गाडे, विस्तार अधिकारी सय्यद जमीर, शेषराव आमले, शिक्षण विस्तार अधिकारी डॉ. केशव सारंग, तुळशीराम कोकरे, सु.ग.गुट्टे, उदय देशपांडे, अक्षय बगाटे, सीमा थोरात, जयश्री भाकरे, विशाल इंगोले, अभिजीत गायकवाड, राजेश सवनेकर, नितीन हजारे, राजेश पवार, भास्कर सिरसाट, मनोज कांबळे, शिवाजी टोम्पे, सीमा पटाईत, शिवशंकर गुडमे, दत्ता सूर्यवंशी, राहुल थडगे, अनिल लांडगे, शिवकुमार गिरबनवाड, पांडुरंग सूर्यवंशी, संजय पाटील, दिलीप रसाळ, वैशाली आमले, शेख रुबीना, आनंद गायकवाड, पिराजी हाके, शेख नगमा आदी उपस्थित होते.

# बियाणी नगरात साई गणेश मंडळाच्यावतीने २३ वृक्षांची लागवड



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ जुलै**
शहरातील बियाणे नगर भागामध्ये आज साई गणेश मंडळाच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. बियाणे नगर येथील ओपन स्पेस (खुली जागा) परिसरात पर्यावरण पूरक संदेश देत विविध प्रकारच्या २३ झाडांची लागवड करण्यात आली.
या भागातील दिपक अग्रवाल व कैलास काबरा यांच्या संकल्पनेतून आणि प्रेरणेतून हा उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये आरोग्यासाठी आणि पर्यावरणासाठी अत्यंत फायदेशीर असलेली ५ जांभळाची झाडे, ५ अंजीराची झाडे आणि २० कडुनिंबाची झाडे अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने लावण्यात आली. केवळ झाडे लावून न थांबता त्यांचे संवर्धन व्हावे, या उद्देशाने येथील रहिवासी प्रतुल यांबल यांनी या लावलेल्या सर्व झाडांचे पालकत्व स्वीकारले असून, त्यांच्या संगोपनाची जबाबदारी घेतली आहे. या कौतुकास्पद उपक्रमाप्रसंगी स्थानिक नगरसेवक नाना नायक, प्रणव पांडे, बोराळकर, निशु बियाणी यांच्यासह बियाणी नगर परिसरातील नागरिक आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. साई गणेश मंडळाच्या या पर्यावरणपूरक उपक्रमाचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.